


संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१५ जानेवारी २०२२
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४४)


विवेकानंदांना निरोप देताना
दत्तप्रसाद दाभोळकर

# चीन : अस्वस्थ शहरे आणि पर्यावरण

सतीश बागल




उद्याच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास!
MS-CIT मध्ये आता शिका चौथ्या औद्योगिक क्रांतीची ओळख
Big Data
Augmented Reality
Machine Learning
Virtual Reality
Artificial Intelligence
Internet of Things
Robotics
3D Printing
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
करियर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
Tally Prime with GST
Advanced Excel
Digital Freelancing
C & C++ Programming
DTP Corel & Photoshop
Mobile Apps Development
Coding
IT Hardware & Networking
Retail Management
Internet of Things (IoT)
BFSI
IT for Teachers
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
klic.mkcl.org
MKCL
ज्ञानदीप लावू जगी
कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी स्पेशल बॅच !
नव्या वर्षात आजच प्रवेश घ्या डिजिटल करियरच्या जगात !
अधिक माहितीसाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा. 8956537496

# अनुक्रम

Follow us :
weeklysadhana.in
facebook.com/weeklysadhana/
twitter.com/WeeklySadhana
YouTube/WeeklySadhana

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१५ जानेवारी २०२२
वर्ष ७४ / अंक - २२

संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तकविक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते **क्र.60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

४ **विद्यार्थ्यांना सोडा, शिक्षकांना धरा!**
... संपादकीय

७ **चीन : अस्वस्थ शहरे आणि पर्यावरण**
... सतीश बागल

१५ **विवेकानंदांना निरोप देण्यापूर्वी**
... दत्तप्रसाद दाभोळकर

२३ **डोनाल्ड ट्रम्प, तुमची खूप आठवण येते!**
... संकल्प गुर्जर

२८ **रानातली मेजवानी**
... विभूतीभूषण बंद्योपाध्याय

३२ **विडीची गोष्ट : एक महत्त्वाचा दस्तावेज**
... दिलीप धोंडगे

३६ **कॅलेंडर : स्मरणरम्य पुणे २०२२**
... विवेक सबनीस

३८ **प्रतिसाद**
... बाळकृष्ण शिंदे, अशोक वासुदेव बक्षी,
... डॉ.श्रीकांत परळकर, ॲड. नकुल पार्सेकर,
... पुरुषोत्तम महाले, विलासराव भांदिर्गे, भीमा स्वामी

संपादकीय

# विद्यार्थ्यांना सोडा, शिक्षकांना धरा!

कोविड १९ ने जगभर थैमान घातले आहे, हे जानेवारी २०२० मध्ये स्पष्ट झाले; त्यानंतरची दोन वर्षे संपूर्ण जग त्याच्या विळख्यात होते. डिसेंबर २०२१ मध्ये असे चित्र निर्माण झाले होते की, आता भारतातून तरी कोविड १९ निरोप घेतो आहे. मात्र २०२२ चा जानेवारी उजाडला आणि तिसऱ्या लाटेची चाहूल लागली. त्यानंतरच्या आठच दिवसांत त्या विषाणूचा संसर्ग झालेल्यांचे आकडे भूमितीच्या वेगाने वाढत गेले आहेत आणि हा संपूर्ण महिना तरी त्या विषाणूची वाटचाल अशीच राहणार आहे, हेही तज्ज्ञांकडून स्पष्ट होऊ लागले आहे. त्यामुळे गेल्या महिन्यात बऱ्यापैकी पूर्वपदावर आलेली स्थिती पुन्हा घसरणीला लागली आहे आणि जवळपास संपुष्टात आणलेले निर्बंध पुन्हा लागू केले जात आहेत. 'आताची ही तिसरी लाट वेगाने येईल आणि तितक्याच वेगाने जाईल, शिवाय पूर्वीच्या तुलनेत कमी नुकसानकारक ठरेल' अशीच भाकिते बहुतांश तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहेत. म्हणजे पुन्हा एकदा कडक लॉकडाऊन करण्याची वेळ येणार नाही, अशी शक्यता आहे. कदाचित ते सर्वच दृष्टींनी परवडणारेही नाही. आणि म्हणूनच, आता पुढे काय आणि कसे यावरच लक्ष केंद्रित करायला हवे.

मागील दोन वर्षांत राजकारण, समाजकारण, अर्थकारण या तिन्ही आघाड्यांवर आपल्या देशाचे खूप नुकसान झाले आहे. मात्र दूरगामी विचार करता सर्वाधिक नुकसान शिक्षणक्षेत्राचे झाले आहे. आणि शिक्षण हे क्षेत्र अन्य अनेक क्षेत्रांचा पाया असल्याने अन्य क्षेत्रांनाही त्याचे बरेच अनिष्ट परिणाम भोगावे लागणार आहेत. त्यामुळे २०२२ या वर्षात जर काही धोरणे व कृतिकार्यक्रम राबवायचे असतील तर सर्वाधिक भर शिक्षणक्षेत्रावरच द्यायला हवा. त्यासाठी सर्वप्रथम एक नोंद करणे आवश्यक आहे, ती म्हणजे 'मागील दोन वर्षांत सर्व विद्यार्थी पास आणि बहुतांश शिक्षक नापास' अशी या देशाची स्थिती राहिली आहे. आणि केंद्र व राज्य सरकारे यांचे दारूण अपयश नोंदवायचे असेल तर ते या क्षेत्रातच आहे. त्यातही शिक्षणक्षेत्राची जबाबदारी येते ती प्रामुख्याने राज्य सरकारांवर. अन्य राज्यांची याबाबत काय स्थिती आहे, हे त्या-त्या ठिकाणचे लोकच अंदाजाने सांगू शकतील. कारण त्याबाबत विश्वासार्ह व व्यापक असे सर्वेक्षणच अद्याप झालेले नाही, तर मग नेमकी आकडेवारी कळणार तरी कशी? शिवाय, अशा सर्वेक्षणांतून आलेले तपशील गोळा करून त्यांचे वर्गीकरण व विश्लेषण करून, निष्कर्ष व उपाययोजना सुचवणे हे तर खूपच दूरवर आहे. म्हणून इथे महाराष्ट्रापुरताच विचार करता येईल.

मागील पूर्ण दोन वर्षांत महाराष्ट्रातील शालेय शिक्षण व उच्च शिक्षण या दोन्ही आघाड्यांवर तळापासून शिखरापर्यंत निष्क्रियता तर दिसलीच; पण कमालीची अनास्था आणि सततची धरसोडवृत्ती, अनिश्चितता, गोंधळ असाच एकूण अनुभव राहिला. इतका की, महाराष्ट्रात शिक्षण मंत्रालय अस्तित्वात आहे का? असे अनेकांना वाटत राहिले. त्यातही विशेष हे आहे की, मार्च २०२० मध्ये पहिला लॉकडाऊन जाहीर झाल्यावर काही दिवसांनी राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी शिक्षकांचे वेतन अर्धे करणार अशी घोषणा केली; पण त्याच दिवशी संध्याकाळपर्यंत त्यांना बरीच सारवासारव करीत ती घोषणा पूर्णत: गिळावी लागली. वस्तुत: तो निर्णय बरोबरच होता, याचे कारण अन्य कोणत्याही समाजघटकांच्या



गेल्या वर्षी राष्ट्रपती पुरस्कार मिळालेले आदर्श शिक्षक खुर्शीद शेख (गडचिरोली)

तुलनेत शिक्षक व प्राध्यापक यांचे प्रत्यक्षातील काम आणि त्यांना मिळत असलेले वेतन यांच्यात बरीच तफावत आहे. म्हणजे 'काम कमी दाम जास्त' अशी त्यांची स्थिती आहे. आणि आता दोन वर्षांच्या अखेरीस मागे वळून पाहिले तर, शिक्षकांनी काय व किती काम केले हे तपासले तर ती तफावत अभूतपूर्व अशीच आहे.

हे खरे आहे की, शिक्षकांना प्रत्यक्ष शाळा- महाविद्यालयात जाण्यास, विद्यार्थ्यांसमोर बोलण्यास राज्य सरकारने बरीच बंधने घातली होती आणि सुरुवातीच्या काळात ऑनलाईनची स्थिती/व्यवस्था यथातथा होती. मात्र शिक्षकांचे काम केवळ 'सतत शिकवणे' हे नसते, 'सतत शिकत राहणे' हेसुद्धा शिक्षकांचे प्रमुख काम असते. किंबहुना 'ज्यांचे शिकणे थांबते ते काय शिकवणार', असा तो प्रश्न असतो. त्या आघाडीवर शिक्षकांना काय अडचणी होत्या? नेहमीच्या वेळी शाळेतील कामे, सरकारने सोपवलेली शालाबाह्य कामे आणि कौटुंबीक जबाबदाऱ्या ही तीन कारणे शिक्षक वर्गाकडून सांगितली जातात, त्यांच्या स्वत:च्या शिक्षणाच्या बाबतीतील अडथळे म्हणून! मात्र आता तर तिन्ही प्रकारच्या जबाबदाऱ्या नाममात्र असताना आणि घर व परिसर असाच वावर ठेवायचा असताना स्वत:च्या शिकण्यात त्यांना अडचण ती कसली होती? किंबहुना इतकी अनुकूलता मागील शतकभरातील कोणत्याही शिक्षकांना मिळाली नव्हती. मागील दोन वर्षांत इतकी दयनीय अवस्था आहे की, जेमतेम पाच दहा टक्के शिक्षकांनी शिकत राहण्याची प्रक्रिया चालू ठेवली. उर्वरित नव्वद टक्के शिक्षक-प्राध्यापकांनी 'ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असो द्यावे समाधान' ही तुकोबांची उक्ती अक्षरश: विपर्यस्त स्वरूपात अंमलात आणली.

पण दुसऱ्या बाजूने विचार केला तर लक्षात येते, हे असेच घडणार होते. कारण सामान्य परिस्थितीतही १० ते १५ टक्के शिक्षक-प्राध्यापकच तेवढे स्वयंप्रेरणेने काम करीत असतात. अन्य १० ते १५ टक्के शिक्षकांना स्वयंप्रेरणा तर नसतेच, पण बाह्यप्रेरणाही त्यांच्यावर स्वार होऊ शकत नाही. मात्र उर्वरित ७० ते ८० टक्के शिक्षकांना प्रेरणा, प्रोत्साहन व प्रशिक्षक यांची गरज असते. अनेक प्रकारच्या अभ्यासातून व सर्वेक्षणातून हे सिद्ध झालेले आहे. आणि म्हणून शिक्षणक्षेत्रांतील धुरिणांचे व शिक्षण मंत्रालयाचे हस्तक्षेप येथे महत्त्वाचे ठरत असतात.

विद्यार्थीवर्गाला शिकवणे व परीक्षा घेणे वा न घेता उत्तीर्ण करणे याव्यतिरिक्त महाराष्ट्राचे शिक्षण मंत्रालय मागील दोन वर्षांत, अन्य दोन आघाड्यांवर काम करू शकत होते. एक- शिक्षकवर्गाचे प्रबोधन करणे, त्यांच्यामध्ये प्रोत्साहन ओतणे,

त्यांना कार्यप्रवण करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढेल असे काही तरी करणे. त्यासाठी रूढ पद्धतीने दिले जाणारे प्रशिक्षण हा एक मार्ग होताच; पण प्रिंट, डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक या तिन्ही माध्यमांचा अतोनात वापर करून घेता आला असता. कमी वेळात, कमी खर्चात, कमी श्रमात खूप काही साध्य करता आले असते. कारण पहिला लॉकडाऊन झाला तेव्हा डिजिटल क्षेत्र मर्यादित प्रमाणात व मर्यादित वर्तुळातच वापरले जात होते; पण नंतरच्या दोन वर्षांत ते इतके झपाट्याने वाढत गेले आहे, की 'भूमितीचा वेग' ही कल्पनाही त्याने ओलांडली आहे. आणखी महत्त्वाचे म्हणजे या काळात विविध क्षेत्रांतील अनेक रथी-महारथी आपापल्या घरात पूर्णत: बंदिस्त होते. त्यांची वेळ व ऊर्जा या कामी वापरायला किती नामी संधी होती!

उदा. शाळा-महाविद्यालयातील पाठ्यपुस्तके ज्यांनी लिहिली आहेत, त्यातील हयात असलेल्या सर्वांना थेट डिजिटल व इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून शिक्षकांसमोर आणले असते तर? पाठ्यपुस्तकांमध्ये ज्यांचे ज्यांचे उल्लेख आहेत वा संदर्भ आहेत, त्या लहान-थोर व्यक्तींना व त्या-त्या विषयांना ऑडिओ-व्हिडिओ स्वरूपात सादर केले असते तर? इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, विज्ञान, पर्यावरण, भाषा, गणित इत्यादी विषयांच्या मूलभूत संकल्पना ते ते विषय शिकवणाऱ्यांनाही पुरेशा स्पष्ट झालेल्या नसतात; त्या संकल्पना स्पष्ट होतील यासाठी कल्पना लढवल्या असत्या तर? वाचन व लेखन कसे करावे इथपासून अभ्यास व संशोधन कसे करावे यादरम्यान किती पायऱ्या असतात आणि त्या कशा ओलांडता येतात हे प्रात्यक्षिकांसह दाखवता आले असते तर? भाषा कशा जन्माला येतात, त्यांचा विकास कसा होतो इथपासून त्यांचे उपयोजन कसे होत असे वा करता येते इथपर्यंतच्या बाबतीत समाजमनात प्रचंड गोंधळ असतो, तो शिक्षक वर्गाच्या मनातून काहीसा कमी करण्याचा प्रयत्न करता आला असता तर? विज्ञान म्हणजे जीव, भौतिक, रसायन इत्यादी शाखा व त्यांच्या उपशाखा नसून, विज्ञान ही मूलत: विचार करण्याची पद्धती आहे, हे सोदाहरण स्पष्ट करता आले असते तर? गणित या विद्याशाखेच्या केंद्रस्थानी सुसंगत व तर्कशुद्ध विचार करणे आहे, त्यामुळे गणिताकडे स्वतंत्र विद्याशाखा म्हणून न पाहता; अन्य सर्व विषय पक्के होण्यासाठी गणित शिकायचे असते हे सर्व विषयांच्या शिक्षकांच्या मनावर ठसवता आले असते तर? अर्थकारण हे कसे सर्वव्यापी असते आणि कुटुंबापासून देशाच्या सरकारापर्यंत तेच कशी मध्यवर्ती भूमिका बजावत असते आणि त्याबाबत आपल्याकडे किती भयानक निरक्षरता आहे, हे अधोरेखित करता आले असते तर? पर्यावरण हे क्षेत्र आता जागतिक अजेंड्यावर प्रथम स्थानावर कसे येऊ घातले आहे आणि त्याबाबतची अनास्था आपल्या जनमानसात किती सखोल रूजलेली आहे, हेही ठसवता आले असते तर? शेती व शेतकरी हा या देशाचा कणा आहे, तो कणाच कमजोर असेल तर उभा देश ताठ मानेने चालू शकत नाही, हे गृहीतक पुढे करून त्याबाबत जाणीव-जागृती वाढवता आले असती तर? उद्योग, व्यापार, सेवा या तीन क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार, नोकऱ्या असतात; मात्र ती क्षेत्रे अधिक बळकट करणारी माणसे पुढे नाही आली तर अधिकाधिक नोकऱ्या कशा निर्माण होणार, हा कूटप्रश्न पुढे ठेवता आला असता तर? विश्वासार्ह व कार्यक्षम असे म्हणजे कुशल मनुष्यबळ ही या देशासमोरची प्रत्यक्षातील सर्वांत मोठी समस्या आहे; तिला न भिडता बेरोजगारी ही दृश्य रूपातील सर्वांत मोठी समस्या दूर करता येईल का, हे कोडेही समोर ठेवता आले असते तर? आपला देश, आपले राज्य एवढेच काय पण आपले गाव व परिसर हेसुद्धा जागतिक हस्तक्षेपापासून दूर राहू शकत नाही, त्यामुळे त्याला प्रतिसाद कसा देता येईल, यावर विचारप्रवृत्त करता आले असते तर? असो.

ही यादी कितीही लांबवता येईल. औपचारिक (फॉर्मल) आणि अनौपचारिक (इन्फॉर्मल) शिक्षणाच्या सीमारेषा अस्पष्ट करणारे हे व असे अनेक कार्यक्रम व उपक्रम पार पाडता आले असते. सर्व प्रसारमाध्यमांना, स्वयंसेवी सामाजिक संस्थांना, एवढेच नाही तर साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रालाही यात सामावून घेता आले असते. कदाचित एक प्रकारची शिक्षण चळवळ उत्स्फूर्तपणे आकाराला आली असती. पण ती ऐतिहासिक संधी आपण गमावली आहे. त्यामुळे मागील दोन वर्षांत जे झाले नाही ते आता कसे होणार असा प्रश्न आहे. परिणामी बरेच नुकसान भविष्यकाळात होणार आहे, हे निश्चित! मात्र तरीही, राज्य सरकार 'बेटर लेट दॅन नेव्हर' असे काही करू इच्छित असेल तर, 'विद्यार्थ्यांना सोडा, शिक्षकांना धरा!' या सूत्राची अंमलबजावणी करायला हवी. कारण शिक्षकांना या प्रकारे धरून ठेवता आले तर सर्जनशील अस्वस्थता (क्रिएटिव अनस्टॅबिलिटी) लाभलेले ते शिक्षक त्यांच्या विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडणार नाहीत!

दृष्टिक्षेप

सतीश बागल

# चीन : अस्वस्थ शहरे आणि पर्यावरण

नागरीकरण (अर्बनायझेशन) ही चीनची ताकद आहे, तसेच मोठी समस्याही. जलद नागरीकरण करून चीनने मोठा आर्थिक विकास साधला, कारण नागरीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक विकासाच्या संधी दडलेल्या असतात. त्याचा पुरेपूर फायदा उठवीत चीनने जोमाने नागरीकरण केले. मात्र आता मोठ्या शहरांचे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणविषयक अनेक प्रश्न चीनपुढे आव्हान म्हणून उभे आहेत.

चीनमध्ये आर्थिक सुधारणा सुरू होत असताना १९८० मध्ये जवळजवळ १८ टक्के लोक शहरात राहत असत. पुढे १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला हे प्रमाण २०-२२ टक्के होते. उच्च आर्थिक विकासदराचे पर्व, उद्योगधंद्यांची वाढ, त्यातून निर्माण झालेला नागरीकरणाचा रेटा, ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर व शहरांची मोठी वाढ यामुळे हे चित्र बदलले. आता २०१० मध्ये पन्नास टक्के लोक शहरात राहू लागले. हे प्रमाण २०१५ मध्ये ५४ टक्के झाले आहे. म्हणजेच १९८० ते २०१५ या ३५ वर्षांत नागरी भागाची लोकसंख्या ५६ कोटींनी वाढली. जगात इतके जलद नागरीकरण कोणत्याही देशात झाले नाही. त्यामुळे अनेक नवी शहरे निर्माण झाली आहेत, तर सध्याच्या शहरांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असणारी २६० शहरे चीनमध्ये आहेत. शहरी लोकसंख्या २०३० पर्यंत अंदाजे ७० टक्के होणार, असा अंदाज आहे. शांघायची लोकसंख्या १९९० मध्ये एक कोटी होती. पुढील वीस वर्षांत शांघायने आपला विस्तार करून १.२५ कोटी अतिरिक्त नागरी लोकसंख्या या शहरात सामावून घेतली आणि त्यांच्यासाठी आवश्यक नागरी सुविधा निर्माण केल्या. नागरीकरणाच्या मुद्द्यावर चीनने मोठी कार्यक्षमता दाखविली आहे. या मोठ्या बदलाचे राजकीय, सामाजिक व आर्थिक परिणाम महत्त्वाचे असणार आहेत. विविध भागांतून आलेल्या आणि विविध संस्कृतींत वाढलेल्या लोकांचा एकत्रित, निकोप, सुसंवादी समाज निर्माण करणे हे आव्हान आहेच; याशिवाय त्यांना नागरी पायाभूत सुविधा पुरविणे हेही एक अवघड काम आहे.

चिनी महासत्तेचा उदय : डेंग झियोपेंग ते क्षी जिनपिंग ही लेखमाला गेल्या वर्षी साधना साप्ताहिकात क्रमशः प्रसिद्ध झाली. त्यामध्ये चीन या देशाने १९७८ नंतरच्या ४० वर्षांत कशी वाटचाल केली आणि जागतिक महासत्ता म्हणून तो देश कसा उदयाला आला याचे चित्रण (राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक या चहू बाजूंनी) केले आहे. सखोल व विविधांगी अभ्यास करून, विश्लेषणात्मक व चिकित्सक पद्धतीने लिहिली गेलेली ही लेखमाला आता पुस्तकरूपाने आली आहे. हे पुस्तक मराठी वैचारिक लेखनात एक महत्त्वाचा ग्रंथ म्हणून ओळखले जाईल. त्या लेखमालेला पुस्तकरूप देताना, सतीश बागल यांनी काही लेखांचे पुनर्लेखन केले आहे आणि एक पूर्णतः नवा लेख पुस्तकात समाविष्ट केला आहे. तोच नवा लेख इथे प्रसिद्ध करीत आहोत.
... संपादक

चीनमध्ये फार पूर्वीपासून ग्रामीण भागातून शहरात वास्तव्यासाठी येणाऱ्यांसाठी खास परवान्याची गरज असते; त्याला 'हुकाव' असे म्हणतात. परदेशात जाण्यासाठी व्हिसा असावा तसा हा परवाना असतो. तो ग्रामीण भागातील लोकांना सहज मिळत नाही. या परवान्याशिवाय शहरी भागात कामासाठी येणाऱ्या कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना शहरात शिक्षण, आरोग्य व इतर मूलभूत नागरी सुविधा मिळत नाहीत. हुकाव हा नेहमीच चीनमधील मोठा सामाजिक प्रश्न राहिलेला आहे. हुकावविना असलेल्या लोकांना नागरी सुविधा मिळत नसल्याने अनेकदा शहरात काम करणारा कर्मचारी वा कामगार शहरात एकटा राहतो आणि त्याचे कुटुंबीय खेड्यात राहतात. हुकाव वा परवाने नसणारे अनेक नागरिक जरी शहरात काम करीत असले, तरी ते अशा मोठ्या शहराच्या आजूबाजूला निर्माण झालेल्या वस्त्यांमध्ये वा गावात राहतात. तिथे त्यांना मिळणाऱ्या सुविधा अगदी अपुऱ्या असतात. अशा कामगारांची/नागरिकांची संख्या मोठी असून, आज शहरी लोकसंख्येच्या चाळीस टक्के लोक अशा पद्धतीने जीवन जगतात. हुकाव पद्धतीत अलीकडे बरीच सुधारणा होत आहे; पण त्यातील महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, हुकावपद्धती थोडी शिथिल केली की, त्यामुळे शहरात अधिक संख्येने येणाऱ्या लोकांना नागरी सुविधा पुरविण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनावर पडते. त्यामुळे हा प्रश्न शेवटी पुरेशा आर्थिक साधनांचा आहे. चीनच्या सरकारने नवी शहरे आणि नागरीकरणाच्या मुद्द्यावर २०१४ पासून अधिक उदार धोरण स्वीकारण्याचे ठरविले आहे. त्यामुळे शहरात येणाऱ्या सर्वच कामगारांना व नागरिकांना परवाना देण्याचा आणि त्यांना नागरी व इतर सामाजिक सुविधा देण्याचा विचार आहे. हे जेव्हा खऱ्या अर्थाने सुरू होईल, तेव्हाच शहरी भागातील हुकावमुळे निर्माण झालेला सामाजिक तणाव निवळू लागेल.

शहरांच्या व्यवस्थापनासाठी सर्वसाधारणपणे अधिक ऊर्जेची गरज असल्याने मोठी शहरे आणि पर्यावरणाचा ऱ्हास हे समीकरण झाले आहे. नागरी व ग्रामीण भागात अनेक बाबतींत मोठी असमानता आहे. म्हणूनच नागरीकरणासाठी योग्य ती साधनसामग्री उपलब्ध करून देणे, विविध प्रकारच्या नागरी सुविधा निर्माण करणे, निकोप व सुसंवादी समाजासाठी आवश्यक सामाजिक कार्यक्रम राबविणे हे क्षी जिनपिंग यांचे एक उद्दिष्ट आहे. वैयक्तिक स्वातंत्र्य व मर्यादित लोकशाही हवी असणाऱ्या आणि बऱ्यापैकी सधन असलेल्या नागरी भागातील सुशिक्षित मध्यम वर्गाला चिनी राज्यकर्ते थोडे घाबरून असतात. त्यामुळेच यशस्वी नागरीकरण चीनच्या राजकीय व सामाजिक स्थैर्यासाठी आवश्यक आहे.

प्रचंड वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, अतिजलद नागरीकरण, नवनवीन शहरे, त्यासाठी निर्माण केलेल्या पायाभूत सुविधा, वाढते औद्यागिकीकरण आणि जगभर चाललेली निर्यात या साऱ्यामुळे चीनमधील पर्यावरणावर विपरीत परिणाम झाला आहे. मोठ्या शहरांमध्ये प्रदूषणाची मोठी समस्या आहे. बीजिंग ऑलिंपिकच्या वेळीही तिथे मोठ्या प्रमाणावर दूषित हवा आणि प्रदूषण होते. सन २०१३ मधील तिसऱ्या प्लेनममध्ये क्षी यांनी सादर केलेल्या त्यांच्या अजेंड्यामध्ये प्रदूषणनियंत्रण, नैसर्गिक साधनसामग्रीचा योग्य वापर आणि निसर्गाचे पावित्र्य जपणाऱ्या संस्कृतीकडे वाटचाल यांचा समावेश होता. अनेक पाश्चात्त्य राजकारण्यांनी व मुत्सद्द्यांनी प्रदूषण व ग्लोबल वॉर्मिंगसंदर्भात नि:संदिग्ध भूमिका घेतलेली आढळून येत नाही. या मुद्द्यावर क्षी यांनी मात्र बऱ्यापैकी स्पष्ट भूमिका घेतली आहे, तसेच त्याला साजेशी धोरणआखणी व अंमलबजावणी करण्याचा कार्यक्रमही तयार केला आहे. हवा आणि पाणी यांचे वाढते प्रदूषण हा चीनमधील एक ज्वलंत मुद्दा असून त्याची समाधानकारक उकल झाली नाही, तर त्याचा विपरीत परिणाम आर्थिक विकासावर तसेच क्षी यांच्या राजवटीवर होऊ शकतो याची त्यांना कल्पना आहे.

क्षी जिनपिंग यांनी २०१४-१५ मध्ये एपीईसी (आशिया-पॅसिफिक इकॉनॉमिक को-ऑपरेशन) शिखर परिषदेनंतर अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्याबरोबर करार करून प्रदूषणनियंत्रणाबाबत सकारात्मक भूमिका घेतली, तसेच त्यांनी पॅरिस कराराबाबत चीनची नैतिक भूमिकाही स्पष्ट केली. पर्यावरणविषयक मंत्रालयाला महत्त्व देऊन त्याला विशेष अधिकारही दिले. कार्बन उत्सर्जन २०३० नंतर कमी होत जाईल, अशी धोरणे आखण्याचे कामही चालू आहे. विविध उद्योगांसाठी- विशेषतः सरकारी उपक्रमांसाठीही अनेक निर्बंध घातले आहेत. संशोधन करून व नवी तंत्रे शोधून प्रदूषण कमी करण्यावर त्यांचा विशेष भर आहे. हॅलिबर्टनसारख्या अमेरिकन कंपन्यांबरोबर काम करून शेल गॅससारख्या इंधनाचा वापर

करून पर्यावरणाचा प्रश्न अंशत: का होईना, परंतु सोडविण्याचा चीनचा प्रयत्न आहे. जपानमधील फुकुशिमा अणुकेंद्रातील २०११ मधील अपघाताचे उदाहरण समोर असतानाही चीन जगातील सर्वांत मोठा अपारंपरिक अणुऊर्जा कार्यक्रम राबवीत आहे. दक्षिण चीनमध्ये जिथे सूर्यप्रकाश चांगला आहे, त्या भागात प्रत्येक घराच्या छतावर चकाकती सोलर पॅनल्स बसविलेली दिसतात. जेथे जेथे वेगवान वारे वाहतात व सुयोग्य जागा आहेत, तेथे तेथे वीजनिर्मितीसाठी विंडमिल्स आहेत. पर्यावरणाचा मुद्दा चीनने व स्वतः क्षी जिनपिंग यांनी फारच गंभीरपणे घेतला आहे. मात्र पर्यावरणाचे प्रश्न केवळ सरकारकडून सोडविले जात नसतात; त्यासाठी तळमळीने काम करणारे एनजीओ, सामान्य लोक, त्या विषयातील तज्ज्ञ तसेच पर्यावरण-विषयक चळवळी आणि त्या चळवळी चालविणारे सामाजिक नेते यांचेही योगदान असते. अशा गटांचे दबाव सरकारवर येतात, तेव्हाच सरकारी यंत्रणा जागरूक राहते. पर्यावरणाचे प्रश्न चीन कशा पद्धतीने सोडवीत आहे आणि त्या कार्यक्रमात चीनला यश आले आहे का व किती आले, हे जाणून घेणे मोठे उद्‌बोधक आहे.

अनिर्बंध औद्योगिकीकरण हे चीनचे प्रमुख वैशिष्ट्य राहिले आहे. असे औद्योगिकीकरण करीत असताना पर्यावरणविषयक प्रश्न निर्माण होणे अपरिहार्य होते. जवळजवळ वीस वर्षे- १९९० च्या दशकापासून- चीनचा आर्थिक विकासदर सातत्याने दहा टक्क्यांहून अधिक होता. मात्र अशा मोठ्या घाईत आर्थिक विकास करताना चीनने स्वतःचे पर्यावरणविषयक प्रश्न अवघड करून ठेवले आहेत. चीनमधील मोठी कारखानदारी, अजस्र रासायनिक कारखाने आणि प्रकल्प कमी वेळेत पूर्ण करण्याचे कौशल्य हे सारे वादातीत असले, तरी याची फार मोठी किंमत चीन सध्या चुकवीत आहे, असे म्हणावेसे वाटते.

चीनमध्ये पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, याची बाहेरच्या जगाला २००८ पर्यंत फारशी कल्पना नव्हती. चीनमधील लोकांनाही याची फारशी जाणीव नव्हती. चीनमध्ये ऑलिंपिक स्पर्धा २००८ मध्ये झाल्या. त्या वर्षात सर्व जगाचे लक्ष बीजिंगकडे होते आणि म्हणून या वर्षात चीनमधील पर्यावरणाच्या गंभीर प्रश्नाची जाणीव चीनमधील व चीनबाहेरील लोकांना होऊ लागली. त्याचे असे झाले की, २००८ मध्ये बीजिंगमधील अमेरिकन दूतावासाने आपल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये, म्हणून तासातासाला ट्विटरवरून दूषित हवेची माहिती देणे सुरू केले. पर्यावरणाच्या भाषेत ज्यांना पीएम २.५ म्हटले जाते, असे



हवेत तरंगणारे आकाराने सर्वांत लहान कण आरोग्याला घातक असतात. त्यांची हवेतील पातळी वाढली, तर श्वसनाचे अनेक विकार होतात. अशा दूषित हवेची पातळी वाढली की, त्याबद्दलची माहिती देऊन दूतावासातील कर्मचाऱ्यांना घरीच राहण्याचा सल्ला दिला जात असे. वाढत्या दूषित पर्यावरणाबाबत सर्वसामान्य माणसाला समाजमाध्यमातून उपयुक्त माहिती उपलब्ध करून देण्याची चीनमध्ये ही पहिलीच वेळ होती. जेव्हा यावर समाजमाध्यमांतून चर्चा सुरू झाली, तेव्हा चीन सरकारला यात दुहेरी धोका दिसू लागला. पर्यावरण दूषित होते आहे, हा धोका होताच; मात्र त्याहून सरकारच्या दृष्टीने मोठा धोका म्हणजे, त्याबद्दलची माहिती सर्वसामान्य माणसाला होऊ लागली. इंटरनेट व समाजमाध्यमांतून हे तपशील व्हायरल होऊ लागल्याने त्यातून एखादी चळवळ निर्माण होऊन सरकारलाच प्रश्न विचारणे सुरू झाले, तर सरकारच्या दृष्टीने ते त्रासाचे होते. सरकारने अमेरिकन दूतावासाला पर्यावरणाची माहिती सार्वजनिक न करण्याबाबत बजावले. मात्र अमेरिकन दूतावासाने तसे करण्याचे नाकारले. दरम्यान, शहरा-शहरांमध्ये समाजमाध्यमांतून आणि इंटरनेटवरून आपले शहर पर्यावरणाच्या दृष्टीने किती सुरक्षित आहे, दूषित पर्यावरणाचा आरोग्यावर कसा विपरीत परिणाम होतो आहे, कोणती शहरे राहण्याच्या दृष्टीने चांगली आहेत आणि कोणती जोखमीची- अशा प्रकारची चर्चा सुरू झाली. ऑनलाइन ओपिनियन पोल्स घेतले जाऊ लागले. डिसेंबर २०११ मध्ये बीजिंगमधील धुक्यामुळे ७०० हून अधिक विमान उड्डाणे रद्द करण्यात आली. चीन सरकारने वाढते धुके असे कारण दिले तरी दूषित हवेचा त्यात सहभाग आहे, हे लोकांना कळायला लागले. दूषित हवेबद्दल सरकारने दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यातील नागरिकांनी दाखवून दिलेली तफावतही दिसायला लागली. यावरून चीन सरकार पर्यावरणाबाबतची माहिती लपविण्याचा प्रयत्न करते आहे, असे दिसू लागले. या वाढत्या जनमताच्या रेट्यापुढे सरकारने पर्यावरणाबाबतची माहिती प्रसृत करणे हळूहळू सुरू केले. पुढे मोठमोठ्या शहरांत दूषित हवा मोजण्याची यंत्रेही अनेक ठिकाणी ठेवली जाऊ लागली. पक्षाने आणि सरकारने या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून त्यासाठी कोट्यवधी डॉलर्सची तरतूद केली. क्षी जिनपिंग सत्तेवर येत असताना दूषित पर्यावरण हा चीनमधील फार मोठा प्रश्न आहे याची दखल घेतली गेली.

दूषित पर्यावरण व त्यामुळे उद्भवणारे आजार आणि इतर आरोग्यविषयक प्रश्न यांवर बरेच अभ्यास चीनमध्ये होऊ लागले. यातील बरीचशी माहिती प्रकाशितही होऊ लागली. मात्र त्याचबरोबर दूषित पर्यावरणाबद्दल टोकाची भूमिका घेणारे सक्रिय कार्यकर्ते आणि चळवळे यांच्यावर पाश्चात्त्य देशांचे हस्तक असल्याची टीका होऊ लागली. त्यांना त्रास देणेही सुरू झाले. तरीही पर्यावरणविषयक मुद्दे चीनमध्ये ऐरणीवर येऊ लागले. चीनमधील दूषित पर्यावरणाचा प्रश्न केवळ हवेपुरता मर्यादित नाही, पाणी आणि जमिनीही मोठ्या प्रमाणावर दूषित होऊ लागल्या. चीनमधील दूषित हवा, पाणी, जमीन आणि इतर दूषित पर्यावरणाबद्दलची महत्त्वाची आकडेवारी व अनेक संदर्भ एलिझाबेथ इकॉनॉमी यांनी लिहिलेल्या 'थर्ड रिव्होल्युशन' या ग्रंथात आलेले आहेत. त्यातील काही आकडेवारी आणि वस्तुस्थिती दर्शवणारी माहिती येथे दिली आहे. चीनने स्वीकृत केलेल्या सुरक्षित पर्यावरणाच्या मानकांनुसार चीनमधील तीनशेपैकी दोनशे शहरे अतिप्रदूषित आहेत, असे दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे चीनचा ऊर्जा वापर मोठा आहे, तसेच ऊर्जा वापरात पारंपरिक ऊर्जास्रोतांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. देशातील ६५ टक्के विजेची निर्मिती कोळसा वापरून होते, तसेच एकूण ऊर्जा वापरात ६२ टक्के वापर कोळशाचा होतो. शहरी भागात प्रतिमाणशी ऊर्जा वापराचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा चौपटीने अधिक आहे. शिवाय चीनमध्ये जगातील सर्वांत जास्त मोटारी वापरात आहेत. त्यामुळे शहरांमध्ये हवेचे मोठे प्रदूषण दिसून येते. बीजिंगमधील हवेत दूषित कणांचे प्रमाण न्यूयॉर्कपेक्षा सहा पटींनी जास्त आहे.

पाण्याचा विचार केला तर चीनमध्ये दूषित पाणी आणि पाण्याचे वाढते दुर्भिक्ष हे दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. चीनमधील ४० टक्के नद्यांमधील पाणी दूषित झालेले आहे. त्यातील २० टक्के नद्यांचे पाणी इतके दूषित आहे की, त्याच्या स्पर्शाने त्वचेचे रोग होण्याची शक्यता असते. चीनची अर्थव्यवस्था जगात दुसऱ्या क्रमांकाची आहे, हे खरे; मात्र २०१५ मधील पर्यावरण मंत्रालयाच्या अहवालानुसार, चीनमधील २८ कोटी लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. चायनीज ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसच्या २०१३ च्या अहवालानुसार चीनमध्ये वर्षभरात वापरल्या गेलेल्या एक लाख पासष्ट हजार टन

अँटिबायोटिक्सपैकी एक-तृतीयांश पाण्यात किंवा शेतजमिनीत शोषली गेली. शेतीसाठीच्या पाण्याची मागणी २००५ ते २०१५ या दहा वर्षांत दहा टक्क्यांनी वाढली, औद्योगिक वापरासाठीची मागणी पन्नास टक्क्यांनी वाढली, तर घरगुती वापरासाठीची मागणी ४० टक्क्यांनी वाढली. पाण्याच्या प्रदूषणाबरोबर दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, चीनमधील पाण्याचे स्रोत कमी होत आहेत. याचे एक कारण म्हणजे, पायाभूत सुविधांवरील भांडवली खर्च वाढला असला तरी या सुविधांची देखभाल आणि व्यवस्थापन अतिशय अकार्यक्षम आहे. त्यामुळे वहन (ट्रान्समिशन) आणि वितरण (डिस्ट्रिब्युशन) दरम्यानच २० ते २५ टक्के पाणी वाया जाते. पाण्याच्या अनिर्बंध वापरामुळे आणि स्रोतांचे रिचार्जिंग होत नसल्याने नद्याही आटायला सुरुवात झाली आहे. अनेक लहान नद्या तर चक्क नाहीशा झाल्या आहेत. १९९० मध्ये ५०,००० लहान-मोठ्या नद्या असणाऱ्या चीनमध्ये २०१८ मध्ये फक्त २३,००० नद्या शिल्लक राहिल्या आहेत. शांघाय मोठे शहर आहे. दोन कोटींहून अधिक त्याची लोकसंख्या आहे. मात्र या मोठ्या लोकसंख्येमुळे काही वर्षांतच शांघायमधील पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. चीनमधील पन्नास टक्के राष्ट्रीय उत्पन्न देणाऱ्या प्रांतांमध्ये येत्या काही वर्षांत पाण्याचे मोठे दुर्भिक्ष जाणवणार आहे.

दूषित हवा आणि पाणी याव्यतिरिक्त अनेक भागांमध्ये जमिनीही प्रदूषित होत आहेत. त्यात शेतजमिनी आहेत, तसेच दूषित नद्यांच्या किनाऱ्याला लागून असणाऱ्या जमिनी आहेत. मोठे कारखाने आणि रासायनिक उद्योगांच्या जवळच्या जमिनीही दूषित झाल्या आहेत. चीनमधील शेतीच्या लागवडीखाली असलेल्या जमिनींपैकी वीस टक्के जमीन विविध रसायनांमुळे दूषित झालेली आहे. विशेषतः मर्क्युरी, कॅडमियम आणि आर्सेनिक यांचे मोठे प्रदूषण जमिनीमध्ये आढळते. अमेरिकेच्या प्यू फाउंडेशनने २०१५ मध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले की, सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या प्रश्नांमध्ये प्रदूषण हा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. लोकांच्या दृष्टीने पहिला महत्त्वाचा मुद्दा चीनमधील भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचारी अधिकारी यांच्याबद्दलचा आहे. दुसरा मुद्दा दूषित हवेबद्दल आणि तिसरा मुद्दा दूषित पाण्याबद्दलचा आहे. लोकांना हे कळते की, प्रदूषणामुळे श्वसनाचे आणि इतर विकार मोठ्या प्रमाणावर होतात. डिसेंबर २०१६ मध्ये बीजिंग आणि उत्तर चीनमधील इतर २१ शहरांमध्ये पाच दिवसांपर्यंत शाळा-कॉलेजेसपासून अनेक संस्था बंद ठेवण्यात आल्या होत्या. कारखाने एक तर बंद करण्यात आले होते किंवा त्यांचे काम निम्म्यावर आणण्यात आले होते. प्रदूषित शहरांमध्ये अतिप्रदूषित भागांमध्ये रस्त्यावर चालणारे लोक हवा शुद्धीकरणाची यंत्रे सोबत घेऊन चालतात. अनेकांकडे दूषित हवा दर्शवणारे सेन्सर असतात. बीजिंगसारख्या मोठ्या शहरांमध्ये मल्टिनॅशनल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांच्या परदेशातून बदल्या होतात, तेव्हा त्यांना या कंपन्यांतर्फे भरपाई भत्ता देण्यात येतो.

प्रदूषित नद्यांच्या काठांवरील काही खेडी आणि छोटी गावे 'कॅन्सर गावे' म्हणून ओळखली जातात. या ठिकाणी लोकांना कॅन्सर होण्याचे प्रमाण इतर गावांपेक्षा अनेक पटींनी जास्त आढळून येते. अमेरिकेतील सेंट्रल मिसुरी विद्यापीठाने केलेल्या सर्वेक्षणात त्यांना ४६० कॅन्सर गावे आढळून आली. काही गावांमध्ये कॅन्सर होण्याचे प्रमाण हे इतर गावांपेक्षा ३० पट अधिक होते. सुरुवातीला ही बाब चीन सरकारने मान्य केली नाही; परंतु पुढे २०१३ मध्ये 'ग्लोबल टाइम्स' या सरकारी वर्तमानपत्राने स्वतःच ही आकडेवारी देऊन चीनमध्ये कॅन्सर गावे आहेत, हे मान्य केले.

बंद ठेवलेले कारखाने, दिलेल्या सुट्ट्या, खराब झालेली पिके किंवा न उगवलेली पिके इत्यादींमुळे राष्ट्रीय उत्पन्नामध्ये घट येते. ही घट तीन ते दहा टक्के इतकी असू शकते. रँड कॉर्पोरेशनने २०१५ मध्ये केलेल्या अभ्यासानुसार दूषित जमिनीमुळे होणारे नुकसान जीडीपीच्या १.१ टक्का, तर दूषित पाण्यामुळे होणारे नुकसान २.१ टक्के आहे. चायनीज ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसच्या अभ्यासाप्रमाणे २००५ मध्ये दूषित पर्यावरणामुळे झालेले नुकसान त्या वर्षाच्या जीडीपीच्या १३ टक्के होते. हुनान प्रांतामधून येणाऱ्या तांदळामध्ये कॅडमियमचे प्रदूषण आढळून आले. त्यामुळे तेथील शेतीवर आणि तेथील लोकांच्या उपजीविकेवर त्याचा विपरीत परिणाम झाला. चीनमध्ये काही भागांतील जंगले नष्ट होत आहेत आणि वाळवंटे वाढू लागली आहेत. तेथील लोक उजाड झालेले प्रदेश सोडून दर वर्षी इतरत्र जातात. हे मायग्रेशनसुद्धा चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर होते. कोळशाचा वापर कमी करून त्याऐवजी शेल गॅसचा वापर करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. शेल गॅस तयार करताना फ्रॅकिंगसाठी पाण्याचा

मोठा वापर होतो. दुर्दैवाने त्या भागात पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने चीनमध्ये हा कार्यक्रमसुद्धा फारसा गती घेऊ शकत नाही.

सर्वसामान्य लोक मोठ्या प्रमाणावर जागृत झाले असल्याने अनेक भागांमध्ये पर्यावरण प्रदूषित करणाऱ्या नव्या उद्योगांना लोक रस्त्यावर उतरून विरोध करतात. शांघायच्या उत्तरेला असलेल्या लिआन्युगांगमध्ये हजारो लोकांनी रस्त्यावर उतरून तेथील आण्विक केंद्राला २०१६ मध्ये विरोध सुरू केला. सरकारने दडपशाही करण्याचा प्रयत्न केला, परंतु विरोधक ऐकेनात! शेवटी १५ बिलियन डॉलर्सचा हा प्रकल्प प्रलंबित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. दक्षिणेकडील ग्वांगडाँगमधील अशाच प्रकल्पाला मोठा विरोध झाला. चीनमध्ये लोकशाही नसल्याने लोकांना विश्वासात घेणे, प्रकल्पाबद्दलची महत्त्वाची माहिती लोकांपुढे मांडणे हे होत नाही. वास्तविक पाहता- नवे उद्योग उभारताना लोकांना त्याबद्दलची माहिती देणे, त्यातील जोखीम समजून सांगणे, जोखीम कमी करण्याबाबत उपाययोजना करणे, लोकांच्या मनातील भीती घालविणे या सर्वांसाठी पारदर्शकता लागते. त्यासाठी कायद्याचे राज्य आणि कायद्याचे अधिष्ठान महत्त्वाचे असते. मात्र फक्त आर्थिक विकास करायचा, राजकीय सुधारणा करायच्या नाहीत, लोकांना विश्वासात घ्यायचे नाही; यामुळे चीनमधील पर्यावरणाचे प्रश्न अधिकाधिक बिकट झाले.

चीनमधील पर्यावरणसंवर्धनाचा अथवा पर्यावरण-संरक्षणाचा इतिहास फारसा प्रेरणादायी नाही. रशियाकडून सुरक्षाविषयक धोका असल्यामुळे १९५० आणि १९६० च्या दशकांमध्ये सीमाभागात आणि लांब अंतरावर असणारे महत्त्वाचे उद्योग, रसायनांचे कारखाने मध्य चीनमधील ग्रीन बेल्टमध्ये हलविण्यात आले. त्यामुळे चीनच्या मध्यवर्ती भागामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण झाले. शिवाय माओंच्या ग्रेट लीप फॉरवर्ड कार्यक्रमामध्ये चार कोटींहून अधिक लोकांचा बळी गेला. या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पर्यावरणाची बरीच हानी झाली होती. त्यामुळे १९७० च्या दशकामध्ये काही पर्यावरणविषयक मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारून त्याप्रमाणे पर्यावरणाचे नियमन सुरू झाले. त्या वेळचे कायदे प्रामुख्याने जंगलतोड नियंत्रित करणे, गवताळ प्रदेशातील जमिनींचे संरक्षण करणे इत्यादीबाबतचे होते. पहिला महत्त्वाचा आणि गंभीर नोंद घ्यावा असा कायदा १९८७ मध्ये करण्यात आला. त्यात हवेचे प्रदूषण टाळण्याविषयी तरतूद होती. मात्र या कायद्यातील अनेक तरतुदी अस्पष्ट होत्या. त्यात पळवाटा होत्या. विशेष म्हणजे, खासगी गुंतवणुकीमधून येणारे कारखाने आणि त्यांच्याकडून होणारे प्रदूषण याविषयी फारसा गंभीर विचार नव्हता. याच काळामध्ये फार उच्च दराने आर्थिक विकास होऊ लागला. वातावरण दूषित करणारे अनेक उद्योग दक्षिण चीनच्या किनारी भागात, तसेच पूर्व आणि उत्तर चीनमध्ये आले होते. मात्र पर्यावरणाचा फारसा विचार न करणारे कायदे दूषिततेला प्रतिबंध करू शकत नव्हते. पुढे २०००, २००२ आणि २००३ मध्ये थोडे अधिक जाचक कायदे करण्यात आले. त्यात सल्फर डायऑक्साईड तसेच सल्फरमिश्रित कोळसा आणि प्रदूषण करणाऱ्या इतर पदार्थांबाबत स्पष्ट तरतुदी होत्या. प्रदूषणपातळी मोजण्याच्या पद्धती निश्चित करण्यात आल्या. कायदे अधिक स्पष्ट झाले. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने २००६ मध्ये पाच प्रादेशिक पर्यावरण नियंत्रण संस्था स्थापन करून प्रादेशिक सरकारच्या पर्यावरणविषयक कार्यक्रमांचे मॉनिटरिंग सुरू केले. असे असले तरीही नव्याने सुरू होणाऱ्या उद्योगांची आणि कारखान्यांची संख्या इतकी मोठी होती की, पर्यावरण-विषयक यंत्रणा कमी पडायला लागली. स्थानिक राजकारणी व नोकरशाही यांच्यावर विकास संकल्पनेचा इतका खोल पगडा होता आणि भ्रष्टाचार इतका होता की, पर्यावरण कायदा मोडणाऱ्या उद्योजकांवर कडक कारवाई होऊन दंड वसूल करणे शक्य होत नव्हते. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेमध्ये २००१ मध्ये चीन प्रवेश करीत असताना जगातील सगळ्यात जास्त प्रदूषित पंधरा शहरे चीनमध्ये होती.

क्षी जिनपिंग सत्तेत आले तेव्हा पर्यावरणसमस्येबाबत मोठी जागृती होत होती. त्यामुळे त्यांनी त्यांच्या अजेंड्यामध्ये स्वच्छ पर्यावरण आणि पर्यावरणाचे संवर्धन यावर मोठा भर दिला. विशेष म्हणजे, त्यांनी २०१३ मध्ये कायदे अधिक कठोर करीत चांगल्या अंमलबजावणीवर भर दिला. पर्यावरणसंवर्धनाचा आणि प्रदूषण कमी करण्याचा मोठा कार्यक्रम आखण्यात आला. त्यासाठी महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे व लक्ष्ये देण्यात आली. याच वेळी क्षी यांनी यापुढे स्थानिक अधिकारी व पदाधिकारी यांच्या कामाचे मूल्यमापन करताना पर्यावरणसंवर्धन या विषयात ते किती

काम करतात यालाही महत्त्व देण्याचे जाहीर केले. क्षी जिनपिंग सत्तेत आल्यानंतर पक्षानेही या कामाला प्राधान्य दिले. मात्र तरीही फार कमी कालावधीत अशा प्रकारच्या कार्यक्रमांना मर्यादित यश येते, हेच अधोरेखित होत होते. मुख्य म्हणजे, दूषित पर्यावरण हा प्रश्न सामान्य जनतेच्या जीवनाशी संबंधित असल्याने सर्वसामान्य माणसाला या कार्यक्रमात जोडून घेणे महत्त्वाचे होते. चीनमध्ये सामान्य माणसाला अशा कामात सहभागी करण्यास प्रशासन नाखूष असते. कारण अशा कार्यक्रमातूनही लोकांचे संघटन होऊ शकते. कम्युनिस्ट पक्षाला त्याची भीती वाटते.

सर्वप्रथम बीजिंग, तांजिंग हे प्रदेश तसेच यांगत्सी आणि पर्ल या नद्यांची खोरे हे भाग निवडून चार वर्षांत येथील प्रदूषण १५ ते २५ टक्के कमी करण्याचा धडक कृती कार्यक्रम तयार करण्यात आला. या भागाची निवड प्रथम करण्यात आली, कारण भौगोलिक प्रदेश म्हणून हा चीनच्या एकूण क्षेत्रफळाच्या १४ टक्के इतकाच असला तरी या प्रदेशात चीनची ४८ टक्के लोकसंख्या आहे. चीनमधील एकूण कोळशाच्या वापरापैकी ५२ टक्के वापर या भागात होतो. महत्त्वाचे म्हणजे, या भागातून चीनचे ७१ टक्के राष्ट्रीय उत्पन्न येते. या कार्यक्रमामध्ये सुरुवातीला कोळशाचा वापर कमी करून हवेचे प्रदूषण कमी करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले. बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये यासाठी मोठी तरतूद करण्यात आली. अशाच प्रकारचा कार्यक्रम पुढे २०१५ आणि २०१७ मध्येही घेण्यात आला. २०१५ मधील कार्यक्रमामध्ये दूषित पाण्याचाही समावेश करण्यात आला, तर २०१७ मधील कार्यक्रमामध्ये दूषित जमिनींचाही समावेश करण्यात आला. विशेष म्हणजे- कृती कार्यक्रमाचे तपशील, त्याची उद्दिष्टे आणि ठरवून दिलेली लक्ष्ये जाहीरपणे लोकांच्या नजरेस आणण्यात आली. लोकांचा मर्यादित सहभाग घेण्यात आला. ठरवून दिलेली प्रदूषणपातळी आणि इतर नियम पाळणाऱ्या उद्योगांना इन्सेंटिव्ह दिला गेला, तर पर्यावरण कायद्याचा भंग करणाऱ्यांसाठी मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली. २०१६ ते २०२० च्या पंचवार्षिक योजनेत आणि कार्यक्रमात प्रदूषणपातळी आणखी कमी करण्याची उद्दिष्टे ठेवण्यात आली. शिवाय या कार्यक्रमामध्ये अनेक मोठ्या उद्योगांची रियल टाइम प्रदूषणपातळी मोजण्याची आणि मॉनिटर करण्याची तरतूद करण्यात आलेली होती. जितके दिवस प्रदूषण सुरू राहील अथवा प्रदूषण कायदा मोडला जाईल, तितके दिवस मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली होती.

याचा परिणाम दिसून आला आणि चीनमधील अनेक ठिकाणी दूषित हवेची पातळी कमी होऊ लागली. अलीकडच्या एका अभ्यासानुसार २०१३ ते २०१६ या चार वर्षांत बीजिंगमधील PM २.५ पातळी ८९.५ वरून ७३ झाली. इतर ७४ शहरांतील पातळी २०१५-१६ या वर्षात ढोबळ मानाने ९ टक्क्यांनी कमी झाली. ऊर्जा-निर्मितीतील कोळशाचे प्रमाण ६२ टक्क्यांवर आले. या वेळच्या कार्यक्रमांमध्ये काही विशिष्ट एनजीओंना पर्यावरण कायद्याचा भंग करणाऱ्या आणि विहित पातळीपेक्षा जास्त प्रदूषण करणाऱ्या उद्योजकांच्या विरोधात कोर्टात केस दाखल करण्याचे अधिकार देण्यात आले. अशा उद्योगांना मदत करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनादेखील आता कोर्टात खेचता येते. या काळामध्ये काही चांगले संस्थात्मक बदल करण्यात आले आणि काही नव्या पद्धती सुरू झाल्या. सरकारने २०१५ मध्ये चिंगहुआ विद्यापीठाचे कुलगुरू आणि पर्यावरणविषयक संशोधक चेन जिनिंग यांना पर्यावरणमंत्री म्हणून नेमले. त्यामुळे या कार्यक्रमाला विश्वासार्हता आली. महत्त्वाच्या पदावर पक्षाचा वा सरकारी अधिकारी न नेमता बाहेरच्या तज्ज्ञ व्यक्तीला नेमल्याने उद्योजक आणि स्थानिक राजकारणी व अधिकारी यांच्यातील साटेलोटे कमी झाले.

तांजिन येथील औद्योगिक क्षेत्रात २०१५ मध्ये नियमबाह्य पद्धतीने एका गोदामामध्ये ठेवलेली स्फोटके तसेच ज्वालाग्राही रसायनांचा स्फोट होऊन अनेक इमारती नष्ट झाल्या आणि १५० हून अधिक लोक मृत्यू पावले. जवळच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झाल्या. चौकशी केल्यानंतर असे लक्षात आले की, या गोदामाला आणि प्रकल्पाला परवानगी देत असताना पर्यावरणविषयक तांत्रिक अभ्यासच केलेला नव्हता किंवा जुजबी अभ्यास करून परवानगी दिली होती. तेव्हापासून सरकारने प्रकल्पांमध्ये पर्यावरणविषयक तांत्रिक अभ्यासाच्या (Environmental Impact Analysis) सुधारित पद्धती लागू केल्या.

'अंडर द डोम' नावाची चीनमधील पर्यावरणाची परिस्थिती विशद करणारी डॉक्युमेंटरी २०१५ मध्ये इंटरनेटवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली. त्यामध्ये चीनमध्ये होत असणारा पर्यावरणाचा ऱ्हास आणि सरकार

करीत असलेले प्रयत्न या दोन्हींचा परामर्श घेतला होता. मात्र सरकारने या डॉक्युमेंटरीवर बंदी घातली, तसेच पत्रकार चाय जिंग– ज्याने ही डॉक्युमेन्टरी तयार केली– याच्यावर कारवाई सुरू झाली. याचे कारण असे की, चाय जिंग यांनी पूर्वी लोकशाही आणि स्वातंत्र्य यांची मागणी करणाऱ्या राजकीय चळवळीमध्ये भाग घेतला होता. मात्र असे असले तरीही त्यानंतर मा जून आणि वँग कँफा यासारख्या ॲक्टिव्हिस्टनी पर्यावरणाची चळवळ सुरू ठेवली आहे. गेल्या पंधरा वर्षांमध्ये सहा लाख उद्योजकांनी आठ लाखांहून जास्त केलेली कायद्याची उल्लंघने एनजीओंनी विविध मार्गांनी सरकारच्या नजरेला आणली. त्यांनी ब्लू स्काय मॅपसारखी ॲप्स तयार करून आपल्या आजूबाजूला प्रदूषण किती आहे, कोठून होते आहे, तसेच त्याबाबत कोणत्या तक्रारी आहेत, त्या तक्रारींची दखल कशी घेतली जात आहे याबद्दलची साद्यंत रिअल टाइम माहिती मिळते. यातील सर्व डेटा समाजमाध्यमांतून येत असल्याने हे वापरून कोणत्याही माणसाला त्याच्या जवळच्या भागाच्या पर्यावरणाचा मागोवा घेता येतो.

पर्यावरणात सुधारणा करण्यासाठी चीनमध्ये सध्या सरकार बऱ्यापैकी काम करीत आहे. क्षी जिनपिंग यांनी संस्थात्मक अनेक सुधारणा करून काही नावीन्यपूर्ण पद्धतीने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालविला आहे. मात्र तरीही चीनमध्ये अजूनही बरेच काम करणे शिल्लक आहे. त्यामुळेच चीनने अपारंपरिक ऊर्जास्रोतांवर चांगले आणि नावीन्यपूर्ण काम केले असले तरीही जलद आर्थिक विकास व्हावा, यासाठी अजूनही चीनमध्ये कोळशाचा व प्रदूषण करणाऱ्या पारंपरिक ऊर्जास्रोतांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. दुसरा मुद्दा असा आहे की– घाईघाईने प्रदूषण कमी करण्याची उपाययोजना करीत असताना प्रदूषण करणारे कारखाने हे अधिक प्रदूषित विभागातून हलवून ग्रामीण भागाकडे आणि कमी प्रदूषित विभागाकडे नेण्यात आले. त्यामुळे प्रदूषण कमी करण्यासाठी मुळात काही न करता केवळ उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी तात्पुरती उपाययोजना करण्यात आली. काही बाबतींत चीनमध्ये हे कारखाने इतरत्र हलवणे शक्य नव्हते, त्यामुळे ते चीनमधून हलवून आफ्रिका आणि आशियामधील इतर मागास भागांमध्ये नेण्यात आले.

मोठ्या आर्थिक विकासाची गरज पूर्ण करणारी तसेच सर्व लोकांना उत्तम आणि निरोगी जीवन प्रदान करणारी– अशा दोन्ही गरजा सम्यक्‌पणे एकत्र बांधणारी संतुलित विकासपद्धती चीनला विकसित करता आलेली नाही. अमेरिकेबरोबर स्पर्धाही करायची आहे आणि इतर देशांवर आर्थिक तसेच लष्करी बाबतींत वर्चस्व मिळवायचे आहे. लोकांना स्वातंत्र्य न देता, लोकशाही पद्धतीने कारभार न करता चीनमधील अंतर्गत प्रश्न हुकूमशाही पद्धतीने सोडवायचे आहेत; तसेच राजकीय सुधारणाही करायच्या नाहीत. या परस्परविरोधी संकल्पनांमुळे चीनला अथक मेहनत घेऊनही पर्यावरणसंवर्धनात अद्यापही म्हणावे तसे यश आलेले नाही.

उच्च राहणीमान असणारा मध्यम व उच्च–मध्यमवर्गीयांचा समाज आणि आंतरराष्ट्रीय दृष्ट्या एक बलशाली देश– हे स्वप्न चीनने उरी बाळगले आहे; मात्र यात अंतर्विरोध आहे. आर्थिक विकास आणि पर्यावरणसंवर्धन हे विरुद्ध दिशेला प्रवास करणारे प्रवासी आहेत. भौतिक व औद्योगिक प्रगती जितकी अधिक तितके पर्यावरणीय प्रश्न जटिल, असा हा अंतर्विरोध! महत्त्वाकांक्षी आर्थिक विकासाची कास धरताना पर्यावरणसंवर्धन घाईघाईने करण्याचा प्रयत्न केला, तर अशा प्रयत्नांना मर्यादितच यश येणार. सध्याच्या तंत्रज्ञानाने, विकासपद्धतीने व विकास दृष्टीने हा अंतर्विरोध नष्ट होईल असे दिसत नाही. प्रदूषण वाढविणाऱ्या तंत्रज्ञानाचा त्याग करून अपारंपरिक ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर वापर करणे, मोठी धरणे व मोठे प्रकल्प यांच्याशिवाय विकास करण्याचे तंत्र विकसित करणे, मोठ्या व दिखाऊ प्रकल्पांचा सोस कमी करणे, इत्यादी उपाययोजना केल्या तर हा अंतर्विरोध नष्ट होऊ शकेल. शिवाय पर्यावरणाचे प्रश्न हे केवळ सरकारने करावयाच्या उपाययोजनांनी सुटू शकत नाहीत, त्यासाठी लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर हवा असतो. ते लोकशाहीत होऊ शकते. त्यासाठी लोकांना आचाराचे–विचाराचे स्वातंत्र्य देण्याची आवश्यकता असते. गेल्या पंधरा वर्षांमध्ये प्रयत्न करून प्रदूषण कमी करून पर्यावरण सुधारण्याचा प्रयत्न केला, हे खरे. काही बाबतींत त्यांना काही प्रमाणात यशही आले. मात्र भविष्यकाळात स्वच्छ पर्यावरणाचा ध्यास घेणाऱ्या चीनला या विषयात फार मोठी राजकीय इच्छाशक्ती दाखवावी लागणार आहे.

**सतीश बागल,** नासिक
bagals89@gmail.com
Mob.9820864755

युवकदिन विशेष

दत्तप्रसाद दाभोळकर

# विवेकानंदांना निरोप देण्यापूर्वी

माझी खात्री आहे, शून्यापासून सुरुवात करून सर्वधर्म परिषदेतल्या अद्‌भुत यशापर्यंतचा विवेकानंदांचा प्रवास तुम्ही नीटपणे समजून घेतला आहे. ‘ज्याची हिंमत हरली नाही, तो आयुष्यात कधीच हरत नाही’ हे तुमच्या लक्षात आलंय आणि ‘मी यशस्वी होणारच’ म्हणून तुमच्या आयुष्यातली अथक, अपराजित, दमदार वाटचाल यापुढे कायम सुरू राहणार आहे. मोठं झाल्यावर तुम्ही विवेकानंदांना नीटपणे आणि पूर्णपणे समजून घेणार आहात, हेसुद्धा मला माहीत आहे.

मात्र त्यांना निरोप देत असतानाच त्यांच्या आयुष्यातल्या तीन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेऊ या :

१) विवेकानंद अमेरिकेत का गेले होते?

२) भारतात परत आल्यावर सनातनी मंडळींनी त्यांना केवढा आणि कसा त्रास दिला?

३) या सनातनी मंडळींवर मात करता येईल, असं स्वत:चं व्यक्तिमत्त्व विवेकानंदांनी कसं घडवलं?

सर्वधर्म परिषदेतल्या अभूतपूर्व यशानंतर केवळ तीन महिन्यांनी, म्हणजे २८ डिसेंबर १८९३ रोजी हरिपद मित्रा यांना पत्र पाठवून त्यांनी सांगितलं, ‘मी या देशात केवळ आपलं कुतूहल पूर्ण करण्यासाठी किंवा गंमत पाहण्यासाठी आलेलो नाही. ‘आपण फार मोठं नाव मिळवावं’ हा विचार तर माझ्या मनात अजिबात नव्हता. माझ्या देशाचं नवनिर्माण करण्याच्या काही योजना माझ्या मनात आहेत. या योजनांना उपयोगी येतील, अशी माणसं किंवा अशा रचना या देशात आहेत का, हे मला पाहायचं आहे.

आपल्या मनातली रचना या पत्रात विवेकानंदांनी सांगितलेली नाही. खरंतर हरिपद मित्रा त्यांचे जवळचे मित्र! मात्र ‘मसलतीचं बोलू नये; बोलायचं लिहू नये’ हा रामदास मंत्र विवेकानंदांनी आजन्म पाळलाय. तुम्हालाही आयुष्यात यश मिळवायचं असेल, तर हा मंत्र नीटपणे समजून घेऊन व्यवहारात वापरता आला पाहिजे. कुणाला कोणती गोष्ट सांगायची आणि कोणती गोष्ट चुकूनही सांगायची नाही, याचं भान हवं.

खरंतर आपल्या मनातली ही योजना त्यांनी त्यांचे मित्र प्रा.राईट यांना सांगितली आहे. त्यांच्यामुळेच तर विवेकानंद

> प्रचंड मिरवणुका, रस्त्यावर कमानी, घराघरांतून फुलांचा वर्षाव, मिरवणुकीत समोर हत्ती, विवेकानंद रथात बसलेले, घोड्यांना रांगेत उभं करून लोक रथ ओढताहेत... सारं वातावरण चैतन्यमय होतं... या वातावरणाचा फायदा घेऊन विवेकानंदांनी सनातन व्यवस्थेवर घणाघाती प्रहार केले. ते कुंभकोणम इथे आले. कुंभकोणम हा चेन्नई प्रांतातला सनातनी ब्राह्मणांचा बालेकिल्ला. तिथल्या ब्राह्मण तरुणांसमोर भाषण देताना ते म्हणाले, ‘ब्रह्मवृंद हो, तुमच्या आणि माझ्या जातीची मृत्युघंटा वाजवण्यासाठी मी इथे उभा आहे. आपण सुखाने मरण पावलो नाही, तर आपण कुजू. त्यामुळे आपल्याला आणि इतरांनाही त्रास होईल. तसं काही होऊ नये म्हणून आपण सांगितलं पाहिजे, ‘आम्ही उच्चवर्णीय आहोत. आम्ही अर्थार्जनासाठी असलेल्या सर्व नोकऱ्या दलितांसाठी राखून ठेवून स्वयंरोजगाराकडे वळणार आहोत’

सर्वधर्म परिषदेत सामील झाले. मात्र त्यांच्या मनातली ही योजना ते कशा प्रकारे अमलात आणणार होते, हे त्यांनी सर्वधर्म परिषदेनंतर फक्त एक महिन्याने, म्हणजे २६ ऑक्टोबर १८९३ रोजी राईट यांना पाठवलेल्या पत्रात लिहिलंय. ते पत्र असं आहे :

'अमेरिका हीच एक अशी जागा आहे, जिथे कोणतीही गोष्ट यशस्वी होण्याची शक्यता आहे, पण विचारान्ती मी माझ्या योजनेबद्दल बोलणं अजिबात सोडून दिलं आहे. कारण माझ्या योजना मांडण्याने जेवढे लोक येतील, त्यापेक्षा खूप अधिक माणसं 'हा मूर्तिपूजक काय बोलतो' या उत्सुकतेमुळेच भाषण ऐकायला येणार! अर्थात, मला माझं सारं काम माझ्या योजनेसाठीच करायचं आहे, पण ती योजना प्रत्यक्ष न मांडता, मी इतर वक्त्यांप्रमाणे भाषणं देणार आहे. माझं इथे फार चांगलं चाललं आहे, हे ऐकून तुम्हाला आनंद होईल. पैसे मिळवण्याच्या बाबतीत मला आणखीही पुष्कळ यश मिळेल, अशी मला आशा आहे. अर्थात, या धंद्यात मी अजून फार कच्चा आहे, पण लवकरच मी हा सगळा उद्योग शिकेन. माझी योजना यशस्वी होईल, असं मला वाटतं आणि त्याचं श्रेय तुम्हालाच आहे.'

आपल्या या योजना चार पत्रांमधून आपला शिष्य, आपला गुरुबंधू आणि आपले मित्र यांना विवेकानंदांनी सांगितल्या आहेत. पहिलं पत्र त्यांचे गुरुबंधू शशी म्हणजेच श्रीरामकृष्णानंद यांना त्यांनी १९ मार्च १८९४ रोजी लिहिलंय. त्यात ते सांगताहेत, 'माझ्या साऱ्या योजना मी या लहानशा पत्रात सविस्तर लिहू शकत नाही. मात्र आपलं सारं राष्ट्र आज खेड्यात राहत आहे. खेड्यातले हे आपले बांधव अर्धपोटी, अर्धनग्न आणि अज्ञानी आहेत. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन या तीनही राजवटींनी त्यांना पायाखाली तुडवलं आहे. त्यामुळे 'आपण माणूस आहोत' हेच ते विसरून गेलेत. हे गरीब लोक अगदी खेड्यातल्या शाळेत येऊनही शिक्षण घेऊ शकणार नाहीत. 'पर्वत महंमदाकडे येत नसेल, तर महंमदाने पर्वताकडे गेलं पाहिजे'. हे कार्य करण्यासाठी प्रथम माणसं हवीत आणि मग पैसा. गुरुदेवांच्या कृपेने मला भारतातील प्रत्येक गावात दहा-पंधरा लोक खात्रीने मिळतील. पैसा गोळा करण्यासाठी मी सर्वत्र हिंडलो, पण भारतातल्या लोकांकडून पैसा मिळवण्याची आशाच नको. आज ते स्वार्थाचे मूर्तिमंत पुतळे आहेत. म्हणूनच तर मी इथे, अमेरिकेत आलो आहे. या ठिकाणी मी स्वत: खपून पैसे मिळवीन आणि मग मायदेशात परत जाऊन जीवनातलं माझं ध्येय प्रत्यक्षात आणण्यासाठी उरलेलं आयुष्य वेचीन. आज भारतात लाखो संन्यासी आहेत. ते भारतभर हिंडून लोकांना धर्म शिकवतात. अरे, उपाशी पोटी कधी धर्म शिकविता येईल का? आपण खेड्यात जाऊन इतिहास, भूगोल, विज्ञान, शेती कशी करायची हे शिकवलं पाहिजे. मला हे काम करणाऱ्या संन्याशांची संघटना उभारायची आहे.'

आपला शिष्य अळसिंगा पेरुमल याला २८ मे रोजी पाठवलेल्या पत्रात त्यांनी सांगितलं आहे, 'तुम्ही पैसे गोळा करून काही निधी उभारा. तुम्हाला ते जमत नसेल, तर मी पैसे पाठवतो. मात्र त्या पैशातून काही मॅजिक लॅन्टर्स (म्हणजे प्रकाशचित्रं दाखवणारं उपकरण), नकाशे, पृथ्वीचा गोल, लोहचुंबक, रासायनिक पदार्थ विकत घ्या. दररोज संध्याकाळी खेड्यातल्या गरीब आणि दलित लोकांना, अगदी मुसलमान, ख्रिश्चन व अस्पृश्यांनादेखील एके ठिकाणी जमवा. प्रथम त्यांना धर्मासंबंधी उपदेश द्या आणि मग मॅजिक लॅन्टर्न आणि इतर वस्तूंच्या साहाय्याने त्यांना त्यांच्या भाषेत खगोलशास्त्र, भूगोल, विज्ञान शिकवा... 'मासिकं, वर्तमानपत्रं काढणं' हे तुमचे विचार तसे ठीक आहेत, पण अगदी थोडं जरी असलं, तरी प्रत्यक्ष कार्य हे सदैव होणाऱ्या वटवटीपेक्षा आणि बोरूबहाद्दर होण्यापेक्षा शतपटीने चांगलं आहे.'

त्याच वेळी अखंडानंदांना पत्र पाठवून त्यांनी सांगितलं, 'खेत्रीत जे कुणी गरीब आणि खालच्या जातीतले लोक असतील, त्यांच्या घरी जा आणि त्यांना खरा धर्म समजावून द्या. मात्र त्याचबरोबर त्यांना इतिहास, भूगोल आणि विज्ञान शिकवा. जोपर्यंत गरीब आणि अस्पृश्य यांच्यासाठी प्रत्यक्ष कष्ट घेऊन तुम्ही काही करत नाही, तोवर 'आपण साधू आहोत' म्हणून पंचपक्वान्नांवर ताव मारत, तोंडाने 'श्रीरामकृष्ण हरी' म्हणत आळसाने मजेत दिवस पुढे ढकलल्याने काहीही साध्य होणार नाही. खेड्यात जा, तिथल्या लोकांना धर्म आणि जीवनोपयोगी विद्या शिकवा.'

२० जून १८९४ रोजी जुनागडच्या दिवाणसाहेबांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपली ही योजना सविस्तरपणे लिहिली आहे. 'माझ्या मते, देश पुन्हा उभा करण्यासाठी आपल्या खेड्यांतल्या लोकांना साक्षर करून त्यांना जीवनोपयोगी शिक्षण दिलं पाहिजे. मात्र हे काम खूप कठीण आहे. कारण आपलं खरं राष्ट्र आज फाटक्या झोपडीत राहतं आहे; आणि हिंदू, मुसलमान आणि ख्रिश्चन शासकांच्या पायाखाली सतत तुडवले गेल्यामुळे 'आपण माणूस आहोत'

हेच हे लोक विसरून गेलेत. ‘जे वरच्या जातीतले आहेत आणि ज्यांच्याजवळ पैसा आहे, त्यांच्या टाचेखाली चिरडून जाण्यासाठी आपण जन्माला आलेलो आहोत’ अशी त्यांची समजूत आहे.

‘त्यांना साक्षर करून जीवनोपयोगी शिक्षण देण्यापासून आपल्याला सुरुवात करावी लागेल. प्रत्येक खेड्यात शाळा काढण्याएवढा पैसा आपल्याकडे नाही; आणि समजा, आपण शाळा काढल्या, तरी मुलं शाळेत येणार नाहीत. त्यांना शेतात काम करायला किंवा गुरं राखण्यासाठी बाहेर जावं लागणार. म्हणून मी एक मार्ग शोधून काढला अहे. गावातले लोक शाळेत जाणार नाहीत, मात्र शाळा गावातल्या लोकांपर्यंत जाईल! म्हणजे काय ते सांगतो. दिवसभरातले काबाडकष्ट संपल्यावर खेड्यातले लोक पारावर बसून बिड्या फुंकत दिवसभरातल्या सुखदु:खाच्या गोष्टी करतात; मुलं जवळ खेळत असतात. अशा वेळी दोन सुशिक्षित संन्यासी तिथे जाऊन, त्यांचे मित्र बनून त्यांना साक्षर बनवतील. ज्ञान, विज्ञान, धर्म शिकवतील. शेती अधिक चांगली कशी करता येईल, ते त्यांना सांगतील. हे काम करण्यासाठी अनेक तरुण मला भारतात मिळतील. त्या कामासाठी लागणारे पैसे आता मी अमेरिकेत भाषणं देऊन मिळवीन.’

२३ जून १८९४ रोजी म्हैसूरच्या राजेसाहेबांना पत्र पाठवून आपल्या मनातली ही योजना त्यांनी पुन्हा सविस्तरपणे मांडली आहे. विवेकानंदांनी एका पाठोपाठ एक पाठवलेल्या या पत्रांमुळे ते आपल्या या योजनेत मनापासून कसे गुंतले होते किंवा खरंतर कसे झपाटले होते, हे आपल्या लक्षात येतं. मात्र विवेकानंदांच्या मनातली ही योजना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. भारतातले गुरुबंधू आणि मित्र यांच्याकडून फारसा किंवा खरंतर अजिबात प्रतिसाद नव्हता. त्यांचा शिष्य अळसिंगा पेरुमल याने तर पत्र पाठवून कळवलं, ‘असं काही करणं आम्हाला जमेल, असं वाटत नाही. तुम्ही परत आल्यावर बघू!’ त्याहूनही क्लेशदायक गोष्ट म्हणजे, त्यांची भाषणं आयोजित करणाऱ्या मंडळींनी त्यांना फसवलं. ११ जुलै १८९४ रोजी अळसिंगा पेरूमल यांना पत्र पाठवून त्यांनी सांगितलं, ‘डेट्रॉईट इथल्या एका व्याख्यानाचे मला ९०० डॉलर्स, म्हणजे २७०० रुपये मिळाले. अन्य एका ठिकाणी मला एका व्याख्यानाला २५०० डॉलर्स म्हणजे ७५०० रुपयांचं उत्पन्न झालं, पण माझ्या हातात केवळ २०० डॉलर्सच पडले! या



दुष्ट लेक्चर कंपनीने मला फसवलं’. ‘भाषणं देऊन पैसे मिळवता येतील’ हे स्वप्नरंजन असल्याचं त्यांना समजलं. ते जानेवारी १८९७ मध्ये भारतात आले, त्या वेळी निष्कांचन अवस्थेत होते. १८९९ च्या जून महिन्यात विवेकानंद दुसऱ्यांदा इंग्लंड-अमेरिकेत गेले. ते डिसेंबर १९०० मध्ये परत आले. या वेळी ‘भाषणांतून परतीच्या प्रवासाचं तिकिटसुद्धा मी विकत घेऊ शकत नाही’ ही खंत त्यांनी अनेक पत्रांतून व्यक्त केली आहे. १७ जून १९०० रोजी पाठवलेल्या पत्रात त्यांनी म्हटलंय, ‘आता भाषण हे केवळ माझ्या उपजीविकेचं साधन म्हणून उरलंय.’ त्यामुळे असेल, विवेकानंदांनी आपल्या शिष्यांना पाठवलेल्या एका पत्रात सांगितलंय, ‘आयुष्यात यशस्वी व्हायचं असेल, तर सर्वप्रथम तुम्हाला व्यवहार जमला पाहिजे. पैशाच्या व्यवहारात प्रत्यक्ष बापावरही विश्वास ठेवायचा नसतो!’

आपल्या देशातल्या तुमच्या-माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसांनी विवेकानंदांवर भरभरून प्रेम केलंय आणि त्याच वेळी आपल्या देशातल्या सनातनी मंडळींनी विवेकानंदांना मरणयातना भोगायला लावल्यात. सर्वधर्म परिषदेतल्या त्यांच्या भाषणानंतर आपल्या देशातल्या सर्वसामान्य माणसांच्या आनंदाला उधाण आलं होतं. मात्र आपल्या देशातल्या एकाही शंकराचार्याने वा एकाही

मठाधिपतीने त्यांचं अभिनंदन तर राहूच दे, पण साधं कौतुकसुद्धा केलं नाही. आपल्या मनातली याबाबतची खंत विवेकानंदांनी २० जून १८९४ रोजी हरिदास बिहारीलाल देसाई यांना पत्र पाठवून सांगितली. ' 'मी हिंदूंचा प्रतिनिधी आहे' असं अमेरिकी लोकांना स्पष्टपणे सांगण्याचा प्रयत्न, साधा प्रयत्नसुद्धा कोणाही शंकराचार्यांनी, मठाधिपतींनी वा हिंदू संघटनांनी केलेला नाही. उलटपक्षी हे लोक अमेरिकी लोकांना सांगत आहेत की, मी एक पक्का भोंदू माणूस असून अमेरिकेत आल्यावर मी संन्याशाची वस्त्रं धारण केली आहेत; 'हा खरा संन्यासी आहे, हा कुणी फसवणारा माणूस नाही, हा आमच्या हिंदू धर्माचा प्रतिनिधी आहे' एवढंदेखील अद्याप सांगितलेलं नाही. हे एवढे थोडे, चार शब्द, पण तेदेखील माझ्या देशबांधवांनी माझ्यासाठी अजून खर्च केलेले नाहीत! आपल्या देशबांधवांची खरोखरच धन्य आहे!'

खरं तर विवेकानंदांनी या पत्रात फारच सौम्य शब्द वापरले आहेत, कारण वास्तवात, हे त्यांचे देशबांधव त्यांना अमेरिकेत हालाहल प्राशन करायला लावत होते. 'युनिटी अँड दि मिनिस्टर' या ब्राह्मो समाजाच्या मुखपत्राने लिहिलं, 'बाबू नरेंद्रनाथ दत्त तथा विवेकानंद यांना आम्ही नववृंदावन थिएटर या नाट्यसंस्थेच्या रंगभूमीवर काम करणारा एक नट म्हणून ओळखतो; एक तत्त्वज्ञ म्हणून नाही.' 'इंडियन रिव्ह्यू'मधले शब्द आहेत, 'विवेकानंद हिंदू धर्माचा विचार सांगतात असं समजणं हास्यास्पद आहे.' आता तुम्हाला फार मोठं यश मिळालं आणि घरातली माणसंच जर तुमचं कौतुक करण्याऐवजी तुमची खिल्ली उडवत असतील, तर शेजारी गप्प बसतील. अमेरिकेतल्या रमाबाई सर्कलमधून त्यांच्याबद्दल कंड्या पिकवायला सुरुवात झाली. त्यांच्या प्रवक्त्या मॅक्कीन यांनी लिहिलं, 'या माणसाला धर्म वगैरे काही फारसा माहीत नाही आणि बॉस्टनमधल्या काही स्त्रियांनी 'हा देखणा हिंदू आमच्यावर त्याच्या संमोहन शक्तीचा प्रभाव टाकतो' असं सांगितलं आहे.'

कुत्र्याला भुंकू द्यावं, हत्तीने आपली डौलदार वाटचाल सुरू ठेवावी, हे विवेकानंदांना माहीत होतं. फळांनी लगडलेल्या झाडावरच लोक दगड मारतात, हेही त्यांना माहीत होतं. सूर्यावर थुंकणाऱ्या लोकांकडे सूर्य कधी लक्ष देत नाही... हे सारं खरं! मात्र या सगळ्या प्रकारात दोन कारणांनी त्यांना फार यातना झाल्या. ते प्रा.राईट यांच्यामुळे सर्वधर्म परिषदेत उभे राहिले होते आणि या तुफानी अपप्रचाराचा त्यांच्यावरही परिणाम होत होता. त्यामुळे मे १८९४ मध्ये राईट यांना पत्र पाठवून विवेकानंदांनी सांगितलं, 'बाकी ढीगभर लोक काय म्हणतात, याला मी अजिबात महत्त्व देत नाही. कारण शहाणा माणूस दुसऱ्याच्या टीकेने कधी विचलित होत नाही. त्याला उत्तर देण्यासाठी आपला वेळ वाया घालवत नाही. मात्र तुमच्याबद्दल असं नाही. तुम्ही कोणतेही प्रश्न विचारा, त्यांना उत्तर देण्यासाठी मी बांधलेला आहे. तुम्हाला प्रथम सांगितलं होतं, तेच पुन्हा सांगतो- 'माझे देशबांधव भयानक दैन्य-दुःखात खितपत पडलेले आहेत. त्यांना त्यातून बाहेर काढण्याचा मार्ग मी शोधतो आहे.' '

त्याच वेळी त्यांनी श्रीमती सारा ओली बूल यांना पत्र पाठवलं. विवेकानंद त्यांना धीरमाता- म्हणजे परदेशात मला धीर देणारी माझी आई - म्हणत. २१ मार्च १८९५ रोजी धीरमाता यांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी सांगितलंय, 'माझ्याबद्दल रमाबाई सर्कलमधून ज्या कंड्या पिकवण्याचा प्रयत्न होतो आहे, तो ऐकून मला फार नवल वाटतं. त्यांतली एक कथा अशी सांगितली जाते आहे की, माझ्या लफडेबाज वागणुकीमुळे डेट्रॉइटला मिसेस बॅगले यांना आपल्या घरातल्या मोलकरणीला कामावरून काढून टाकावं लागलं. पाहिलंत धीरामाता! माणूस कितीही चांगला असला, चांगला वागला, तरीही त्याच्या अंगावर घाण उडवणारे काही जण भोवताली असतातच.' या पत्रात विवेकानंदांनी 'मला नवल वाटतं' असं लिहिलं आहे. मात्र या प्रकारामुळे त्यांना जी फार मोठी भीती वाटत होती, ती त्यांनी धीरमातांना सांगताना पुढे एकदा म्हटलंय, 'मला माझ्या आईची काळजी वाटते. तिचा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. तिला स्वत:ला माझ्या काही निर्णयांमुळे खूप त्रास झाला आहे. मात्र त्या वेळी ती म्हणाली होती, 'आपल्या देशाचं भलं व्हावं, म्हणून नरेंद्र मला सोडून बाहेर पडलाय. मला त्याच्या या वागण्याचा गर्व वाटतो. त्याच्याहून लहान असलेल्या माझ्या दोन्ही मुलांनी देशासाठी असं काही करावं, असं मला वाटतं.' धीरमाता, आता मला सांगा, 'आपला हा मुलगा अमेरिकेत जाऊन बायांना फशी पाडतोय' असं तिला कळलं, तर तिला किती मरणप्राय यातना होतील हा विचार मनात येऊन मला कधी रात्र रात्र झोप येत नाही.' यावर धीरमाता यांनी त्यांना सांगितलं, 'तुम्ही मला आई मानता. माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. तर मग तुमच्या आईचा तुमच्यावर केवढा विश्वास असेल! 'माझा नरेंद्र असं काही

स्वप्नातही करणार नाही' असं ती आत्मविश्वासाने सर्वांना सांगेल. आईचा मुलावरचा विश्वास आणि त्या विश्वासाला तडा जाईल, असं मुलाने चुकूनही न वागणं एवढंच या जगात खरं आहे!'

जानेवारी १८९७ मध्ये विवेकानंद अमेरिका, इंग्लंड इथली तुफानी भाषणं संपवून भरतात परत आले. मात्र परदेशातून येताना त्यांनी फारसे, खरं तर अजिबात पैसे बरोबर आणले नव्हते. भारतात परत आल्यावर या देशातल्या भोळ्याभाबड्या जनतेने त्यांचं दैवदुर्लभ असं स्वागत केलं! प्रचंड मिरवणुका, रस्त्यावर कमानी, घराघरांतून फुलांचा वर्षाव, मिरवणुकीत समोर हत्ती, विवेकानंद रथात बसलेले, घोड्यांना रांगेत उभं करून लोक रथ ओढताहेत... सारं वातावरण चैतन्यमय होतं...

या वातावरणाचा फायदा घेऊन विवेकानंदांनी सनातन व्यवस्थेवर घणाघाती प्रहार केले. ते कुंभकोणम इथे आले. कुंभकोणम हा चेन्नई प्रांतातला सनातनी ब्राह्मणांचा बालेकिल्ला. तिथल्या ब्राह्मण तरुणांसमोर भाषण देताना ते म्हणाले, 'ब्रह्मवृंद हो, तुमच्या आणि माझ्या जातीची मृत्युघंटा वाजवण्यासाठी मी इथे उभा आहे. आपण सुखाने मरण पावलो नाही, तर आपण कुजू. त्यामुळे आपल्याला आणि इतरांनाही त्रास होईल. तसं काही होऊ नये म्हणून आपण सांगितलं पाहिजे, 'आम्ही उच्चवर्णीय आहोत. आम्ही अर्थार्जनासाठी असलेल्या सर्व नोकऱ्या दलितांसाठी राखून ठेवून स्वयंरोजगाराकडे वळणार आहोत' मात्र दलितांसाठी शंभर टक्के आरक्षण ठेवूनही उपयोग नाही. कारण आपण त्यांना पाच हजार वर्षं ज्ञानापासून वंचित ठेवलंय. त्यामुळे आम्हाला एक शिक्षक लागत असेल, तर त्यांना दहा शिक्षक लागतील. त्यांच्यासाठी आपल्याला दहा पट अधिक चांगल्या शिक्षणाची सोय करायची आहे.'

सनातन धर्मावरचे हे आघात इथेच थांबत नाहीत. त्या वेळी गोहत्या बंदीची चर्चा जोरात सुरू होती. विवेकानंद मालमदुरा इथे गेले होते. तिथे भाषण देताना त्यांनी सांगितलं– 'रूढी, परंपरा म्हणजे धर्माज्ञा नव्हे; धर्मही नव्हे. आपल्याकडे जवळ जवळच्या खेड्यांतली ग्रामदैवतं वेगळी आहेत; रूढी आणि परंपराही वेगळ्या आहेत. त्या केवळ वेगळ्या आहेत, असं नव्हे, तर अनेकदा पूर्णपणे परस्परविरोधी आहेत. तुम्हाला माहीत आहे, एक वेळ या देशात गोमांस भक्षण केल्याशिवाय ब्राह्मण हा ब्राह्मण होऊ शकत नव्हता. आपल्या वेदांत तर अगदी स्पष्टपणे सांगितलंय, 'तुमच्या घरी राजा किंवा फार मोठा संन्यासी आला, तर गाय किंवा बैल कापून त्याच्या मांसाचं रुचकर जेवण त्याला द्या' पण काळ बदलला. या देशातल्या विचारवंतांच्या लक्षात आलं की, 'हा कृषिप्रधान देश आहे. गोवंश वाचला पाहिजे, म्हणून त्यांनी एक रूढी निर्माण केली.' आज काळ बदलला असेल, भाकड गाई-बैलांचं पालनपोषण करणं शेतकऱ्यांना त्रासदायक असेल, तर ती रूढी, ती परंपरा आपण ठामपणे नाकारली पाहिजे.'

मात्र एवढं स्पष्टपणे सांगूनही ऐकतील, तर ती सनातनी मंडळी कसली! भाषणाचे दौरे संपवून विवेकानंद बेलूर मठात परत आले. त्यांना भेटायला मुंबईहून काही गोरक्षक आले. त्या वेळी ते गोरक्षक आणि विवेकानंद यांच्यात जी चर्चा झाली, ती एका शिष्याने लिहून ठेवलेली आहे. तो सारा प्रसंग फारच मजेशीर आहे.

ते गोरक्षक विवेकानंदांना म्हणाले, ''स्वामी, आम्ही भाकड गाईंसाठी पांजरपोळ चालवितो. कसायाबरोबर मारामारी करून वा त्यांना पैसे देऊन भाकड गाईंना आणतो. त्यांची काळजी घेतो. त्यांना अन्नपाणी देतो. तुम्ही आम्हाला पैसे द्या, नाही तर किमान आम्हाला आशीर्वाद द्या.''

विवेकानंद त्या गोरक्षकांना म्हणाले, ''अरे, आज मध्य प्रदेशात माणसं भुकेने तडफडून मरताहेत. काही काळ या गाईंना विसरा आणि सर्व पैसे भुकेने मरणाऱ्या त्या माणसांच्या तोंडात अन्न पडावं म्हणून पाठवा.''

मात्र ती सनातनी मंडळी चलाख होती. ती म्हणाली, ''स्वामी, तुम्ही सांगताय, ते तर आम्हालाही माहीत आहे. पण आपले धर्मग्रंथ सांगतात, 'ती माणसं मरताहेत, कारण त्यांनी गेल्या जन्मात पाप केल होतं.' त्यामुळे आपण त्यांना मदत करण्याचं काही कारण नाही. त्या माणसांनी आपल्या कर्माचं फळ भोगलं पाहिजे.''

शिष्य लिहितो, ''ते ऐकून विवेकानंदांच्या फुलांसारख्या डोळ्यांमधून अग्निज्वाळा बाहेर पडत असल्यागत वाटलं. विवेकानंद त्या गोरक्षकांना म्हणाले, 'अरे, ही तुमची रचना फारच सोपी आहे. त्या गाई मरताहेत, कारण त्यांनी गेल्या जन्मात पाप केलं होतं. त्यांना त्याची शिक्षा मिळते आहे!'' पण सनातनी मंडळी चलाख असतात. ती माणसे म्हणाली, ''स्वामी, तुम्ही सांगता ते खरे, पण आमचे धर्मग्रंथ सांगतात, गाय ही आमची आई आहे. आणि आपली आई कितीही वाईट असली, तरी आपण तिचं रक्षण केलं पाहिजे.''

शिष्य लिहितो, ‘विवेकानंद आता लहान मुलासारखे खळखळून हसले आणि म्हणाले, ‘‘आता निघा! आज मला तुमचे आई–वडील समजले! आणि हेच आई–वडील बरोबर घेऊन हिंडणाऱ्या या देशाचं नवनिर्माण करायचं आहे, याची जाणीव झाली.’’ मात्र विवेकानंदांनी ही गोष्ट इथेच सोडलेली नाही. ब्रह्मानंदला पत्र पाठवून त्यांनी विचारलं, ‘आपल्या या देशाला हा कोणता रोग झालाय? उद्या मुंबईमधला एखादा श्रीमंत व्यापारी ढेकणांसाठी हॉस्पिटल काढेल आणि ‘आपल्या सनातन धर्माच्या रक्षणासाठी ते कसं गरजेचं आहे’ हे समजावून देईल!’

मात्र विवेकानंद इथेही थांबलेले नाहीत. त्यांनी ‘धर्म, त्याचा उद्देश आणि त्याच्या पद्धती’ या आपल्या निबंधात स्पष्टपणे सांगितलंय, ‘एखादी गोष्ट धर्मग्रंथात दिलेली असेल किंवा एखादा फार मोठा धर्मगुरू किंवा शास्त्री–पंडित सांगत असेल, पण ती गोष्ट जर तुम्हाला विचारान्ती पटत नसेल, तर ती अगदी ठामपणे नाकारा. कारण परमेश्वराने तुम्हाला दिलेली सर्वांत मोठी देणगी म्हणजे, ‘विचार करण्याची शक्ती’! परमेश्वराने ती तुम्हाला दिलेली आहे; जनावरांना मात्र अजिबात दिलेली नाही. म्हणून तुम्हाला विचारान्ती न पटणारी गोष्ट तुम्ही नाकारलीत, तर ‘तुम्ही माणूस आहात’ म्हणून परमेश्वराला आनंद होईल. मात्र तुमच्या विचारांना न पटणारी गोष्ट ‘धर्मग्रंथात सांगितली आहे’ किंवा ‘साधू महाराज सांगत आहेत’ म्हणून स्वीकारलीत, तर ‘तुम्ही पशू बनलाय’ म्हणून परमेश्वराला वाईट वाटेल.’

विवेकानंदांच्या या अशा मांडणीमुळे आणि भाषणांमुळे सनातनी मंडळींनी त्यांना मरणप्राय यातना दिल्या. विवेकानंद भारतात परत आल्यावर महामहोपाध्याय गोपाळशास्त्री कराडकर यांनी वेदशास्त्रसंपन्न त्र्यंबकशास्त्री वैद्यांना सांगितलं, ‘‘हा माणूस शूद्र आहे. याला संन्यास घेण्याचा अधिकार नाही. त्यातून हा समुद्र–प्रवास करून आलाय. याला आता प्रायश्चित्त देऊनही शुद्ध करता येणार नाही!’’ विवेकानंद कलकत्त्याला पोहोचले, त्या वेळी कलकत्त्यामधल्या बंगवासीने लिहिलं, ‘हा माणूस शूद्र आहे. समुद्र–प्रवास करून आलाय. हा माणसू स्वत:ला संन्यासी का म्हणवतो? आमच्या धर्मग्रंथांनी याला संन्यास घेण्याचा अधिकार दिलेला नाही. कलकत्त्यामधल्या धर्मप्रेमी माणसांनी याच्यापासून दूर राहिलं पाहिजे.’ हे इथेही थांबलं नाही. २८ फेब्रुवारी १८९८ रोजी स्वामी विवेकानंद भगिनी निवेदितांना घेऊन दक्षिणेश्वरच्या मंदिरात श्रीरामकृष्ण जयंती साजरी करण्यासाठी गेले आणि मंदिराच्या पुजाऱ्यांनी त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला. अवमानित विवेकानंदांना निमूटपणे इतरत्र जाऊन श्रीरामकृष्ण जयंती साजरी करावी लागली. १४ सप्टेंबर १८९९ रोजी लंडनमधले त्यांचे मित्र ई. टी. स्टर्डी यांना पत्र पाठवून त्यांनी कळवलंय, ‘भारतात परत आल्यावर इथल्या लोकांनी सर्वप्रथम मला मुंडन करायला लावलं, कफनी घालायला लावली. या अशा स्वरूपाच्या अनेक धार्मिक अत्याचारांमुळे माझे मधुमेहासारखे अनेक जुने आजार आता फार बळकट झाले आहेत!’

भारतात परत आल्यावर विवेकानंदांनी त्यांच्या मनातला बेलूर मठ स्थापन केला. या मठात प्रवेश देताना तुमचं लिंग, तुमचा धर्म, तुमचा पंथ, तुमची जात आणि तुमचं राष्ट्रीयत्व विचारात घेतलं जाणार नव्हतं. ‘माणूस तेवढा एक! सारी ईश्वराची लेकरं किंवा सारेच ईश्वराचे अंश!’ असं बेलूर मठ सांगत होता. या मठात प्रशिक्षित होऊन भारतातल्या खेड्यांचं नवनिर्माण करण्यासाठी संन्यासी बाहेर पडणार होते. बेलूर मठ स्थापन करण्यासाठी विवेकानंद परदेशातून पैसे आणू शकले नव्हते आणि हा अशा स्वरूपाचा मठ काढण्यासाठी भारतातल्या एकाही धनिकाने वा संस्थानिकाने एक दमडीही दिली नव्हती. मठासाठी जमीन विकत घेण्यासाठी लागणारी भली मोठ्ठी रक्कम त्यांची इंग्लंडमधली मैत्रीण हेनरिटा मुल्लर यांनी दिली होती आणि मठाचा दैनंदिन खर्च चालवण्यासाठी ठेव म्हणून श्रीमती सारा ओली बूल यांनी भरपूर पैसे दिले होते. मात्र या देशात हे इथेच थांबलं नाही. या मठात सर्व धर्मांचे धर्मग्रंथ होते; जगभरातल्या तत्त्वचिंतकांचे ग्रंथ होते. जगभरातले नवे नवे ज्ञान दर महिन्याला देणारे ‘एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका’चे खंड नियमितपणे येत होते. त्यामुळेच कोलकाता महानगरपालिकेचं म्हणणं होतं, ‘अशा स्वरूपाचा मठ असूच शकत नाही. हे तर विवेकानंदांचं आरामगृह आहे!’ म्हणून त्यांनी बेलूर मठावर भला मोठा कर बसवला. हा मनस्ताप सहन करत विवेकानंदांना याविरुद्ध कोर्टाची पायरी चढावी लागली.

आता विवेकानंदांना निरोप देण्यापूर्वी एक महत्त्वाची गोष्ट समजून घेऊ या. या अशा एकाकी, क्लेशदायक परिस्थितीत विवेकानंदांनी प्रसन्न मनाने, अजिबात विचलित न होता वाटचाल कशी केली?

आयुष्यात दोन गोष्टी सर्वांत महत्त्वाच्या आहेत–

मानसिक सामर्थ्य आणि मानसिक आधार. मनाचं सामर्थ्य प्रयत्नपूर्वक मिळवता येतं आणि 'आपण ते कसं मिळवलं' हे विवेकानंदांनी सांगितलंय. विवेकानंद जर्मनीत होते. मॅक्सम्युलर आणि डायसन हे जर्मनीतले जागतिक कीर्तीचे थोर विचारवंत! हे दोघंही विवेकानंदांचे मित्र बनले. ही गोष्ट आहे विवेकानंद आणि डायसन यांच्या पहिल्या भेटीची. डायसन यांनी सकाळी नऊ वाजता विवेकानंदांना नाश्त्यासाठी बोलावलं. नऊला पाच मिनिटं असताना विवेकानंद डायसन यांच्या घरी, दिवाणखान्यात पोहोचले. समोर तिपाईवर डायसन यांचं एक नवं पुस्तक होतं. ते वाचायला विवेकानंदांनी सुरुवात केली. त्यांना नाश्त्यासाठी घेऊन जायला डायसन नऊ वाजता दिवाणखान्यात आले. विवेकानंदांचं डायसन यांच्याकडे अजिबात लक्ष नव्हतं. ते पुस्तक वाचत होते. डायसन यांनी पाच मिनिटं वाट पाहिली. त्यांना हा उद्धटपणा वाटला. त्यांनी एकदम चढ्या आवाजात विचारलं, ''स्वामी, मला येऊन पाच मिनिटं झाली. तुमचं माझ्याकडे लक्ष नाही. एवढे कसले वाचनात गुंतला होतात?'' आता विवेकानंद भानावर आले. म्हणाले, ''मित्रा, तुझं गेल्या आठवड्यात प्रसिद्ध झालेलं नवं पुस्तक तिपाईवर होतं, ते वाचून काढलं. तुझे विचार नवे आणि महत्त्वाचे आहेत. मात्र माझ्या मनात दोन-तीन शंका आहेत. त्या विचारू का?''

डायसन गोंधळले. म्हणाले, 'भल्या माणसा, मी वर्षभर खपून लिहिलेलं पुस्तक तू दहा मिनिटांत वाचून संपवलंस?'

विवेकानंद शांतपणे म्हणाले, ''होय. अगदी पूर्णपणे वाचलंय. लहान मूल एकेक अक्षर वाचतं. थोडं मोठं झाल्यावर सबंध शब्द एकदम वाचायला लागतं. नंतर आपण एकत्रितपणे एक वाक्य वाचतो. मात्र आपल्याला विषय माहीत असेल आणि आपण मन एकाग्र करू शकत असू, तर प्रथम काही दिवस सबंध परिच्छेद आपण एका नजरेत वाचू शकतो आणि नंतर तर एका नजरेत पुस्तक वाचून संपवतो!''

अशीच एक दुसरी गोष्ट आहे. बेलूर मठात विवेकानंद भली मोठी वर्गणी भरून एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाचे अंक मागवत होते, हे आपण वर पाहिलंय. हे भले मोठे खंड दर महिन्याला येत होते. त्यांत आदल्या काही महिन्यांत प्रत्येक क्षेत्रात कोणत्या ज्ञानाची भर पडली, ते छोट्या अक्षरांत, संक्षिप्त स्वरूपात दिलेलं असे. एका शिष्याने विवेकानंदांना विचारलं, ''हे खंड आपण का मागवतोय? हे एवढे खंड कुणीतरी वाचू शकेल का?'' हा प्रश्न ऐकून विवेकानंदांनी सर्व शिष्यांना बोलावलं. ते त्यांना म्हणाले, ''हा मूर्ख शिष्य म्हणतोय, हे एवढे खंड कोण वाचणार? गेल्या आठवड्यात इथे आलेले हे तीन खंड आहेत. त्यांतल्या कोणत्याही खंडातलं कोणतंही पान उघडा आणि मला त्यावर प्रश्न विचारा. मी ते तीनही खंड वाचलेले आहेत आणि तुम्हाला एक सांगतो, यात जे ज्ञान आहे, ते तुम्हाला माहीत नसेल आणि नुसतीच घोकंपट्टी आणि पोपटपंची करत असाल, तर तुमच्यात आणि जनावरांच्यात किंवा पोपटात काहीही फरक नाही. पाठांतर करणं सोपं आहे. वाचणं आणि समजून घेणं कठीण वाटतं, मात्र तेपण सोपं आहे. मात्र त्यासाठी 'वाचावं कसं' याचा अभ्यास हवा. वाचताना मन पूर्णपणे एकाग्र हवं. मी वाचत असताना माझ्या मानेवर तुम्ही जळता निखारा ठेवलात, तरी ते मला कळणार नाही.'

विवेकानंदांनी शिष्यांना सांगितलेली दुसरी गोष्टपण तशीच महत्त्वाची आहे. विवेकानंद खूप आजारी होते. कलकत्त्यामधील प्रख्यात वैद्याने येऊन त्यांना तपासलं, औषध दिलं, मात्र एक भयंकर अट घातली - ''दिवसभर पाणी प्यायचं नाही. रात्री झोपताना फक्त एक ग्लासभर पाणी प्यायचं कलकत्त्यात उन्हाळा सुरू होता; घशाला कोरड पाडणारा! शिष्य विवेकानंदांना म्हणाले, 'स्वामी, हे असं दिवसभर पाणी न पिणं उन्हाळ्यात कसं काय शक्य आहे?''

विवेकानंद म्हणाले, ''एक गोष्ट लक्षात ठेवा. तुमच्या शरीरावर तुमचा ताबा हवा. तुमच्या मनाने शरीराला एकदा सांगितलं की, 'असं वागायचं आहे' तर त्याने निमूटपणे तसं वागलं पाहिजे. पुढचा आठवडाभर तहान म्हणून काही गोष्ट असते, हेही माझ्या शरीराच्या लक्षात येणार नाही!'' तुम्हाला आयुष्यात यश मिळवायचं असेल, तर तुमच्या शरीरावर तुमच्या मनाचा पूर्ण ताबा पाहिजे.

एक अगदी शेवटची, पण अगदी महत्त्वाची गोष्ट! आयुष्यात यश कशासाठी आणि कुणासाठी मिळवायचं, ते माहीत पाहिजे. विवेकानंदांना या देशाचं नवनिर्माण करायचं होतं, हे अगदी खरं! मात्र आणखी एक गोष्ट आहे. विवेकानंदांना नीटपणे समजून घेतलं, तर ते तुमच्या लक्षात येईल. 'आईसारखे दैवत दुसरे जगतामध्ये नाही' हे लक्षात ठेवून विवेकानंदांनी आजन्म वाटचाल केली आहे. 'आई' हा विवेकानंदांचा भला मोठा मानसिक आधार आहे. 'माझ्या आईला कमीपणा येईल, असं काहीही मी अगदी

चुकूनही करणार नाही. माझ्या प्रत्येक कृतीचा माझ्या आईला आनंद होईल, तिला मोठेपणा मिळेल याची मी काळजी घेईन'. नीट पाहिलंत, तर विवेकानंदांच्या वाटचालीत ही लक्ष्मणरेषा आहे. मात्र विवेकानंद इथेच थांबत नाहीत. 'आईने लहानपणी आपली जशी काळजी घेतली, तशी काळजी मोठं झाल्यावर आपण आईची घ्यायची आहे' हे त्यांच्या कायम लक्षात आहे. सर्वधर्म परिषदेसाठी अमेरिकेला जाण्यापूर्वी खेत्री नरेशांकडून त्यांनी आईसाठी घेतलेलं वचन आपणाला माहीत आहे.

मात्र मृत्यूपूर्वी दोन वर्षं विवेकानंद अमेरिकेत परत गेले होते. इंग्लंड आणि अमेरिका इथे त्यांनी स्थापन केलेल्या आणि बहरलेल्या वेदान्त नावाच्या संस्था पूर्णपणे बंद पडल्या होत्या किंवा पार मोडकळीला आल्या होत्या. 'भाषणं देऊन सभागृहाचं भाडंसुद्धा निघत नाही. भाषणं देऊन, पैसे मिळवून भारतात परत जाण्याएवढे तिकिटाचे पैसेसुद्धा मिळणार नाहीत' ही वेदना त्यांच्याबरोबर होती. या जगातले पैशाचे व्यवहार न समजल्यामुळे, न जमल्यामुळे विवेकानंदांच्या आयुष्यातलं हे यातनापर्व होतं आणि त्या वेळी विवेकानंदांच्या मनात आपल्या आईची काळजी होती.

१७ जानेवारी १९०० रोजी श्रीमती सारा ओली बूल यांना पत्र पाठवून त्यांनी आपल्या मनातली वेदना सांगितली आहे – 'माझ्या मठाचं सर्व काम माझ्या मनातून किमान काही काळासाठी पूर्णपणे बाजूला करून मला माझ्या आईकडे परत जायचं आहे. माझ्यामुळे तिला पुष्कळ दु:ख सोसावं लागलं आहे. तिचे शेवटचे दिवस सुखात जावेत, म्हणून मला प्रयत्न केलेच पाहिजेत. आमच्या भारतातल्या थोर शंकराचार्यांनासुद्धा असंच करावं लागलं होतं, हे तुम्हाला माहीत आहे काय? त्यांनासुद्धा आपल्या मातेच्या अखेरच्या दिवसांत तिच्याकडे जाऊन राहावं लागलं होतं. मलाही तसंच करावं लागेल. सारं काम थांबवून आईकडे जाण्याचा निर्णय घेतल्यावर माझं मन आता एकदम शांत आहे. १८८७मध्ये आईला सोडून जाणं हा फार मोठा त्याग होता आणि आता तिच्याकडे परत जाण्यात त्याहूनही मोठा त्याग आहे.'

अमेरिकेतून आईकडे परत जाण्यापूर्वी विवेकानंद इथेच थांबत नाहीत. खेत्री नरेशांनी बेलूर मठ उभा करण्यासाठी काहीही मदद केलेली नव्हती. 'खेत्री नरेशांनी आईला दर महिन्याला पाठवीन म्हणून सांगितलेले पैसे देणं थांबवलं तर काय?' हा प्रश्नही त्यांच्या मनात होता. ७ मार्च १९०० रोजी धीरमाता यांना पाठवलेल्या पत्रात विवेकानंदांनी लिहिलंय, 'माझ्या आईबद्दल बोलायचं म्हणजे, माझ्या आणि तिच्याही अखेरच्या दिवसांसाठी मी तिच्याकडे परत जातो आहे. न्यू यॉर्कमध्ये माझे जे हजार डॉलर्स आहेत, त्यांचं दरमहा नऊ रुपये व्याज येईल. शिवाय तिच्यासाठी मी जी जमीन विकत घेतली आहे, तिच्यातून महिन्याला सहा रुपये मिळतील आणि तिच्या जुन्या घरांचे दरमहा सहा रुपये येतीलच. तूर्तास ज्या घरासंबंधी दावा चालू आहे, ते घर माझ्या ताब्यात नसल्यामुळे मी त्याचा विचार करत नाही. तेव्हा माझी आई, माझी आजी आणि माझा भाऊ असे तिघं जण महिना वीस रुपयांवर सहज गुजराण करू शकतील. माझं संपूर्ण आयुष्य माझ्या दुर्दैवी आईला निव्वळ यातना देणारं ठरलं आहे. तिचं स्वत:चं आयुष्य सुरुवातीपासून शेवटपर्यंत सतत दु:खात गेलं आहे. अशा या परिस्थितीत तिला शक्य तेवढं सुख देण्याचा हा माझा प्रयत्न आहे.'

विवेकानंद जानेवारी १९०१च्या सुमारास भारतात परत आले. आल्यावर २६ जानेवारी १९०१ रोजी धीरमाता यांना पत्र पाठवून त्यांनी कळवलं, 'पुढच्या आठवड्यात मी माझ्या आईला यात्रेसाठी घेऊन जाणार आहे. सर्व तीर्थस्थळांची यात्रा पुरी करायला काही महिने लागतील. 'सर्व तीर्थांची यात्रा करणं' ही हिंदू विधवेची एक मोठी इच्छा असते. माझ्या घरातल्या मंडळींना मी जन्मभर नुसतं दु:खच दिलं आहे. ही तिची एक इच्छा तरी पुरी करण्याएवढा मी भाग्यवान आहे.'

म्हणजे विवेकानंदांना समजून घ्यायचं म्हणजे 'आईसारखे दैवत साऱ्या जगतामधी नाही' हे कायम लक्षात ठेवायचं.

**दत्तप्रसाद दाभोळकर**, सातारा
Mob. 9822503656

(१२ जानेवारी हा स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय युवकदिन म्हणून साजरा केला जातो. ते औचित्य साधून हा लेख प्रसिद्ध करीत आहोत. दत्तप्रसाद दाभोळकर यांचे 'मुलांसाठी विवेकानंद' हे पुस्तक येत्या २६ जानेवारीला साधना प्रकाशनाकडून येत आहे, त्यातील हे समारोपाचे प्रकरण आहे.)

अनावृत्त पत्र

संकल्प गुर्जर

# डोनाल्ड ट्रम्प, तुमची खूप आठवण येते!

रा. रा. डोनाल्ड ट्रम्प यांसी,
(भारतातून) सप्रेम नमस्कार.

आता तुमची अध्यक्षीय कारकीर्द संपून एक वर्ष पूर्ण झाले आहे. गेल्या वर्षी, ६ जानेवारीला तुमच्या समर्थकांनी अमेरिकी लोकशाहीच्या मानबिंदूवर, कॅपिटॉल हिलवर जो धुमाकूळ घातला त्यालाही आता एक वर्ष झाले आहे. तुमच्या नेतृत्वाखाली अनुभवलेल्या अतिशय वादळी अशा चार वर्षांनंतर (२०१७-२०२१) अमेरिका आणि जग पुन्हा एकदा मूळपदावर येत आहे. जो बायडेन यांनी कार्यक्षमपणे अमेरिकेचा कारभार हाकायला सुरुवात केली आहे. अर्थात कोविडचे संकट संपलेले नाही, अफगाणिस्तानातून अमेरिका मानहानीकारक पद्धतीने बाहेर पडलेली आहे आणि अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणातील ध्रुवीकरण अधिकच तीव्र झाले आहे. अशा सगळ्या पार्श्वभूमीवर, तुमची आठवण येणे अगदीच साहजिक आहे ना?

अमेरिकेच्या अडीचशे वर्षांच्या इतिहासात होऊन गेलेल्या ४६ अध्यक्षांपैकी अनेकांना वाचन करण्याची, डायरी लिहिण्याची सवय होती. पण अध्यक्षीय जबाबदाऱ्या बाजूला ठेवून असल्या फालतू गोष्टींत वेळ घालवणाऱ्या अध्यक्षांच्या परंपरेपासून तुम्ही पूर्णतः फारकत घेतली. 'फॉक्स'सारख्या तुम्हाला हवे तेच दाखवणाऱ्या आणि तुमच्या विरोधकांवर जोरदार टीका करणाऱ्या टीव्ही वाहिन्या आणि ट्विटरसारखी 'शहाणी' माध्यमे हाताशी असताना इतर काही म्हणजे वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके वाचण्याची गरजच नाहीशी झालेली आहे, हे ओळखणाऱ्या द्रष्ट्या जागतिक नेत्यांच्या मालिकेचे तुम्ही शिरोमणी! त्यामुळे हे पत्रही व्हिडीओ स्वरूपात रेकॉर्ड करून 'फॉक्स'ला पाठवावे किंवा ट्विटरवर टाकावे असे वाटले होते. पण तुमच्यावर ट्विटरने बंदी घातलेली आहे आणि 'फॉक्स'च्या उच्च दर्जाला व तुमच्या लौकिकाला साजेसे हे पत्र नाही असा माझा समज आहे. त्यामुळे व्हिडीओ किंवा ट्विट न करता जुन्याच पद्धतीचे असे हे पत्र लिहिण्याचा निर्णय घेतला. गोल्फ

तुमची अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने जगातील इतर अनेक देशांतील (अगदी आफ्रिका खंडातीलसुद्धा) विचारी वर्गाला खूप मोठा दिलासा मिळाला. जर अमेरिकेत तुमच्यासारखे अध्यक्ष निवडून येत असतील तर बाकीच्या जगातले, तुमच्यासारखेच विचार आणि वर्तन असलेले, सत्ताधारी त्या तुलनेत बरेच 'बरे' आहेत हे दिसून आले. त्यामुळे एकाच वेळी अमेरिकेविषयी वाटणारी असूया आणि आपापल्या देशाविषयी वाटणारी कीव या दोन्ही भावना थोड्या प्रमाणात कमी झाल्या. जगभरातल्या विचारी वर्गाला असा दिलासा देणे हे तुमचे खरे ऐतिहासिक योगदान आहे! त्याबद्दल जग कायम तुमच्या ऋणात राहील.

खेळणे, टॅक्स चुकवणे, विरोधकांची यथेच्छ हेटाळणी (बऱ्याचदा तर बदनामी) करणे, आणि 'रिपब्लिकन' पक्षाच्या समर्थकांना आपल्याच नेतृत्वाविरुद्ध चिथावणी देणे अशा तुमच्या कार्यव्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून तुम्ही हे पत्र वाचलेत तर मला आनंदच वाटेल.

अगदी प्रामाणिकपणे सांगायचं तर, रा. रा. बायडेन यांच्या हाती सत्तेची सूत्रे आल्यापासून जगण्यातली मजा निघून गेली आहे असे रोज वाटते. तुम्ही अतिशय 'विचारपूर्वक' घेतलेले निर्णय बायडेन यांनी फिरवले आहेत: त्यांनी अमेरिकेला वातावरण बदल रोखण्यासाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पॅरिस कराराच्या कक्षेत आणले, इराणशी पुन्हा अणुचर्चा सुरु केली, रशियावर अधिक कठोर निर्बंध लादले, युरोपला आश्वस्त केले आणि एकूणच जागतिक राजकारणाला वेगळे वळण द्यायला सुरुवात केली आहे. तुम्ही सत्तेत असताना पुतिन यांच्या चेहऱ्यावर एक लबाड-मिस्कीलपणा दिसत असे. आता त्याची जागा चिंतेने घेतलेली आहे, यातच नेमका काय बदल झाला आहे हे कळून चुकते.

तुमच्या चार वर्षांच्या काळात तुम्ही कसे मनात आहे ते आणि वाटेल त्या शब्दांत बोलण्याचा प्रामाणिकपणा दाखवत राहिलात. त्यामुळे उत्तर कोरियाच्या किम जोंग ऊन ला 'रॉकेटमॅन' ही (शिवीपर) उपाधी तुम्ही दिलीत व स्वतःला शांततेचे नोबेल पारितोषिक मिळवण्यासाठी अमेरिकेच्या या शत्रूला भेटायलासुद्धा गेलात. राजकीय हेतू आणि शब्दांची इतकी 'क्लॅरिटी' फार कमी जणांकडे असते! त्याउलट आताचे अमेरिकेचे सत्ताधारी बघा: ते मुत्सद्देगिरीच्या नावाखाली घासून घासून गुळगुळीत व अर्थहीन झालेले शब्द वापरत असतात. तुमच्या रोखठोक भाषेमुळे आणि बेधडक निर्णयांमुळे अन्य देशांचे नेते नाराज होत असत, तुम्हाला ते हसत असत आणि तरीही ते आपल्या खऱ्या भावना तुमच्यापासून लपवीत असत. किती हा अप्रामाणिकपणा!

महासत्तेच्या अध्यक्षाने ओबामांसारखे समजूतदारपणे वागायचे नसते तर बेमुर्वतखोरपणे, एककल्लीपणे, मनाला वाटेल तसे आणि इतरांची पर्वा न करता एखाद्या अनियंत्रित सम्राटासारखे वागायचे असते; मित्रांना


डोनाल्ड ट्रम्प

दुखवायचे असते आणि शत्रूची प्रशंसा करायची असते, कायद्याचे राज्य, लोकशाही, आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी आणि संकेत वगैरेसारख्या निरुपयोगी गोष्टींकडे दुर्लक्ष करायचे असते इत्यादी धडे जगाला शिकवण्याचे श्रेय तुम्हाला कोणीच देत नाही. हे पाहिले की किती वाईट वाटते!

'खोटं बोला, पण रेटून बोला' या कलेत जगातील अनेक नेते माहीर आहेत. पण त्या सर्वांना मागे टाकेल इतके तुमचे या कलेवर प्रभुत्व होते. त्यामुळे तुम्ही काहीही बोललात की ते खरे आहे का, ते अध्यक्षीय परंपरेत बसते का, अमेरिकी अध्यक्षाने असे बोलावे का वगैरे निरर्थक चर्चा घनघोरपणे सुरू होत असत. त्यामुळे अमेरिकेतील आणि जगातील टीव्ही वाहिन्यांना, वर्तमानपत्रांना, संपादकीय लेखकांना आणि अभ्यासकांना किती काम मिळत असे! ट्रेव्हर नोआ आणि जॉन ऑलिव्हर यांच्यासारख्या विनोदी टीव्ही शो होस्ट्सना लोकप्रियता मिळवून देण्यात तुमचा खूप मोठा वाटा होता. तुम्ही नसता तर त्यांनी रोज रात्री कोणाची रेवडी उडवली असती? हॉलिवुडच्या आघाडीच्या कलाकारांना उदारमतवादी राजकीय भूमिका आहेत आणि त्या किती पक्क्या आहेत याची ओळख साऱ्या जगाला तुम्ही करून दिलीत. (त्यांना पाहिले की इतर देशांतील सिनेस्टार्स कसे कचकड्याचे आहेत, ही विदारक जाणीवदेखील होत असे!) त्यामुळेच तुमच्या काळातल्या ऑस्कर सोहळ्याला राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते.

तुमच्यावर टीका केली की जगभरात अनेक डाव्यांना जेवण सुखाने जात असे. तुमची बाजू हिरीरीने मांडली की उजव्यांना त्यांचे कर्तव्य केल्याचे समाधान मिळत असे. तुमच्या एकूण कर्तबगारीमुळे डावे आणि उजवे असे दोन्ही बाजूचे लोक कायम कामात मग्न असत. त्यामुळे तुम्ही केवळ अमेरिकेतील बेरोजगारी कमी केली असे नव्हे तर बाकीच्या जगातील बेरोजगारांना घरबसल्या काम मिळवून दिले. याचे श्रेय तुम्हाला का दिले जात नाही याचे फार आश्चर्य नेहमीच वाटते.

तुमच्यामुळे अमेरिकेत वर्षानुवर्षे उपेक्षिल्या गेलेल्या, वर्णश्रेष्ठत्त्व मानणाऱ्या गौरवर्णीय गटांना राजकीय बळ मिळाले. स्त्रिया, कृष्णवर्णीय आणि उदारमतवादी विचारसरणी याविषयी या गटांची मते इतकी टोकाची



जो बायडेन

असतात की, मुख्य प्रवाहातील राजकीय पक्षांना यापूर्वी ती झेपणे कधीही शक्य नव्हते. मात्र असल्या क्षुल्लक गोष्टींची काळजी तुमच्यासारख्या धडाकेबाज नेत्याला कधीच नव्हती. कायदे न पाळणे, दंगली करणे, बायडेन यांच्या निवडणूक विजयावर जाणीवपूर्वक शंका घेणे, चित्रविचित्र रंगाचे कपडे घालून अमेरिकेच्या मानबिंदूंवर हल्ला करणे आणि तरीही आपला दांडगटपणा कोणीच समजून का घेत नाही असे मानणाऱ्या या गटांना प्रोत्साहन देण्याचे काम तुम्ही केलेत. तुमच्यावर मनापासून प्रेम करणारे आणि (कदाचित त्यामुळेच!) तेच खरे देशभक्त आहेत असे तुमचे प्रामाणिक मत होते. सीएनएनसारख्या वाहिन्या आणि मुख्य प्रवाहातील वर्तमानपत्रांनी घोर अन्याय केलेल्या या गटांना तुम्ही आवाज दिलात. तुमच्या अनुपस्थितीत या अशा लोकांची बाजू आता कोण घेणार? शार्लोट्सव्हिलासारख्या दंगली पुन्हा झाल्या तर या गटांनी समर्थनासाठी आता कोणाकडे पाहायचे? कारण आता बायडेन यांच्या काळात कायदे वगैरे पाळले जातात आणि पोलीस व न्यायव्यवस्था निरपेक्षपणे काम करेल अशीच चिन्हे दिसत आहेत.

तुम्ही सत्तेवर होतात तेव्हा आजूबाजूच्या जगात ब्राझीलचे बोल्सनारो, टर्कीचे एर्दोगन, फिलिपाईन्सचे ड्यूटर्ते, रशियाचे पुतिन, हंगेरीचे ओरबान असे एकाहून एक खरेखुरे 'लोकशाहीवादी' नेते आपापल्या देशात सत्तेत होते. (पुतिन यांनी तर नुकतीच चार तासांहून अधिक काळ चाललेली पत्रकार परिषद घेतली. त्यांच्या लोकशाहीप्रेमाचा याहून अधिक पुरावा तो कोणता?) आपले तथाकथित पौरुषत्व अभिमानाने मिरवणाऱ्या, हिंसेचे आणि लष्करी सामर्थ्याचे (कारण नसताना) गौरवीकरण करणाऱ्या आणि वेळकाढू लोकशाही कार्यप्रणालीला बाजूला ठेवून धडाकेबाजपणे सत्ता राबवणाऱ्या या नेत्यांच्या मांदियाळीत तुम्ही कसे शीर्षस्थानी उठून दिसायचात.

तुमच्या असण्याने अशा राज्यकर्त्यांना एक झळाळी प्राप्त झाली होती. केवळ तुम्ही होतात म्हणून तर जगाला गेल्या दीडशे वर्षांच्या सामाजिक-राजकीय प्रगतीतील फोलपणा लक्षात आला. कितीही प्रगती झाली तरी माणसाच्या मनातील मूळ पशुत्व जात नसते आणि संस्कृती-समाज, कला-साहित्य-संगीत इत्यादी निरर्थक गोष्टींमुळे केवळ त्या प्रेरणेला दडपले जाते या वैश्विक सत्याचा आविष्कार तुमच्या असण्याने अनेकांना होत असे.

कोणतीही किंमत देऊन आपले राजकारण पुढे रेटता आले पाहिजे ही तुमची मूळ प्रवृत्ती होती, तिचे अनेकांना कौतुक वाटत असे. त्यामुळे आपली सत्ता टिकवण्यासाठी देशाचे अपरिमित नुकसान झाले तरी चालेल, त्यासाठी मनाला अजिबात वाईट वाटू देऊ नये, अशी तुमची मानसिक जडणघडण होती. आणि या वर्तनाला सेलिब्रेट करण्यासाठी आवश्यक असणारे 'चिअर लिडर्स' तर नेहमीच तुमच्या दिमतीला होते. त्यामुळे तुम्ही ओबामांसारखे संवेदनशील म्हणजे (तुमच्या मते, दुबळे!) आहात असा आरोप करण्याची हिंमत कोणीही केली नाही याचे पूर्ण श्रेय तुमचे एकट्याचेच!

तुमची चार वर्षे हा अमेरिकी लोकशाहीसाठी कसा सुवर्णकाळ होता! तुमच्या काळात सत्तेवर नियंत्रण घालणारे लोकशाही संकेत कसे उधळून लावायचे याचे धडे सगळ्यांना मोफतपणे मिळत असत, अगदी टीव्हीवर पाहता येत असत. लोकशाही रुजवण्यासाठी याचा उपयोग नक्कीच होईल. व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी सारा सँडर्स पत्रकारांच्या उपद्रवी प्रश्नांना कशी उडवा-उडवीची उत्तरे देत असत, त्या प्रश्नांना केराची टोपली दाखवत असत, शक्य असेल तर पत्रकारांचा अपमान करत असत आणि यापैकी काहीच नाही जमले तर मख्ख चेहरा करत असत. नाही तर आताच्या प्रेस सेक्रेटरी जेन साकी बघा: त्या न कंटाळता पत्रकारांच्या उपद्रवी प्रश्नांना उत्तरे देतात, त्यांच्या हातातून माईक हिसकावून घेत नाहीत. उलट आवश्यक ती माहिती वेळेत मिळेल याची व्यवस्था करतात. बिचाऱ्या जेन साकींना हे कळतच नाही की, क्षुद्र पत्रकारांच्या त्रासदायक प्रश्नांना उत्तरे दिल्याने त्यांचे समाधान होत नसते तर उलट अपेक्षा अधिकच वाढत जातात. त्यामुळे पत्रकारांना त्यांची जागा दाखवून देणाऱ्या तुमच्या काळातल्या सँडर्सबाईंची आठवण आता सर्वांना येत असेल.

तुमच्या काळात सत्तेचा अनिर्बंधपणे वापर कसा करावा आणि विरोधी आवाजांकडे दुर्लक्ष कसे करावे याचे प्रात्यक्षिक रोज मिळत असे. त्यामुळे डेमोक्रॅटिक पक्षाच्या सभागृहातील नेत्या बिचाऱ्या नॅन्सी पेलोसी (तुमच्या भाषेत 'क्रेझी नॅन्सी') तुमच्यावर टीका करून आणि उपहासात्मक टाळ्या वाजवून थकल्या, तरीही तुम्हाला त्याने काहीही फरक पडला नाही. उलट उदारमतवादी विचारांच्या तरुण पिढीच्या नव्या राजकीय नेतृत्वावर सतत टीका करून, त्यांना राष्ट्रीय स्तरावर पुढे आणून अमेरिकेच्या राजकारणाला तुम्ही फार मोठे योगदान दिले. तुम्ही नसतात तर अलेक्झांड्रिया ओकॅसिओ-कॉर्टेझ, इल्हान ओमर, अय्याना प्रेस्ली, रशिदा तालैब अशा 'फायरब्रॅन्ड' स्त्री खासदारांनी कोणावर टीका केली असती? आणि त्यांना जगभरात प्रसिद्धी व मान्यता कशी मिळाली असती?

तुमच्यावर दोन वेळा महाभियोग चालवला गेला हे किती बरे झाले. (तसा विक्रम करणारे तुम्ही पहिलेच!) नाही तर त्याआधी बिचाऱ्या बिल क्लिंटनना, महाभियोग चालवला गेलेले आणि सध्या जिवंत असलेले एकमेव अध्यक्ष म्हणून, किती एकटे एकटे वाटत असेल? तुम्ही होतात म्हणून तर ग्रेटा थुनबर्गला संयुक्त राष्ट्रसंघात आक्रमक भाषण देता आले. तुम्ही जर नेहमीच्या वाटेने गेला असतात, हवे तसे वागला नसतात, रोज उठून

आक्षेपार्ह भाषेत, वेळीअवेळी ट्वीट्स केली नसती, पर्यावरणाकडे लक्ष दिले असते तर हे सगळे लोकं आज काय करत असते? खरं तर या सर्वांनी तुमचे आभार मानायला हवेत! तसेच तुम्ही शब्दप्रभूदेखील होतात हे आता अनेकांच्या विस्मरणात गेले आहे. Fake News, Failing New York Times, Crooked Hilary, Make America Great Again, Worst Trade Deals, Shithole Africa, Covfefe अशा फ्रेजेस निर्माण करून त्या लोकप्रिय करण्याचे काम तुम्ही केलेत.

थोडे वैयक्तिक बोलायचे, तर तुम्ही सत्तेत होतात ती चार वर्षे रोज आम्ही धडधडत्या मनाने झोपी जात असू आणि हुरहूर घेऊन उठत असू. आपण झोपलो होतो त्या काळात तुम्ही एखादा नवा पराक्रम केला असेल तर तो आपल्याकडून 'मिस' होऊ नये असे वाटत असे. तुमच्या टेबलवर असलेले एक बटन दाबले तर तुम्हाला हवे तेव्हा 'कोक' मिळते हे कळल्यानंतर 'कोक' पिताना येणारी अपराधी भावना खूप कमी झाली होती. (आताच्या बायडेन यांनी ती सिस्टम बंद केली आहे.) तुम्हाला फास्ट फूड आवडते आणि 'जंक' मानले गेलेले खाद्यपदार्थ रोज खाऊनही इतके कार्यमग्न राहता हे पाहून आम्ही तुमच्याकडून प्रेरणा घेतली होती. कितीही काम केले तरीही तुमच्या केशरी रंगाच्या चेहऱ्यावरील तेज कसे कमी होत नाही आणि इतक्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून तुम्ही नेहमीच कसे 'क्लीन शेव्हन' असता याचेही नेहमीच कौतुकमिश्रित आश्चर्य वाटत असे. तुमच्या तुलनेत आताचे बायडेन अगदीच साधेभोळे, जेवणाला वेळच्या वेळी घरी जाणारे आणि बायकोला कामात मदत करणारे सांसारिक गृहस्थ वाटतात.

तुमच्या वादग्रस्त भूतकाळामुळे सतत काही ना काही नवा मुद्दा चर्चेत असे आणि त्यामुळे तुमच्या असामान्य कर्तबगारीची खरी चर्चाच अमेरिकेत होत नसे. कधी कोणी पॉर्नस्टार काही म्हणत असे तर कधी कोणी नातलग तुमच्यावर पुस्तक लिहीत असे. जर बरेच दिवस काही नवे झाले नसले तर तुमच्या कोणत्या तरी सहकाऱ्याची हकालपट्टी तरी होत असे किंवा काही तरी नवे स्कँडल बाहेर येत असे. अगदीच काही नाही तर तुम्ही निदान, जो बायडेन यांचा मुलगा 'हंटर बायडेन कुठे आहे' हे सर्व कॅपिटल अक्षरांत टाईप करून ट्विट तरी करत असायचात.

आता हे सारे थांबलेले आहे. सगळे कसे शांत आणि सुरळीत चालू आहे. आता रिपब्लिकन पक्षाची भूमिका मांडण्याचे काम मिच मॅक्कॉनेलसारखे कंटाळवाणे नेते करत असतात आणि गौरवर्णीय आक्रमक समूहाला चिथावणी देण्यासाठी, तुमच्याच मार्गावर चालणारे जॉश हॉलीसारखे तरुण नेते तुमच्या पक्षात उदयाला आलेले आहेत. त्यामुळे आता आम्हाला तुमची आठवण किती प्रकर्षाने येत असेल याची तुम्ही कल्पना करू शकता.

तुमची अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने जगातील इतर अनेक देशांतील (अगदी आफ्रिका खंडातीलसुद्धा) विचारी वर्गाला खूप मोठा दिलासा मिळाला. जर अमेरिकेत तुमच्यासारखे अध्यक्ष निवडून येत असतील तर बाकीच्या जगातले, तुमच्यासारखेच विचार आणि वर्तन असलेले, सत्ताधारी त्या तुलनेत बरेच 'बरे' आहेत हे दिसून आले. त्यामुळे एकाच वेळी अमेरिकेविषयी वाटणारी असूया आणि आपापल्या देशाविषयी वाटणारी कीव या दोन्ही भावना थोड्या प्रमाणात कमी झाल्या. जगभरातल्या विचारी वर्गाला असा दिलासा देणे हे तुमचे खरे ऐतिहासिक योगदान आहे! त्याबद्दल जग कायम तुमच्या ऋणात राहील.

कोणत्याही देशाला तुमच्यासारखा नेता मिळणे खूपच कठीण असते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पाऊण शतकात तुमच्यासारखा एक(च) अध्यक्ष अमेरिकेला मिळाला यातच सारे काय ते येऊन जाते. तुमचे आणि अमेरिकेचे हे 'एकमेवाद्वितीयपण' कायम राहावे आणि तुमचे यापुढील दिवस सुखाचे जावेत या शुभेच्छा देऊन हे पत्र संपवतो.

कळावे,

तुमचा एक (माजी) नियमित ट्विटर फॉलोअर,

**संकल्प गुर्जर,** नवी दिल्ली
sankalp.gurjar@gmail.com
Mob. : 08826629034

(२०१७ ते २०२० अशी चार वर्षे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष राहिलेले डोनाल्ड ट्रम्प यांची कारकीर्द २० जानेवारी २०२१ रोजी संपली आणि जो बायडेन यांची कारकीर्द सुरू झाली. या घटनेला येत्या आठवड्यात एक वर्ष पूर्ण होत आहे, त्या पार्श्वभूमीवर हे अनावृत्त पत्र लिहिले आहे.)

मुलांसाठी
'पथेर पांचाली'

विभूतीभूषण
बंद्योपाध्याय

# रानातली मेजवानी

त्या दिवशी अडगळीच्या खोलीत इकडे तिकडे शोधताना अपूला एका लाकडी खोक्यात ठेवलेली काही पुस्तके दिसली. एका पुस्तकाचे नाव 'प्राचीन तत्त्वज्ञानाची ओळख' असे होते. या नावाचा अर्थ त्याला काहीच समजला नाही. पण त्याचे मुखपृष्ठ त्याला आकर्षक वाटले आणि विशेष म्हणजे त्याचा वास त्याला फारच आवडला. त्याने ते पुस्तक खोक्यातून काढले आणि आपल्या पुस्तकांत ठेवून दिले. आजूबाजूला कुणी नसताना तो ते पुस्तक चाळत असे. एके दिवशी त्याला त्या पुस्तकात एक अतिशय विस्मयजनक गोष्ट वाचायला मिळाली. लेखकाने लिहिले होते, 'गिधाडाचे एक अंडे घ्यायचे, त्याच्यात थोडा पारा भरायचा आणि त्याला काही दिवस उन्हात ठेवायचे. काही दिवसांनी ते अंडे तोंडात धरले तर तो माणूस हवेत उडू शकतो.'

बाप रे! ही काही तरी वेगळीच गम्मत होती. इतर कुणी सांगितली असती तर त्याने तिच्यावर विश्वास ठेवला नसता, पण ती जुन्या पुस्तकात लिहिलेली होती. ती खरीच असली पाहिजे. अपूला माहीत होते की, आरशाच्या मागच्या बाजूला पारा लावलेला असतो. घरात एक फुटलेला आरसा आहे हेही त्याला आठवले.

आता प्रश्न फक्त गिधाडाच्या अंड्याचा होता. ते मिळाले की झाले. आपल्याला हवेत उडता येईल... अपू हवेत उडण्याचे स्वप्न पाहू लागला.

मात्र लवकरच त्याच्या ध्यानात आले की, गिधाडाचे अंडे मिळविणे ही फार अवघड गोष्ट आहे. एकतर तो ही गोष्ट कुणालाच– बाबांना किंवा आईला– सांगू शकत नव्हता. ते या गोष्टीवर विश्वास ठेवणार नाहीत. एके दिवशी सहज म्हणून त्याने दुर्गाला विचारले, "दीदी, गिधाडांची घरटी कोठे असतात हे तुला माहीत आहे का?"

अर्थात तिला ते माहीत नव्हते. तिला त्या गोष्टीत रसही नव्हता. तिला आजकाल एक वेगळाच नाद लागला होता. दुपारच्या वेळी ती आपल्या जेवणातील थोडासा भात काढून ठेवी आणि तो घेऊन पाठीमागच्या दाराकडे जाई. एक कुत्रे तो भात खाण्यासाठी येत असे. तिने त्याचे नाव 'भुता' ठेवले होते. हे नाव कुत्र्याच्याही ओळखीचे झाले होते. तिने हाक मारली की, ते जिथे असेल तिथून धावत

दुर्गाने घरापासून थोडे दूरवर रानातली एक जागा पाहून व साफसूफ करूनही ठेवली होती. सहलीसाठी ही फारच आदर्श जागा होती. सगळीकडे मोठमोठ्या वृक्षांची सावली होती. वाटले तर उन्हात बसायचे, वाटले तर सावलीत. आजूबाजूला रानफुले उमललेली होती. त्यांचा सुगंध वातावरणात पसरला होता. शांत वातावरणात मध्येच एखाद्या पक्ष्याची मधुर किलबिल ऐकू येत होती. दुर्गाने येताना घरून थोडे तांदूळ, थोडे तेल आणि बटाटे आणले होते. तिने तीन मोठे दगड गोळा करून चूल बनविली. अपूने त्या चुलीत जाळण्यासाठी वाळलेल्या फांद्या व पाने आणली. दुर्गाने चूल पेटविली, तिच्यावर मातीचे गाडगे ठेऊन त्यात पाणी, तांदूळ व बटाटे शिजत टाकले.

तिच्याकडे येई आणि तिने समोर ठेवलेला भात खाऊन टाकत असे. कधी कधी त्याला उशीर झाला तर दुर्गाला वाटे, आज भुता येणार आहे की नाही? ती मोठ्या आशेने त्याच्या येण्याकडे डोळे लावून बसे. पण, भुता आला नाही असे कधीच झाले नाही. केव्हा केव्हा तर घरात भात कमी असला तर दुर्गा आपल्या जेवणातले चार घास, आईला नकळत काढून ठेवी त्याच्यासाठी.

तिला त्याचा इतका लळा लागला होता.

अपूला मात्र कुत्र्याला खाऊ घालण्यात कसली गम्मत वाटत नव्हती. त्याला तो मुलींचा खेळ वाटे. दुसरे म्हणजे त्याचे चित्त सगळे त्या अंड्यात गुंतले होते. एकदा मित्रांशी बोलताना त्याने सहज गिधाडाच्या अंड्याचा विषय काढला. पण कुणीच ते पाहिलेदेखील नव्हते. एके दिवशी अपू जंगलात गेला असताना त्याला शेळ्या-मेंढ्या हाकणारा एक गुराखी मुलगा भेटला. हा मुलगा सारखा रानावनांत फिरायचा, म्हणून अपूने त्याला गिधाडाच्या अंड्याविषयी विचारले. आणि काय आश्चर्य! त्याने ती अंडी पाहिली होती, इतकेच नव्हे तर ती कशी मिळवावी हेही त्याला माहीत होते! त्याने ती अंडी आणून देण्याचे कबूल केले. पण दोन अंड्यांसाठी अपूने त्याला चार पैसे द्यावे अशी त्याने मागणी केली. अपूजवळ पैसे कोठून असणार? तो त्या मुलाला म्हणाला, ''माझ्याजवळ एक डबा भरून कवड्या आहेत. त्या मी तुला देईन.''

पण त्या मुलाला अपूच्या कवड्यांत रस नव्हता. तो पैशांच्या मागणीवर अडून बसला. अपूने आपल्या पेटीत शोधल्यावर दोन पैसे मिळाले. उरलेले दोन पैसे त्याने दुर्गाजवळून मागून घेतले. पण त्याने तिला अंड्याबद्दल काहीच सांगितले नाही.

दोन दिवसांनी त्या मुलाने अपूला गिधाडाची अंडी आणून दिली. ती अपूने कुणाला न दाखविता आतल्या खोलीत लपवून ठेवली. आता आरशाचा पारा काढणे बाकी राहिले होते. पारा भरून ती अंडी उन्हात ठेवणे सोपे काम होते. नंतर ते अंडे तोंडात धरले की अपू आकाशात उडू शकेल. अपू विचार करू लागला, 'उडायला आले म्हणजे प्रथम कोठे जायचे बरे? नदीपलीकडे? मामाच्या गावाला? की थेट चंद्रावर जायचे?'

मात्र दुसऱ्या दिवशी दुर्गा तिची एक हरवलेली वस्तू शोधण्यासाठी त्या खोलीत गेली. खोलीत बराच अंधार होता. अंधारात शोधताना तिचा धक्का त्या अंड्यांना लागला आणि ती खाली पडून फुटली.

अंडी फुटलेली पाहिल्यावर अपूने जो गोंधळ केला त्याचे वर्णन करता येणे शक्य नाही. संपूर्ण दिवस तो दुर्गाशी बोलला नाही. त्या दिवशी तो जेवलादेखील नाही.

**काही दिवसांनंतरची गोष्ट.**

गावात नुकताच एक उत्सव झाला होता. त्या उत्सवात गावातील अनेक बायकांनी मिळून रानात सहल काढली होती. घरून सामानसुमान आणून तेथे स्वयंपाक केला होता. सर्वाजयादेखील गेली होती. पण अशा सहलीत घरच्या मुलांना आणायचे नाही असा नियम होता. त्यामुळे अपू किंवा दुर्गाला रानात जाऊन मजा करता आली नव्हती. त्यामुळे अपूला वाईट वाटले होते. दुर्गाने ठरविले की बहीणभावांनी रानात जाऊन स्वयंपाक करायचा, जेवायचे, मजा करायची. नाराज झालेल्या अपूला खूश करण्यासाठी काहीतरी करावे असा विचार ती करीत होतीच.

दुर्गा अपूला म्हणाली, ''आपण रानात मेजवानी करायची का?''

दुर्गाने घरापासून थोडे दूरवर रानातली एक जागा पाहून व साफसूफ करूनही ठेवली होती. सहलीसाठी ही फारच आदर्श जागा होती. सगळीकडे मोठमोठ्या वृक्षांची सावली होती. वाटले तर उन्हात बसायचे, वाटले तर सावलीत. आजूबाजूला रानफुले उमललेली होती. त्यांचा सुगंध वातावरणात पसरला होता. शांत वातावरणात मध्येच एखाद्या पक्ष्याची मधुर किलबिल ऐकू येत होती. दुर्गाने येताना घरून थोडे तांदूळ, थोडे तेल आणि बटाटे आणले होते. तिने तीन मोठे दगड गोळा करून चूल बनविली. अपूने त्या चुलीत जाळण्यासाठी वाळलेल्या फांद्या व पाने आणली. दुर्गाने चूल पेटविली, तिच्यावर मातीचे गाडगे ठेऊन त्यात पाणी, तांदूळ व बटाटे शिजत टाकले.

तेवढ्यात त्यांना एक आवाज ऐकू आला.

''दुर्गा दीदी, तुम्ही काय करीत आहात?''

दुर्गाने आवाज ओळखला. तिच्याच वयाची तिची एक मैत्रीण बिनी होती.

''आम्ही 'सहल सहल' खेळतो आहो. तूदेखील ये ना.''

बिनीला यायचे होतेच. पण ती त्यांच्यापेक्षाही गरीब होती. म्हणून त्यांच्यात सामील व्हायला तिला संकोच वाटत होता. आता दुर्गाने बोलावल्यावर ती आनंदाने

त्यांच्यात सामील झाली. दुर्गा अपूला म्हणाली, ‘‘आता बिनी आली आहे ना? मग घरी जाऊन आणखी थोडा तांदूळ घेऊन ये.’’ हे ऐकून तर बिनीला खूपच आनंद झाला.

अपू घरून आणखी मूठभर तांदूळ घेऊन आला. आई तळ्यावर कपडे धुण्यासाठी गेली होती म्हणून त्याचे काम सोपे झाले. आता दुर्गाने दोन वांगी कापली आणि तेलात परतली. तिने अपूला विचारले, ‘‘आई असेच करते ना रे अपू?’’

अपूला कुठे हे सारे माहीत होते? पण दीदीने आपल्याला विचारले याचाच त्याला आनंद झाला. तो म्हणाला, ‘‘हो. असेच करते.’’

रानात, स्वत: करून खाण्याचा आनंद इतका होता की मुलांना स्वयंपाकात मीठ नाही ही गोष्टही काही महत्त्वाची वाटली नाही. थोडा कच्चा शिजलेला भात, करपलेली वांगी हे साधे अन्नदेखील त्यांना अतिशय गोड लागले. त्यांनी ठरविले की आणखी काही दिवसांनी अशी सहल पुन्हा करायची.

***

नरोत्तमदास बाबाजी या नावाचे एक खूप वृद्ध वैष्णव साधू-पुरुष  अपूच्या घरापासून काही अंतरावर, एका झोपडीत, एकटेच राहत होते. ते फारसे कुणात मिसळत नसत. एकदा हरिहर त्यांना भेटायला जाताना अपूलाही सोबत घेऊन गेला. त्यांना अपू खूप आवडला आणि अपूलाही त्यांच्याविषयी जवळीक वाटू लागली. बाबाजी हरिहरपेक्षाही वयाने खूप मोठे होते.  तो त्यांना ‘आजोबा’ म्हणू लागला. काही दिवसांनी तर तो एकटाच त्यांच्याकडे जाऊ लागला. तो दाराबाहेरूनच हाक मारी, ‘‘आजोबा, तुम्ही आहात का?’’

आजोबा लगबगीने बाहेर येऊन म्हणत, ‘‘कोण? अपू? ये, आत ये.’’

तो आला म्हणजे त्यांनाही खूप बरे वाटे. खरे तर गावात कुणाकडेही गेला म्हणजे अपू लाजून गप्प बसत असे. पण या आजोबांजवळ त्याला मनातल्या अनेक गोष्टी सांगण्यास संकोच वाटत नसे. आजोबा त्या लक्ष देऊन ऐकत, त्याला निरनिराळ्या गोष्टी सांगत. एके दिवशी आजोबा त्याला म्हणाले, ‘‘अपू, तू माझे प्रिय संत गौरांग यांच्यासारखाच दिसतोस. तुला पाहिले की मला त्यांची आठवण येते. त्यांच्या लहानपणी नक्कीच ते तुझ्यासारखे दिसत असावेत.’’

अपू हसला. ते पाहून आजोबा म्हणाले, ‘‘हसू नकोस. मी खरेच सांगतो आहे.’’

अपू म्हणाला, ‘‘आजोबा, तुमच्या पुस्तकातील त्यांचे चित्र मला पुन्हा एकदा दाखवा ना!’’

आजोबा त्यांच्या जवळचे जाडजूड पुस्तक घेऊन आले. त्या पुस्तकाचे नाव ‘प्रेमभक्ती चंद्रिका’ असे होते. त्या पुस्तकात दोनच चित्रे होती, त्यांपैकी एक संत गौरांग यांचे होते. आजोबा हे पुस्तक नेहमी भक्तिभावाने वाचत. इतर कुणालाच ते कधीच दाखवीत नसत. अपूला एकदा ते म्हणाले, ‘‘मी मरण पावल्यावर हे पुस्तक तुझ्यासाठी ठेवून जाईन. माझी खात्री आहे, तू त्याला सांभाळून ठेवशील.’’

आजोबा अनेकदा त्याला या पुस्तकातून कथा वाचून दाखवीत, कवने म्हणत. ती ऐकत असताना अपूला वाटे की, आपल्यावरून शब्दांचा एक झराच वाहतो आहे आणि तो आपल्याला दूर कोठेतरी घेऊन जातो आहे. पक्ष्यांची गाणी ऐकताना जसे त्याचे भान हरपत असे तसेच ही कवने ऐकतानादेखील होई.

एके दिवशी अपू बाबाजींच्या घरून आपल्या घराकडे परतत होता तेव्हा त्याला पिवळ्या चाफ्याचे एक झाड दिसले. त्यावर फुलांचे गुच्छ लटकलेले होते. त्याने दोन्ही हातांत मावतील एवढी फुले तोडून घेतली आणि तो घरी परतला. त्याने ती फुले आपल्या अंथरुणावर ठेवली. मात्र त्याच वेळी बाबांनी त्याला अभ्यास करण्यासाठी बोलावले. अभ्यास करीत असताना त्याचे सारे लक्ष त्या फुलांकडेच होते. एकदाचा अभ्यास संपला, रात्रीचे जेवण झाले आणि तो झोपण्यासाठी आपल्या खोलीत पळाला. अंथरुणावर पालथा पडून त्याने त्या फुलांत आपला चेहरा बुडविला. या फुलांतून येणारा सुगंध त्याला जुन्या काळात घेऊन गेला. बालपणीच्या अनेक आठवणी त्याच्या मनात जाग्या झाल्या. जणू भूतकाळ पुन्हा एकदा वर्तमानकाळ बनला होता! अपू कितीतरी वेळ तो सुगंध अनुभवत राहिला...

**आणखी काही दिवसांनंतरची गोष्ट.**

सर्वजयाच्या शेजारच्या शेजो मावशीच्या घरात नुकतेच एक लग्न लागले होते आणि तिचे घर दूरदुरून आलेल्या पाहुण्यांनी अजून भरलेले होते. त्या पाहुण्यांत एक टुनी नावाची मुलगीदेखील तिच्या आईवडिलांच्या सोबत आली होती. तिची आणि दुर्गाची चांगलीच मैत्री झाली होती.

दुपारच्या वेळी शेजो मावशीला टुनीची आई काहीतरी शोधताना दिसली. तिने विचारले, ''तू काय शोधते आहेस?''

टुनीची आई म्हणाली, ''मी नेहमी माझा सिंदूर ज्या सोन्याच्या डबीत ठेवते ती डबी कुठे दिसत नाही. सारीकडे शोधले.''

''तू डबी कोठे ठेवली होतीस?''

''इथेच, याच खोलीत.''

आता शेजो मावशीसुद्धा डबी शोधू लागली. पण तिलाही ती सापडली नाही. मग तिने चौकशी केली तेव्हा तिला समजले की काही वेळापूर्वी दुर्गा येथे आली होती. सारे जण जेवायला बसले असताना ती एकटीच या खोलीत होती. त्यानंतर ती घरी जाऊन परत आली आहे. आधीच तिचा दुर्गावर राग होता. आता तिला नक्की वाटू लागले की, ती डबी दुर्गानेच चोरली असावी. तिने सरळ दुर्गाला विचारले, ''दुर्गा, मुकाट्याने ती डबी परत कर, नाहीतर...''

तिचा आविर्भाव पाहून दुर्गा घाबरली. तिच्या तोंडून शब्द फुटेना.

टुनीची आई गेल्या काही दिवसांपासून दुर्गाला पाहत होती. तिला ती मुलगी आवडली होती. मावशी दुर्गावर आळ घेते आहे हे तिला पटले नाही. ती म्हणाली, ''मला नाही वाटत तिने डबी घेतली असेल म्हणून.''

''तू गप्प बैस.'' मावशी रागाने म्हणाली. ''तुला कल्पना नाही, पण या पोरीला मी चांगली ओळखते.''

जमलेल्या बायकांपैकी एक जण म्हणाली, ''दुर्गा, तू डबी घेतली असशील तर देऊन टाक. गोष्ट संपली. आम्ही कुणी तुला काही म्हणणार नाही.''

दुर्गाचे पाय थरथर कापत होते. भिंतीचा आधार घेत ती कशीबशी म्हणाली, ''मी खरेच सांगते. मी ती डबी पाहिलीसुद्धा नाही.''

''मी तुझ्यावर विश्वास ठेवीन असे तुला वाटते का?'' मावशी ओरडून म्हणाली. मग आवाज खाली आणत ती म्हणाली, ''मी तुला पुन्हा विचारते, गोडीगुलाबीने ती डबी परत कर. नाहीतर गाठ माझ्याशी आहे.''

तरी दुर्गा काहीच बोलली नाही. ते पाहून मावशीचा पारा चढला. तिने दुर्गाला मारण्यास सुरुवात केली. त्यानेही ती ऐकत नाही हे पाहून तिने दुर्गाचे डोके धरले व ते भिंतीवर आपटले. ते पाहून टुनीची आई धावत आली आणि तिने मावशीचा हात पकडला. ''हे काय करते आहेस? माझी डबी गेली तर गेली. पण तिला मारू नकोस. सोड बरे आधी.''

''तिच्या नाकातून रक्त येत आहे.'' एक जण म्हणाली. ''कुणीतरी पाणी घेऊन या लवकर.''

राणूची आई शेजारी गेली होती. हा आरडाओरडा ऐकून ती धावत आली. तिने दुर्गाची अवस्था पाहिली तेव्हा तिला धक्काच बसला. तिने दुर्गाचे तोंड पाण्याने धुतले व एका कोरड्या कपड्याने पुसून काढले. ती मावशीला म्हणाली, ''हे काय दीदी? गरीब बिचारी अशक्त मुलगी. इतके मारतात का?''

''अशा चोरांना मारच पाहिजे. ती डबी मिळाल्याशिवाय मी तिला सोडणार नाही. आणखी मारीन. मग हरिहरने मला फासावर दिले तरी चालेल.''

''मला ती डबी नको आहे. मी उगीचच त्या डबीचा विषय काढला. तिला जाऊ दे बरे. टुनीची आई म्हणाली.''

मावशीच्या मनात दुर्गाला तसे सोडायचे नव्हते. पण सगळ्या बायका तिच्या विरुद्ध बोलू लागल्या तेव्हा तिला गप्प बसावे लागलेच.

अनुवाद : **विजय पाडळकर**, पुणे
vvpadalkar@gmail.com
Mob. 9867598836

२६ जानेवारी २०२२ रोजी येत आहेत...
दीर्घकाळ आऊट ऑफ प्रिंट असलेल्या
**ग.प्र. प्रधान** यांच्या दोन पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या...

**हाजीपीर आणि कांजरकोट**
(१९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर सीमारेषेवरील सैनिक व नागरिक यांच्याशी संवाद करून लिहिलेला रिपोर्ताज)

**सोनार बांगला**
(१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर सीमारेषेवरील सैनिक व नागरिक यांच्याशी संवाद करून लिहिलेला रिपोर्ताज )

संपर्क : **साधना प्रकाशन.** Ph. 020-24459635

दिलीप धोंडगे

# विडीची गोष्ट : एक महत्त्वाचा दस्तावेज

'विडीची गोष्ट' हे डॉ. शंकर बोऱ्हाडे यांचे पुस्तक प्राय: सिन्नर येथील विडी उद्योगाच्या एका शतकाचा इतिहास उलगडून दाखवणारे एक महत्त्वाचे पुस्तक आहे. डॉ. बोऱ्हाडे हे स्वत: सिन्नरवासीय व त्यांचे आईवडील हे विडी कामगार असल्यामुळे तसेच बोऱ्हाडे यांना सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक गतिविधींमध्ये रस असल्यामुळे त्यांनी एक महत्त्वाचा विखुरलेला दस्तऐवज लिखित स्वरूपात उपलब्ध करून दिला आहे. लोकवाङ्मय गृह या बांधिलकी जपणाऱ्या नामवंत प्रकाशन संस्थेने प्रस्तुत पुस्तक देखण्या स्वरूपात निर्मितिमूल्य काटेकोरपणे जपत प्रसिद्ध केले आहे.

या पुस्तकात एकूण तेरा प्रकरणे आहेत. 'विडीच्या गोष्टीमागील गोष्ट' हे लेखकाचे मनोगत आहे. साथी नारायण आडणे आणि सिन्नर तालुका विडी कामगार संघाचे अध्यक्ष म्हाळू खंडू पवार यांनी हातात संघटनेचा लाल बावटा धरून बोऱ्हाडे यांच्या घरासमोर विडीचा इतिहास कथन करणारे पुस्तक लिहावे म्हणून आंदोलन केले. डॉ. बोऱ्हाडे घरी नव्हते. घरी परतल्यावर या अभिनव आंदोलनाची माहिती मिळाली. परिणामत: त्यांना पुस्तक लेखनाचा संकल्प सोडावा लागला. अर्थात याआधी याच कामाचा श्रीगणेशा त्यांनी केला होता. पण काही कारणांमुळे काम रेंगाळले होते. ही हकिकत त्यांनी आपल्या मनोगतात नमूद केली आहे.

पहिले प्रकरण 'समग्र समृद्ध सिन्नर' या शीर्षकाचे असून सिन्नर शहराला भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अंगांनी परिचय करून देण्याबरोबरच स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाची माहिती दिली आहे. या पुस्तकाचे आशयविश्व कळण्यासाठी ही पार्श्वभूमी उभी करणे आवश्यक होते. 'ऐतिहासिक दुष्काळ आणि प्लेगची साथ' या दुसऱ्या प्रकरणात तत्कालीन दुष्काळ, प्लेगची महामारी यांचा आढावा घेतला आहे. त्यात शत्रूच्या सैन्याच्या धाडी पडून प्रजेचे जे हाल होत, त्याचा उल्लेख केला आहे. 'विडी तंबाखू पुराण' या प्रकरणात तंबाखूचे मूळ दक्षिण अमेरिका असून पोर्तुगिजांनी तंबाखू भारतात आणल्याचे म्हटले

> एक शतकभर 'विडीचे गाव' म्हणून भारत व भारताबाहेर ओळख असलेल्या गावात कालौघात औद्योगिक वसाहत काढावी अशी प्रेरणा तत्कालीन विधी मंडळातील लोकप्रतिनिधींना मिळणे याला कारण शतकभराचा हा विडी उद्योग आहे. विडी उद्योगावर औद्योगिक वसाहतीचे आक्रमण झाले असे न म्हणता उद्योगधंद्याचा हा कालोचित विस्तार झाला, असे म्हणायला हवे. औद्योगिक वसाहतीतला कामगार हा विशिष्ट तांत्रिक शैक्षणिक अर्हता धारण केलेला व प्रगत कौशल्ये आत्मसात केलेला असतो. आणि मुख्य म्हणजे हे अवजड उद्योग पुरुषप्रधान असतात. विडी उद्योग हा स्थानिक, कमीतकमी कौशल्य धारण करणाऱ्या व प्राधान्याने महिला कामगारांना रोजगार देणारा उद्योग आहे. आपल्या गावाचा व परिसराचा विकास विडी उद्योगामुळे झाला हा इतिहास आबालवृद्ध जाणतात.

आहे. तंबाखू उत्पादक देशांमध्ये भारताचा तिसरा क्रमांक लागतो. अमेरिका व चीन हे अनुक्रमे पहिले व दुसरे तंबाखू उत्पादक देश आहेत. भारतातून सुमारे पन्नास देशांमध्ये तंबाखू निर्यात होते. सिन्नर तालुका हा पर्जन्यछायेखाली येणारा भाग असल्यामुळे इथे प्राधान्याने जिरायची शेती होती. सर्वस्वी पावसाच्या लहरीवर अवलंबून असणारी जिरायती शेती ही सतत दारिद्र्याला आमंत्रण देणारी ठरत असल्याचा सार्वजनिक व सार्वकालिक अनुभव गणला गेला आहे. अशा भागात किमान कौशल्यावर आधारित, विशेषत: महिलावर्गाला सहजपणे करता येणाऱ्या उद्योगाची गरज होती. या गरजेतून सिन्नर शहरात विडी उद्योगाचे बीजारोपण झाले.

'महात्मा गांधी आणि विडी उद्योग' हे प्रकरण संशयास्पद आहे. म. गांधी यांनी मद्यपान आणि धूम्रपान निषिद्ध मानले होते, असे लेखकाने या प्रकरणात नमूद केले आहे. पण सामान्यांचे सुलभ धूम्रपानाचे साधन असणाऱ्या विडी उद्योगाच्या विकासाला म. गांधी यांच्या सत्याग्रह आणि स्वदेशी चळवळीचा फायदा झाल्याचे दिसून येते, हा उघड उघड विरोधी निष्कर्ष म्हणून अनाकलनीय आहे. विडीपासून मिळणाऱ्या विरंगुळ्याचे महत्त्व म. गांधीजींना पटले होते, याची आठवण देवकिसन सारडा यांनी रामकृष्ण बजाजांच्या हवाल्याने सांगितली, असे लेखकाने लिहिले आहे. (पृ. ५५) देवकिसनजी हे अभ्यासक व्यक्तिमत्त्व आहे. पण याबद्दलचा लिखित पुरावा देवकिसनजींपाशी नसेल, तर जरी रामकृष्ण बजाजांचा हवाला दिला असेल तरी ती केवळ सांगोवांगी अविश्वनीय हकिकत ठरते. एक तर कुठल्याही परिस्थितीत म. गांधी विरंगुळ्याचे साधन म्हणून विडीकाडीचे समर्थन करणार नाहीत. यामुळे म. गांधींना अधिक्षेप होतो. इतकेच नव्हे, तर रामकृष्ण बजाज व दस्तुरखुद्द देवकिसनजी सारडा यांचाही अधिक्षेप होतो. वास्तव काय असावे, या बाबत डॉ. अभय बंग यांनी वारंवार आपल्या भाषणातून व केव्हा केव्हा आपल्या लेखनात उद्धृत केलेली एक घटना लक्षात घेणे उद्बोधक ठरेल. खादी बनवण्यासाठी सूतकताई करणाऱ्या लोकांनी वेतन फारच अपुरे पडते, अशी म. गांधी यांच्याकडे तक्रार केली. खादी ही मशीनवर बनवली जात नसल्यामुळे त्यांची तक्रार स्वाभाविक होती. सूतकताई व विणणे या शरीरश्रमाने करायच्या गोष्टी असल्यामुळे उत्पादन हे फारच कमी असायचे. तशात सर्वांना कापड खरेदी करणे परवडायला हवे, यासाठी कापडाची किंमत ठेवली जात असे. यामुळे






त्यांना रोजगार नाममात्र मिळत असे. महात्माजींनी विनोबांना याचा अभ्यास करायला सांगितले. विनोबाजींनी त्यांना हवा तो वेळ मागून घेतला. सहा महिन्यांनी विनोबाजी म. गांधींना भेटले. गांधीजींनी विनाबाजींना पाहताच प्रकृती एवढी का खालावली, हे आश्चर्यचकित होऊन विचारले. विनोबाजींचे तीस पौंड वजन घटले होते. सूतकर्म व विणकाम यांचा मोबदला दिवसाला एक आणा होता. विनोबाजींनी सहा महिने ही कामे करून एक आण्यावर गुजराण केली. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे विनोबाजींचे घटलेले तीस पौंड वजन. नंतर मग खादी विणणारे व सूतकताई करणारे यांच्या रोजगारात वाढ करण्यात आली. विनोबाजींसारखी व्यक्तीच असा प्रायोगिक दृष्टिकोन ठेवून व त्याची अंमलबजावणी करीत निष्कर्ष काढू शकते. (पाहा : Gandhi was misunderstood concerning Science, Frontiers of Humanity, Indian Academay of Science यांच्या विद्यमाने डॉ. अभय बंग यांनी दिलेले भाषण या पोर्टलवर उपलब्ध. दि. २१ ऑक्टोबर २०२१).

'उद्यमशील विडी कारखानदार' या विभागात आद्य विडी कारखानदार बाळाजी गणपत वाजे यांच्यापासून सुरुवात करीत भिकुसा यमासा क्षत्रिय, रामभाऊ निंबाळकर, बस्तीराम नारायणदास सारडा, किसनलालजी सारडा, शंकर भिलाजी चोथवे, रामनाथशेठ चांडक, चंपालाल चोरडिया प्रभृतींच्या उद्योगव्यवसायाच्या वाटचालीचा उत्तम परिचय करून दिला आहे. बाळाजी गणपत वाजे यांना भिवंडी परिसरात जनावरे चारत असताना विडी उद्योग पाहायला मिळाला. अतिशय कमी कौशल्यात आणि श्रमात तयार होणारे विडीकाम ते एका गृहिणीकडून शिकले. त्या गृहिणीला सिन्नरला आणून त्यांनी अन्य स्त्रियांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली. सन १९२२ मध्ये बस्तीराम नारायणदास सारडा (महेश्री) यांनी फक्त तीन कामगारांना घेऊन विडी व्यवसायाला सुरुवात केली ती अवघ्या एकोणतीस रुपये भांडवलावर. ही दोन प्रातिनिधिक उदाहरणे. पण जवळपास सर्वच कारखानदारांनी स्वतंत्रपणे अगर भागीदारी करीत शून्यातून आपले उद्योगजगत उभे केले असल्याचे लेखकाने लक्षात आणून दिले आहे. पुढच्या काही प्रकरणांमध्ये विड्यांची व्यापारचिन्हे, पशू-पक्ष्यांच्या चित्रांचा वापर केलेली, संख्यादर्शक, मालकांच्या छायाचित्रांचा वापर केलेल्या व्यापारचिन्हांच्या हकिकती नोंदवल्या आहेत. विडी कामगार हे बहुश: निरक्षर. त्यांचे काम प्राय: हाताने चालणारे. त्यांना काही चांगले ऐकायला मिळण्याची संधी उपलब्ध करून त्यांना बहुश्रुत करावे यासाठी काही पोथ्यापुराणे, कादंबऱ्या यांच्या वाचनाचे कार्यक्रम योजून कामगारांना श्रवणानंद मिळवून देण्याचे काम काही कारखानदार करीत असत, अशी माहिती लेखकाने पुरवली आहे. विडी कारखानदार व कामगार यांचे शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान उल्लेखनीय आहे. शाळा, महाविद्यालये, वाचनालय यांना जागा मिळवून देऊन वास्तू उभ्या करण्यापर्यंत आर्थिक मदत केली आहे, ती वाखाणण्यासारखी आहे. या बाबत वाजे, सारडा, क्षत्रिय, चांडकादी परिवार व कामगार यांची नावे किंवा त्यांनी सुचवलेली नावे अजरामर झाली आहेत. राजकीयदृष्ट्या जागरूक असलेल्या विडी कामगारांनी व नेत्यांनी सिन्नर तालुक्यातील विधानसभा निवडणुका, दुष्काळ निवारणार्थ झालेली आंदोलने, मोर्चे, शहर विकास, शैक्षणिक सुविधानिर्मिती यात योगदान दिलेले दिसते. १९७२च्या दुष्काळात शक्ती विडी कामगार सेवा संघाची स्थापना करून कामगारांना अन्नधान्याचा पुरवठा माफक दरात करण्यात आला होता. या कामी शंकरशेठ वाजे यांनी घेतलेल्या पुढाकाराची नोंद महत्त्वपूर्ण आहे. शक्ती विडी कामगार सेवा संघाच्या नफ्यातून जागा घेऊन पुढे ती सिन्नर सहकारी वाचनालयाला हस्तांतरित केली. वाचनसंस्कृतीची जोपासना करण्याच्या या कार्याला लावलेला हातभार कोण विसरेल?

उद्योग म्हटला की, तो कामगारांच्या सांघिक श्रमावर बहरतो. याच संघशक्तीचा वापर करून त्यांच्यावर अन्याय होऊ नये, त्यांना योग्य ते वेतन मिळावे, त्यांचे सकारण-अकारण शोषण होऊ नये, यासाठी कामगार संघटना स्थापन केल्या जातात. या संघटना पक्षीय विचारसरणींशी निगडित असतात. इंटक, आयटक, विडी कामगार युनियन वगैरे संघटना काँग्रेस, कम्युनिस्ट पक्ष वगैरेंशी निगडित असून त्यांचे स्वरूप व त्यांच्या नेत्यांचे कार्य परिचित करून दिले आहे. शंकर सीताराम देशमुख, बहिरू लक्ष्मण खताळ, काशिनाथ भागुजी गोळेसर, निवृत्ती शिवाजी आंबेकर, श्रीमती इंदूबाई जाधव, पांडुरंग दगडू तिकोणे, नारायण शंकर आडणे, कॉ. गोपीनाथ म्हसाळ, दुर्वे दादा आणि दुर्वे नाना हे बंधुवर्य, सायन्न एनगंदुल, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. गुलाबराव देशमुख, कॉ. राजू देसले व अन्य नेत्यांचा यथायोग्य त्यांच्या कार्यकर्तृत्वासह परिचय करून दिला आहे.

एक शतकभर 'विडीचे गाव' म्हणून भारत व भारताबाहेर ओळख असलेल्या गावात कालौघात औद्योगिक वसाहत काढावी अशी प्रेरणा तत्कालीन विधी मंडळातील लोकप्रतिनिधींना मिळणे याला कारण शतकभराचा हा विडी उद्योग आहे. विडी उद्योगावर औद्योगिक वसाहतीचे आक्रमण झाले असे न म्हणता उद्योगधंद्याचा हा कालोचित विस्तार झाला, असे म्हणायला हवे. औद्योगिक वसाहतीतला कामगार हा विशिष्ट तांत्रिक शैक्षणिक अर्हता धारण केलेला व प्रगत कौशल्ये आत्मसात केलेला असतो. आणि मुख्य म्हणजे हे अवजड उद्योग पुरुषप्रधान असतात. विडी उद्योग हा स्थानिक, कमीतकमी कौशल्य धारण करणाऱ्या व प्राधान्याने महिला कामगारांना रोजगार देणारा उद्योग आहे. आपल्या गावाचा व परिसराचा विकास विडी उद्योगामुळे झाला हा इतिहास आबालवृद्ध जाणतात. कालबाह्य होऊ घातलेल्या उद्योगाऐवजी कालोचित नव्या उद्यमनगरीची गरज पूर्ण करण्याचे काम सिन्नर मतदारसंघातील विधी मंडळ सदस्यांनी केले. त्यांनी त्यांचे लोकप्रतिनिधित्व सार्थ केले असे म्हटले पाहिजे.

डॉ. बोऱ्हाडे यांनी प्रस्तुत पुस्तक सिद्ध करण्यासाठी प्रस्थान ठेवले ते संशोधनाचे. ते आपल्या मनोगतात लिहिताना म्हणतात, ''विद्याशाखीय संशोधनाची सवय लागलेली असल्याने, मी उद्योगाच्या स्थितिगतीविषयी संशोधन करावे, असा विचार करू लागलो... त्याविषयी विचार करीत असताना कामगार नेते बहिरू लक्ष्मण खताळ यांची दीर्घ मुलाखत मी घेतली. त्या अनुषंगाने काही संदर्भसाधने जमवत राहिलो. विडी उद्योगाविषयी काही उद्योजकांनी स्वत:च्या आत्मकथा लिहिलेल्या आहेत. त्याचे वाचन या काळात केले.'' (पृ. ७). पण बोऱ्हाडे पोहोचले ते 'या पुस्तकाच्या लेखनासाठी ललितगद्य शैलीचा वापर केला असून विद्याशाखीय संशोधन पद्धतीचा अल्प वापर केला आहे,' या विधानापर्यंत. प्रस्तुत विधान हे ग्रंथाच्या शेवटच्या पानावर संदर्भ व टिपा या शीर्षकाखाली १७ वी टीप आहे. वस्तुत: एवढा उत्कृष्ट ऐवज हाताशी असताना व बोऱ्हाडे यांच्यापाशी क्षमता असताना विद्याशाखीय संशोधन पद्धतीचा घेतलेला वसा त्यांना टाकायला नको होता. यामुळे लेखनातील काही दोष टाळता आले असते. उदाहरणार्थ- 'तेव्हा नगराध्यक्षाचे मानधन एक रुपया घेणारे काका (रामनाथकाका चांडक) हे वेगळे व्यक्तिमत्त्व होते.' (पृ. १०२), 'रामनाथकाका चांडक यांनी नगरपालिकेकडून एक रुपयाही मानधन न घेता शहर विकासाच्या योजना राबविल्या.' (पृ. १). यातले कोणते विधान ग्राह्य धरायचे हा वाचकांपुढे प्रश्न पडू शकतो. शैक्षणिक संस्थांची स्थापनावर्षे नोंदवताना इतर संस्थांच्या स्थापनावर्षांच्या नोंदीबरोबर गोखले एज्युकेशन सोसायटीचे स्थापनावर्ष नोंदवायला हवे होते. पुस्तकभर माहितीची पुनरावृत्ती फार झाली आहे. याचे कारण डॉ. बोऱ्हाड्यांनी प्रसंगोपात लिहिलेले लेख (त्यांच्या म्हणण्यानुसार) पुस्तकासाठी अनुरूप करून घेतले नाहीत. असो.

प्रस्तुत पुस्तक सिद्ध करून डॉ. बोऱ्हाडे मातृभूमीच्या, मातापित्यांच्या, ज्या थोरामोठ्यांचा सहवास व मार्गदर्शन लाभले त्यांच्या, ज्या विद्यालय-महाविद्यालयात ते शिकले त्यांच्या व इतर काही- ज्यांचा त्यांना कृपाप्रसाद लाभला त्या व्यक्ती व संस्था यांच्या ऋणातून ते मुक्त झाले आहेत. प्रस्तुत पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचा लवकरच योग येणार असल्यामुळे काही बाबी सूचित केल्या. डॉ. बोऱ्हाडे यांनी विडीउद्योगाचा इतिहास सिद्ध करण्यासाठी जो उद्योग केला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

**डॉ. दिलीप धोंडगे,** साटाणा, जि.नाशिक
Mob. 9423182147

**विडीची गोष्ट** : शंकर बोऱ्हाडे
लोकवाङ्मय गृह, मुंबई
पृष्ठे : २४८ / किंमत : रु. २५०/-

विवेक सबनीस

# कॅलेंडर : स्मरणरम्य पुणे २०२२

मोठ्या आकारातील ऑफसेट छपाईतील कृष्णधवल छायाचित्रे आणि त्यांच्या खाली छायाचित्रातील दृश्याची थोडक्यात मराठी व इंग्रजीतून माहिती. 'स्मरणरम्य पुणे २०२२' उर्फ 'पुणे नोस्टाल्जिया २०२२' या द्वैभाषिक कॅलेंडरचे असे स्वरूप आहे. या कॅलेंडरचे हे सहावे वर्ष आहे. यंदा 'पुणे आणि पुणेकर' असा या कॅलेंडरसाठी विषय घेतला असून त्यासाठी माझ्या संग्रहातील फोटोंबरोबरच अनेकांकडून फोटो मागवण्यात आले. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला.

पेपर लीफ पुणे या प्रकाशन व छपाई करणाऱ्या संस्थेचे जतन भाटवडेकर यांच्या कल्पनेतून 'स्मरणरम्य पुणे' ही संकल्पना गेली पाच वर्षे आम्ही राबवत आहोत. त्यामध्ये माझे थोरले बंधू विजय सबनीस यांचाही मोलाचा वाटा आहे. 'स्मरणरम्य पुणे' व 'पुणे नोस्टाल्जिया' ही दोन्ही नावे विजय सबनीस यांनीच सुचवली असून, ती जुन्या पुण्यावर प्रेम करणाऱ्या रसिकांना आवडली आहेत.

आतापर्यंत पुण्यातील स्थळे, सार्वजनिक ठिकाणे, उद्याने, वास्तू, रस्ते, वाहने, वाहतूक, व्यवसाय आणि पुण्याचा निसर्ग- असे विविध विषय मध्यवर्ती संकल्पनेसाठी आम्ही राबवले आहेत. यंदा प्रथमच व्यक्ती, व व्यक्तींच्या संस्था हा गाभा पकडून 'पुणे व पुणेकर' हा विषय घेतला आहे. विसाव्या शतकातील हे कर्तृत्ववान पुणेकर असून त्यांनी पुण्याच्या सांस्कृतिक, साहित्य, संगीत, नाटक, शिक्षण, कामगार क्षेत्र तसेच सामाजिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली. या फोटोंमधून त्यांच्या केवळ आठवणींना उजाळा मिळणार नसून त्यांच्या कर्तृत्वाचीही उजळणी होणार आहे.

'पुणे आणि पुणेकर' या विषयात अनेक पुणेकर हे मूळ पुणेकर नाहीत; पण त्यांची कर्मभूमी पुणे आहे. कोलकता, तसेच इंग्लंड व अमेरिका फिरून भारतात आलेल्या पंडिता रमाबाईंनी विधवांसाठी काम करताना मुंबईपाठोपाठ पुण्याची निवड केली होती.

स्त्रीशिक्षणाचा वसा घेऊन पुण्यात भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांनी हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेची स्थापनाही १८९६च्या सुमारास केली. याशिवाय दिनदर्शिकेत पुण्याबाहेरची महनीय व्यक्तिमत्त्वे दाखवताना त्यांचे तत्कालीन पुण्याचे संदर्भही समजावून घेता येतील. यात अभिनव भारत चळवळीला चालना देणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचाही समावेश केला गेला आहे.

विशेष म्हणजे यंदा अनेक दिग्गज पुणेकरांचे जन्मशताब्दी वर्ष चालू आहे. वसंत बापट यांची प्रातिनिधिक व्यक्तिमत्त्व म्हणून निवड केली आहे. कवी, प्राध्यापक, राष्ट्र सेवा दलातील समरगीते व देशभक्तीपर गीते लिहिणारे कवी बापटांची 'सदैव सैनिका पुढेच जायचे'सारखी प्रेरणादायी गीते अनेक पिढ्यांमधील मुलांनी तोंडपाठ केली आहेत.

याशिवाय बाबासाहेबांचे अमोघ कार्यही अनेकांना प्रेरणा देणारे आहे. पुण्याचे वेगळेपण जपणारी अनेक मोठी माणसे शोधून काढताना आम्ही त्यांच्या आप्तांशी संपर्क साधला. त्यांच्याकडून मिळालेल्या फोटोंमधील संबंधित महनीय व्यक्तीच्या जीवनातील क्षण अधिक बारकाव्यानिशी समजावून घेता आले. यात संगीत क्षेत्रात भरारी घेणाऱ्या ज्योत्स्ना भोळे दिसतील. पुण्यात चित्रपटसंगीत आणणारी 'मेलडी मेकर्स'सारखी ऑर्केस्ट्रा संस्कृती प्रत्ययाला येईल.

वयाची पन्नाशी पूर्ण करत असलेल्या 'घाशीराम कोतवाल' या मैलाचा दगड ठरलेल्या नाटकातील कलावंत व पडद्यामागच्या रंगकर्मींचा एक ग्रूप अनेकांच्या जुन्या आठवणींना उजाळा द्यायला मदत करेल. यासाठी




मॅजेस्टिक गप्पा या कार्यक्रमात वसंत बापट

## या कॅलेंडमध्ये पुढील छायाचित्रे आहेत.

१. एस.बी.मुझुमदार, सिम्बायोसिसची पायाभरणी

२. महर्षि कर्वे, फर्गुसन महाविद्यालय

३. पंडिता रमाबाई, पुणे शहरात

४. घाशीराम कोतवालची टीम अमेरिकेला जाताना

५. ज्योत्स्ना भोळे, लक्ष्मी क्रिडा मंदिर

६. पंडित जसराज, जितेंद्र अभिषेकी, कुमार गंधर्व

७. मेलडी मेकर्स आर्केस्ट्रा

८. वसंत बापट, मॅजेस्टिक गप्पा

९. द.वा. पोतदार, केळकर संग्रहालय

१०. बाबासाहेब पुरंदरे, शनिवार वाडा

११. स्वातंत्र्यवीर सावरकर, अभिनव भारतची सांगता

१२. आप्पासाहेब भोसले, पुणे महानगरपालिका

नाटकातील नाना फडणिसांची भूमिका करणाऱ्या डॉ. मोहन आगाशे यांच्याकडून तेव्हाचे जुने संदर्भ गोळा करता आले.

याशिवाय शास्त्रीय संगीतातील अग्रणी समजल्या जाणाऱ्या पं.जसराज, पं.जितेंद्र अभिषेकी आणि पं.कुमार गंधर्व यांच्या 'श्रेयस' हॉटेलमधील एकत्र भोजनाचे छायाचित्र या दिनदर्शिका फोटो अल्बमचे एक वेगळे आकर्षण ठरेल. तसेच शिक्षणक्षेत्रात वयाची पन्नाशी पूर्ण करणाऱ्या सिंबायोसिस संस्थेची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या संस्थापक डॉ.शां.ब.मुजुमदार यांचा १९७२ मधला फोटो तत्कालीन हनुमान टेकडीच्या परिसराची आठवण करून देईल. पुण्यातील औद्योगिक व कामगार क्षेत्रातील लढे देणारे अप्पासाहेब भोसले यांचा फोटोही या दिनदर्शिकेतील वेगळेपण जपणारा ठरेल.

तर असा हा गेल्या शतकातील पुणे व पुणेकरांबरोबरचा आठवणींचा फोटो-प्रवास तुम्हांला नक्कीच आवडेल. दिनदर्शिकेतील फोटो मिळवून देणाऱ्या सगळ्यांचेच ऋण मानून थांबतो.

**विवेक सबनीस**
छायाचित्र संग्राहक व अभ्यासक, 'स्मरणरम्य पुणे २०२२'
Mob. 93730 85948

(या कॅलेंडरची किंमत २०० रुपये असून, हे साधना मीडिया सेंटर, Ph. 020-24459635 येथेही उपलब्ध आहे.)

## निर्णय स्वागतार्ह, पण खरे आव्हान मानसिकता बदलण्याचे!

दि. २५ डिसेंबरच्या अंकाचे '१८ : २१ वरून २१ : २१ हे स्वागतार्ह पाऊल' हे संपादकीय वाचले. या वर्षाच्या १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनी मोदींनी मुलींचे लग्नवय (१८ वरून २१ करणे विचाराधीन आहे) बदलण्याविषयी सूतोवाच केले होते. विवाहासाठी आवश्यक सामाजिक समज, शारीरिक क्षमता, मातामृत्यू, बालमृत्यू आणि लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी मुलींचे विवाहाचे वय कायद्यानेच वाढविण्याचा स्वागतार्ह निर्णय मोदी सरकारने आता घेतला आहे. पण, खरे आव्हान आहे ते समाजाची मानसिकता बदलण्याचे. कारण बालविवाह प्रतिबंधक कायदा असूनही आजही आपल्या समाजात बालविवाह सर्रास होतात. 'सेव्ह चाईल्ड' या स्वयंसेवी संस्थेने कोरोना काळात देशात बालविवाहाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले असल्याचे वास्तव समोर आणले आहे. त्यामुळे कायद्याबरोबरच बालविवाह रोखण्यासाठी संबंधित यंत्रणांनी संवेदनशीलतेने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच सर्व गावांमध्ये मुलींना शिकवण्याची सोय करायला हवी. ज्यांच्यावर हे बालविवाह रोखण्याची जबाबदारी आहे त्यांचेही प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. 'बालविवाह प्रतिबंध कायदा' हा मुलींना संरक्षण देणारा कायदा आहे आणि तो सर्व धर्मांना लागू आहे. बालविवाह रोखण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. कुमारवयीन आकर्षणामुळे झालेला बालविवाह वा लादलेला बालविवाह यातील फरक सजगतेने ओळखून प्रत्येक प्रकरण संवेदनशीलतेने हाताळणे गरजेचे आहे.

बालविवाह का होतात, कोणत्या समाजघटकांत होतात, त्यामागे असणारी कारणे काय हे संशोधनातून पुढे आले आहे. त्यामुळे बालविवाह रोखायचे तर या प्रश्नांवर प्रथम सखोल चर्चा घडावी आणि चर्चेतून तोडगा काढण्यासाठी पावले उचलणे गरजेचे आहे. मुलींकडे आपला समाज पारंपारिक नजरेने बघतो. वयात आल्यावर 'काहीबाही' घडून समाजात बदनामी होण्यापेक्षा लग्न लावलेले बरे हा 'सुरक्षित उपाय' समजला जातो. बहुसंख्य गावखेड्यांत प्राथमिक शिक्षणानंतर पुढील शिक्षणाची सोय नसते. अशा परिस्थितीत पुढे शिकायला तालुक्याच्या गावात पाठवायची पालकांची तयारी नसते. मग शाळा-शिक्षण संपते आणि मुलींचे लग्न करून दिले जाते. आपल्या देशात आजही मुलींचे शिक्षण ही गंभीर समस्या आहे. १५-१८ वयोगटातील ४० टक्के मुलींची शैक्षणिक गळती होते. म्हणजे देशात दर दोनपैकी एका मुलीचा आजही बालविवाह होतो. 'पुरोगामी विचारांचा' म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात बालविवाहाचे प्रमाण २६.४ टक्के आहे. देशातील सर्वांत जास्त बालविवाह होत असलेले ७० पैकी १७ जिल्हे महाराष्ट्रात आहेत. एखाद्या बालविवाहाची माहिती स्वयंसेवी संस्थेला कळवली तर सदर बालविवाह थांबवला जातो. पुढे बालिकेला बालकल्याण समितीसमोर सादर केले जाते, पालकांकडून बालविवाह करणार नाही म्हणून हमी घेतली जाते. त्यामुळे तेवढ्यापुरता विवाह थांबतो. मग नंतर लग्न गुपचूप आडगावात लावले जाते.

१५-१९ या किशोर वयोगटातील पाच टक्के स्त्रियांना एक किंवा एकापेक्षा अधिक अपत्ये असल्याची नोंद आहे. स्त्री प्रजोत्पादनाचा दर ग्रामीण भागात २.४१ तर शहरी भागात १.७५ असल्याचे निदर्शनास येते. तसेच कमी वयाच्या मातांमध्ये दोन अपत्यांमधील अंतर २२.६ महिने तर जास्त वयाच्या स्त्रियांमध्ये हे अंतर ४३.६ महिने आहे. म्हणूनच स्त्री आणि पुरुषांच्या कायदेशीर विवाहयोग्य वयाची अट काटेकोरपणे पाळण्याचे व दोन अपत्यांमधील अंतर लांबवण्याचे प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

कमावत्या उच्च उत्पन्न वयोगटातील स्त्रियांमध्ये प्रजोत्पादन दर कमी म्हणजेच १.५४ तर कमी उत्पन्न वयोगटात हे

प्रमाण ३.१७ ऐवढे अधिक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्री शिक्षण पातळी आणि प्रजोत्पादन दर यात महत्त्वपूर्ण संबंध आहे. वरच्या म्हणजेच बारावी शैक्षणिक पातळीवर हा दर १.७१ तर खालच्या म्हणजेच पाचवी ते शाळाबाह्य स्त्रियांत हा दर ३.०७ आहे. तसेच कमी शैक्षणिक पातळीवरील स्त्रियांच्या बाबतीत विवाहाचे सरासरी वय १७.२ वर्षे तर जास्त शैक्षणिक पातळीवर हे २२.७ वर्षे आहे. कमी शैक्षणिक पातळीवरील स्त्रियांच्याबाबत पहिले अपत्य होण्याचे वय २१ तर बारावीपेक्षा अधिक शैक्षणिक पातळी असलेल्या स्त्रियांचे याबाबतचे सरासरी वय २५ वर्षे आहे. त्यामुळे स्त्रियांना द्यावयाच्या शिक्षणाबाबत अधिक जागरूक रहाणे गरजेचे आहे.

**बाळकृष्ण शिंदे**, पुणे

## राजकारणातील ती सभ्यता आता शिल्लक आहे?

दि. १ जानेवारी २०२२ च्या अंकात माजी मुख्य निवडणूक आयुक्त श्री.एस.वाय कुरेशी यांची मुलाखत वाचली. विद्यमान निवडणूक आयुक्तांनी 'त्या' बैठकीला जाणे हे चूकच, हे त्यांचे निरीक्षण अगदी योग्य आहे. पण लक्षात कोण घेतो? हेच मनात येते. टी.एन.शेषन यांच्या व्यतिरिक्त असे कोणते निवडणूक आयुक्त आहेत की जे ताठ कण्याने वागले? अलीकडेच निवृत्त झालेले श्री. अशोक लवासा या निवडणूक आयुक्तांनी तेवढा बाणेदारपणा दाखवला होता. पण शेवटी शेवटी त्यांचीही साठमारी करण्यात आली. त्यांच्या मुलाच्या मागे ईडीची चौकशी लावण्यात आली. वेळोवेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांना अडचणीत आणणारे निर्णय, मतप्रदर्शन केले. पण बहुमताच्या जोरावर मुख्य आयुक्तांनी ते हाणून पाडले.

पंतप्रधान कार्यालयाने माफी मागावी अशी अपेक्षा श्री.कुरेशी यांनी व्यक्त केली आहे. पण अलीकडच्या सहा- सात वर्षांतील अनेक घटना पाहता अशी अपेक्षा अवास्तव म्हणावी लागेल. कारण यापेक्षाही अनेक मोठ्या चुका अलीकडच्या काळात घडलेल्या आहेत, पण कोणी माफी मागितल्याचे वाचण्यात नाही.

राजीव गांधी पंतप्रधान असताना अर्थ खात्याचे सचिव श्री.भुरेलाल यांना त्यांनी काही माहिती मागितली असता, पंतप्रधानांच्या कक्षातच त्यांनी ताडकन उत्तर दिले होते "मी अर्थमंत्र्यांकडे काम करतो, त्यांना उत्तर देण्यास बांधील आहे, आपल्याला नाही. सबब आपल्याला काही माहिती हवी असल्यास आपण त्यांना विचारावी. त्यांना अंधारात ठेवून अशी कोणतीही माहिती आपल्याला देण्यास मी बांधील नाही." असे कोणी अधिकारी आज आहेत का?

कुरेशी यांची मुलाखत वाचल्यावर आणखी एक आठवण सांगावीशी वाटते. पहिल्या लोकसभेचे अध्यक्ष श्री मावळंकर होते. संसदीय कामकाजाच्या बाबतीत एक प्रश्न निर्माण झाला होता. पंतप्रधान नेहरूंनी चिठ्ठी पाठवून त्यांना चर्चेसाठी भेटण्यास बोलावले तेव्हा श्री मावळंकर म्हणाले, "ही लोकशाहीची सुरुवात आहे. त्यासाठी चांगल्या प्रथा पाडण्याची आवश्यकता आहे. आणि ती आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. तुम्ही जरी सभागृहाचे नेते असलात तरी संसदीय कामकाजाच्या बाबतीत सभापती श्रेष्ठ असतो. सबब यासाठी तुम्ही माझ्या कक्षात येऊन चर्चा केली पाहिजे." यावर नेहरूंनी झालेल्या चुकीबद्दल ताबडतोब क्षमा मागत, स्वतःहून सभापतींची त्यांच्या कक्षात जाऊन भेट घेतली. ही राजकारणातली सभ्यता आता औषधाला तरी शिल्लक राहिली आहे काय?

**अशोक वासुदेव बक्षी**, सातारा

## त्या विधेयकाची चाहूल लागल्यावर झालेली घाई...

'१८:२१वरून २१:२१ हे स्वागतार्ह पाऊल' या संपादकीयात (२५ डिसेंबरच्या अंकात) विवाहासाठी किमान वयोमर्यादेत वाढ करण्याच्या संदर्भात नियुक्त समितीची शिफारस, तिची कार्यकक्षा यांची नेमकी माहिती मिळते. शिवाय, भारतासह अन्य देशांतील मुलींच्या विवाहासंबंधित कायदे व नियम यांचीसुद्धा कल्पना या लेखातून आली.

आपल्या केंद्रीय मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात संसदेच्या अधिवेशनात वरील विषयावर विधेयक मांडले. मध्यंतरी अनपेक्षित असे काही घडले नाही, अधिवेशन समाप्त झाले आणि २५ डिसेंबरचा साधना अंकही हाती आला. आता विधेयकावर प्रक्रिया होऊन ते संमत झाल्यावर कायदा येईल तेव्हा येईल, परंतु प्रस्तुत विधेयकाची चाहूल लागताच हैदराबाद, हरियाणा व राजस्थान या राज्यांतील १८ वय असलेल्या मुलींचे विवाह करून मोकळे होण्याची घाई लागल्याचे समजले. संसद सुरू होताच वरील विधेयक मांडण्यात कसली अडचण होती?

**डॉ.श्रीकांत परळकर**, दादर, मुंबई

## न्यायव्यवस्थेत काम करणारांसाठी दिशादर्शक

मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती मा. सत्यरंजन धर्माधिकारी यांनी लिहिलेला 'तज्ज्ञांच्या नजरेतून सुटलेल्या न्यायालयाच्या मर्यादा' हा चिकित्सापूर्ण लेख वाचला. (साधना : १८ डिसेंबर २०२२) भारतीय न्यायव्यवस्था आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे या देशात अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या आहेत. सोयीस्कर आणि आपल्या फायद्याची राजकीय भूमिका राजकीय पक्ष घेतात. एखादी भूमिका सगळ्याच घटकांना मान्य होत नाही. अशा वेळी न्यायपालिकेकडे धाव घेतली जाते आणि अनेक वर्षे ती समस्या प्रलंबित राहते. राजकीय मंडळींना नेमके हेच हवे असते. महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या बेमुदत संपाबाबत न्यायालयीन पातळीवर धर्माधिकारी यांनी केलेले विवेचन कामगार संघटना व सामाजिक भान नसलेल्या तथाकथित कामगार पुढाऱ्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आहे. त्यांचा हा लेख न्याय व्यवस्थेत काम करणाऱ्यांसाठी दिशादर्शक आहे.

**ॲड. नकुल पार्सेकर,** सिंधुदुर्ग

## फरीद झकेरिया नव्हे, थॉमस फ्रीडमन!

'उत्तम माणूस हेच भारताचे प्रॉडक्ट' हा विनायक पाचलग यांचा ११ डिसेंबरच्या साधना अंकातील लेख माहितीपूर्ण आहे. चालू शतकाच्या आरंभी भारतात आयटी क्षेत्रात जी क्रांती घडून आली, त्यातून भारताची पताका उंच फडकवणारे दिग्गज निर्माण झाले. सत्या नाडेला, सुंदर पिचई, अरविंद कृष्णा, इंद्रा नुई, शंतनु नारायण आणि आता पराग अगरवाल हे तरुण जगातील बलाढ्य कंपन्यांची धुरा सांभाळत आहेत. ही नावे अनेक भारतीय तरुणांच्या ओठावर तुम्हाला सापडतील. ही टॅलंटेड माणसं हेच भारताचं उत्तम प्रॉडक्ट आहे, हा त्या लेखातील मुद्दा कोणालाही पटण्यासारखा आहे. आयटी क्षेत्राचा खूप मोठा हातभार भारतीय अर्थव्यवस्थेला लाभत आहे.

पण या लेखात एक चूक राहून गेली आहे. 'वर्ल्ड इज फ्लॅट' या जगप्रसिद्ध पुस्तकाचा हवाला लेखकाने दिला आहे. या पुस्तकाचा लेखक फरीद झकेरिया असल्याचे म्हटले आहे, ही मोठीच चूक आहे. कदाचित ऐकीव माहितीवर विसंबल्यामुळे असे झाले असेल. प्रस्तुत पुस्तकाचे लेखक थॉमस फ्रीडमन हे असून, ते 'न्यूयॉर्क टाइम्स'चे ज्येष्ठ वार्ताहर आहेत, पुलित्झर पारितोषिक विजेते आहेत. २००७ मध्ये प्रकाशित झालेल्या या पुस्तकात त्यांनी असे भाकीत केले होते की, 'प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी न जाताही घरून काम करणे एकविसाव्या शतकात शक्य होणार आहे.' ते खरे ठरल्याचे आज आपण पाहतो आहोत.

**पुरुषोत्तम महाले,** ठाणे

## असा अलौकिक बुद्धिप्रामाण्यवादी होणे नाही...!

दि.१जानेवारीच्या अंकात राम जगताप यांनी लिहिलेला 'परमेश्वराला रिटायर कराची कूळकथा आणि उत्तरकथा' हा लेख वाचला. डॉ लागू यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून लिहिलेला हा अभ्यासपूर्ण लेख आवडला.

मी १९९० पासून अंनिसचा क्रियाशील कार्यकर्ता आहे. अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर डॉ. लागू यांचे योगदान बहुमोलाचे होते. 'परमेश्वराला रिटायर करा' या वाक्याने अख्खा महाराष्ट्र हादरला होता. त्यानंतर जे रामायण घडले त्याची माहिती जगताप यांच्या लेखात सविस्तर आहे. अंनिसचा 'शतकवीर' म्हणून माझा सत्कार पुणे येथील 'साधना' सभागृहात डॉ. लागू यांच्या हस्ते झाला. त्या वेळी नरेंद्र जाधव व नरेंद्र दाभोलकर यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमात ह्या सुप्रसिद्ध सिनेनट व बुद्धिप्रामाणवादी, अलौकिक महान व्यक्तीचे भाषण मी ऐकले. ती एक सुवर्णसंधीच होती.

**विलासराव भांदिर्गे,** मु.पो.तारळे ता.पाटण, जि.सातारा

## ज्यांचं जळतं त्यालाच कळतं

१८ डिसेंबरच्या साधना अंकातील न्या. राजन कोचर यांचे पत्र वाचले. 'राइट टु वर्क'चा राज्यघटनेत उल्लेख नसण्याचे कारण त्यांनी बरोबर सांगितले आहे. त्या समितीत गरिबांचा प्रतिनिधी नव्हता म्हणूनच असे झाले आहे. आजही हीच उणीव आहे. म्हणून गरिबी हटविण्याच्या घोषणा होतात, पण गरिबी हटत नाही. कामाच्या अधिकाराचा कायदा हे ए. सी. मध्ये बसून विचार करणारे करू शकत नाहीत. मराठी भाषेत एक म्हण आहे 'ज्याचं जळतं, त्यालाच कळतं.'

**भीमा स्वामी,** पुणे

## महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)चे साहित्य व समाजकार्य पुरस्कार २०२१

### संयोजक : मासूम संस्था, पुणे आणि साधना ट्रस्ट, पुणे

### साहित्य पुरस्कार

१. साहित्य जीवनगौरव
**नरेंद्र चपळगावकर,** औरंगाबाद
(दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह)

२. विशेष पुरस्कार, डिजिटल पत्रकारिता
**राम जगताप :** डोंबिवली, मुंबई
(एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह)

३. वाङ्‌मयप्रकार पुरस्कार (पर्यावरण)
**संतोष शिंत्रे**
(एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह)

४. ललित ग्रंथ पुरस्कार
('दगडी मक्ता' या कादंबरीसाठी)
**रमेश अंधारे,** अमरावती
(पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह)

५. अपारंपारिक ग्रंथ पुरस्कार
('टिपंवणी' हे आत्मकथन)
**सिसिलिया कार्व्हालो,** वसई, पालघर

६.. रा. शं. दातार नाट्य पुरस्कार
(चार एकांकिकांसाठी)
**मुक्ता बाम**
(पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह)

### समाजकार्यपुरस्कार

१. जीवन गौरव
**प्रेमाताई पुरव**
अन्नपूर्णा परिवार, पुणे/मुंबई.
(दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह)

२. डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार
**अंशुल छत्रपती,** हरियाणा
(एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह)

३. कार्यकर्ता (प्रबोधन) :
**सुरेश सावंत** (मुंबई).
(पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह)

४. कार्यकर्ता (संघर्ष) :
**सुनीता भोसले** (अहमदनगर / पुणे)
(पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह)

५. युवा पुरस्कार:
**युवराज गटकळ** (उस्मानाबाद).
(पंचवीस हजार रुपये व स्मृतिचिन्ह)

***(कोविडमुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता गेल्या वर्षीप्रमाणेच या वर्षीही पुरस्कार वितरण समारंभ होणार नाही.)***


महाराष्ट्र शासन
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
आचार्य बाळशास्त्री जांभेकर
(१८१२-१८४६)
पायाभरणी पत्रकारितेची
अभिव्यक्ती स्वातंत्र्याची
महाराष्ट्रातील पहिले इतिहास संशोधक,
लोकशिक्षणाचे आद्य प्रवर्तक,
ज्ञानेश्वरीचे आद्य प्रकाशक,
महाराष्ट्रातील पहिले समाजसुधारक,
पहिले मराठी वृत्तपत्रकार व संपादक,
दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर
यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!
६ जानेवारी
पत्रकार दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
बाळासाहेब थोरात
मंत्री, महसूल
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन


SkinSense
Skin & Laser Clinic
Using science to enhance youth and delay ageing.
Dr. Abhijit Desai
Cosmetic Dermatologist and Laser Specialist
Dr. Gauri Desai
MD, Laser Specialist
Skin Toning
Face Lift & Skin Tightening
Reduction of Snoring
Texturing
Permanent Hair Reduction
Pore Minimisation
Medical
State of the Art
LASERS
Acne Scar Reduction
Spot Fat Reduction and Body Sculpting
Tattoo Removal
Vaginal Tightening
Pigmentation Treatment
Tel no.:
02224331099 / +919920977940
Address:
2nd floor, Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai – 400028
Email: dr.skinsense@gmail.com | Website: www.yourskinsense.com

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting: 10-1-2022/ Date of Publication : 10-1-2022




## साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक

# चिनी महासत्तेचा उदय

### डेंग झिओपेंग ते क्षी जिनपिंग

## सतीश बागल

पृष्ठे ४२८ (आठ पाने रंगीत छायाचित्रे)
किंमत ५०० रुपये (हार्डबाऊंड)
सवलतीत ३५० रुपये (ट.ख. वेगळा)

या पुस्तकात एकूण ३९ प्रकरणे पुढील नऊ विभागांत आहेत.

**१. नेतृत्त्वाच्या पाच पिढ्या**
**२. साम्राज्य आणि क्रांती**
**३. माओंच्या छायेत**
**४. आर्थिक सुधारणांचे पहिले पर्व**
**५. तियाननमेन**
**६. आर्थिक सुधारणांचे दुसरे पर्व**
**७. क्षी जिनपिंग आणि महासत्ता**
**८. महत्त्वाकांक्षी चीन**
**९. भारत आणि चीन**

१९४९ मध्ये माओच्या नेतृत्त्वाखाली चीनमध्ये क्रांती झाली. आणि १९७८ मध्ये डेंग यांच्या नेतृत्त्वाखाली चीनने नवे वळण घेऊन महासत्ता होण्याच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली.त्यानंतरच्या चाळीस वर्षांत चीनने अर्थव्यवस्था अधिकाधिक खुली करीत जोमाने आर्थिक विकास साधला. कोट्यवधी गरीब लोकांना दारिद्र्यातून बाहेर काढून मानाने जगायला शिकविले. जलद आर्थिक विकासामुळे चीनने आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत मानाचे स्थान प्राप्त केले खरे! मात्र त्या विकासप्रक्रियेत अनेक परस्परविरोध सामावलेले आहेत.

चीनचे एक भव्य स्वप्नही आहे, जगाचे नेतृत्व करून आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर मोठा प्रभाव टाकण्याचे! चीनच्या या विकासशैलीमुळे चीनमध्ये आणि जगातअनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. चीनचे जागतिक व्यवस्थेमध्ये शांततापूर्ण मार्गाने सामिलीकरण कसे करायचे, हा आता जगापुढील मोठा प्रश्न आहे. मागील चाळीस वर्षांतील चीनच्या या आर्थिक आणि राजकीय वाटचालीचा, त्यामागील विविध प्रेरणांचा आणि त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचा मागोवा या पुस्तकात घेतला आहे.

संपर्क **साधना प्रकाशन**
**४३१** शनिवार पेठ, पुणे ३०
Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
sadhana.prakashan@gmail.com

वरील QR कोड स्कॅन करून रक्कम ट्रान्सफर करून साधना प्रकाशनाची पुस्तके मागवता येतील.

also available at amazon.in
इ-बुक स्वरूपात किंडलवर उपलब्ध